# विश्व व्यापार संघटना (WTO) प्रणित व्यापाराचे उदारीकरण

## शेती आणि शेतकऱ्यांचा विनाश

FOCUS ON THE GLOBAL SOUTH

अन्नअधिकार अभियान, महाराष्ट्र




सहयोग

रोझा लक्झेंबर्ग स्टिफस्टुंग

दक्षिण आशिया

# विश्वव्यापार संघटना (WTO)
# प्रणित
# व्यापाराचे उदारीकरण

## शेती आणि शेतकऱ्यांचा विनाश

FOCUS GLOBAL SOUTH

**विश्व व्यापार संघटना (डब्ल्यु.टी.ओ.) प्रणित व्यापाराचे उदारीकरण–**
**शेती आणि शेतकऱ्यांचा विनाश**


| | |
|---|---|
| लेखकः | **अफसर जाफरी** |
| प्रकाशनः | **डिसेंबर २०१६** |
| प्रकाशकः | फोकस ऑन द ग्लोबल साउथ या पुस्तिकेच्या प्रतिंसाठी संपर्क करा<br>**फोकस ऑन द ग्लोबल साउथ,**<br>३३–डी, तिसरा मजला,<br>विजय मंडल एनक्लेव<br>डी.डी.ए. एस. एफ.एस. फ्लॅट्स, कालू सराय, हौजखास<br>नवी दिल्ली– ११००१६<br>टेलिफोनः ९१–११–२६५६३५८८, ४१०४९०२१<br>http://focusweb.org/ |
| **सहयोगः** | **रोझा लक्झमबर्ग स्टिफटुंग, साउथ एशिया**<br>सेंटर फॉर इंटरनॅशनल कोऑपरेशन<br>सी– १५ दुसरा मजला, सफदरजंग डेव्हलपमेंट एरिया मार्केट,<br>नवी दिल्ली– –११००१६<br>www.rosalaux-southasia.org |

Sponsored by the Rosa Lumxeberg Foundation e.V. with funds of the federal Ministry for Economic Cooperation and Development of the Federal Republic of Gerrmany. Goföerdertdurch die Rosa-Zusammenarbeit und Entwicklung der Bundersrepublic Deutschland''

| | |
|---|---|
| **मुखपृष्ठ फोटो साभारः** | Author (unless stated otherwise) |
| **अनुवादः** | **सुहास कोल्हेकर, अलका गाडगीळ** |
| **डिझाइन आणि मुद्रणः** | AP's Design & Prints, Mumbai |



या पुस्तिकेतील मजकुराचे पुनर्मुद्रण वा तो उद्धृत करताना मूळ स्त्रोताचा उल्लेख करावा या अटीवर परवानगी देत आहे. या वृत्तांतातील मजकुराचा वापर वा उल्लेख करण्यात आला आहे अशा साहित्याची प्रत पाठवल्यास फोकस ऑन ग्लोबल साउथ आपले आभारी राहील.

हे एक अभियान प्रकाशन असून ते खाजगी वितरणासाठी आहे.

# अनुक्रमणिका

पार्श्वभूमी – उल्का महाजन
प्रस्तावना
व्यापार उदारीकरणः आयात आत्मनिर्भरतेचा मसुदा
२० वर्षांच्या व्यापार उदारीकरणाचा कृषीक्षेत्रावरील प्रभाव
भारतीय प्रकरणेः खाद्यतेल क्षेत्रावर प्रभाव
डाळः आयातीवर वाढते अवलंबित्व
कापूसः व्यापाराधारित संकटांची जुनी गोष्ट
अन्य विकसनशील देशांतील आयातींच्या लाटेंची प्रकरणे
विश्व व्यापार संघटना (World Trade Organization)
विश्व व्यापार संघटना काय आहे?
विश्व व्यापार संघटनेची वैशिष्ट्ये
विश्व व्यापार संघटतेतील निर्णय घेण्याची प्रक्रिया
विश्व व्यापार संघटनेची मूलभूत तत्त्वे
विश्व व्यापार संघटनेचे उद्देश (Objectives of WTO)
प्रत्यक्ष व्यवहारातील विश्व व्यापार संघटना
कृषीकरार (Agreement on Agriculture)
बाजारात शिरण्याची संधी (Market Access)
दोहा फेरीनंतर बाजारात शिरकाव (Market access after Doha round)
स्वदेशी समर्थन (कृषी अनुदान)
कृषी अनुदानात कपातः एक अयशस्वी मुद्दा
निर्यात अनुदान (Export Subsidy)
विश्व व्यापार संघटनेमध्ये अन्न सुरक्षा आणि अन्नसाठयाचे मुद्दे
विश्व व्यापार संघटनेच्या एकतर्फी निर्णयास भारताचे आव्हान
बालीतील मंत्रीस्तरावरील चर्चेत (२०१३) अन्नसाठयाचे मुद्दे
समेटाचे सशर्त उपकलम (Conditional Peace Clause)
बालीतील मंत्रीस्तरावरील बैठकीनंतरचा घटनाक्रम
नैरोबी मंत्रीस्तरीय बैठकीतून विकसनशील देश रिकाम्या हाताने परतले
नैरोबीत कृषी आणि विकसनशील देशांचे नुकसान

# पार्श्वभूमी

आजही भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा शेती आहे, पण बदलत्या अर्थव्यवस्थेत शेतीचाच कणा मोडायला सुरुवात झाली आहे. देशाच्या प्रत्येक भागातील शेतकरी संकटात आहे. आणि हे संकट आस्मानी तर आहेच कारण जगभर माणसांच्या बेजबाबदार वागण्यामुळे आणि निसर्गाबरोबर चाललेल्या खेळामुळे पर्यावरण बदलते आहे. त्याचा सर्वात जास्त फटका शेती आणि शेतकऱ्याला बसतो आहे. आस्मानी संकटांचा मुकाबला शेतकरी पिढ्यानपिढ्या करीत आला आहे. म्हणून तो कधी कोलमडून पडला नव्हता. परंतु आता देशभरात झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा आकडा तीन लाखांपर्यंत पोहचतो आहे. कोणत्याही संवेदनशील माणसाच्या काळजाचा थरकाप उडवणारी ही गोष्ट आहे. आताचे संकट हे सुलतानी जास्त आहे. नवउदारमतवादी आर्थिक धोरणाच्या नावाखाली सरकारने शेतीशी जे खेळ चालवले आहेत त्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. आजही एवढ्या आत्महत्या झाल्यानंतर सरकार त्याला आळा घालू शकत नाहीये, हे उघड दिसते आहे. केवळ पंधरा हजार ते लाखापर्यंत कर्ज असणारे शेतकरी आज जीवन संपवण्याच्या टोकाला जात आहेत. ज्या व्यवस्थेत आज चतुर्थ श्रेणी कर्मचारी ३०/३५००० कमावतो आहे आणि कार घेण्यासाठी बँका जिथे जाहिरातबाजी करून मध्यमवर्गीय नोकरदारांच्या मागे लागून सहजपणे ४/५ लाखांची उधळण करत असतात त्या व्यवस्थेत देशाचा अन्नदाता असा नागवला जावा हे अत्यंत लांछनास्पद आहे. शेती हा घाट्याचा सौदा आहे, आता शेतीत ठेवलेय काय? अशा गोष्टी आपल्या सतत कानावर पडत असतात. आपल्या देशाचे माजी कृषीमंत्री शेतीत काही दम नाही म्हणून शेतकऱ्यांना शेती सोडण्याचा जाहीर सल्ला देतात, हे अत्यंत खेदजनक आहे. एका बाजूला शेतीव्यवस्था संकटात असणे आणि दुसऱ्या बाजूला जमिनी शेतकऱ्यांकडून काढून घेण्याचे प्रचंड मोठे राक्षसी डाव जागोजाग रचले जाणे हा योगायोग नाही. ते जाणीवपूर्वक घडवून आणले जात आहे आणि त्या बरोबरच कॉर्पोरेट फार्मिंगला कायदेशीर रूप देऊन मोठ्या कंपन्यांनी शेतीत उतरण्याची वाट मोकळी केली जाणे या गोष्टी एकमेकाशी जोडलेल्या आहेत. शेती जर घाट्याचा सौदा असेल तर खाजगी कंपन्या त्यात उतरतील कशाला?

प्रत्यक्षात बियाण्यांबाबतचे धोरण, शेतमजुरांच्या किमान व न्याय्य वेतनाचा विचार, उत्पादन खर्चावर आधारित शेतमालाला हमी भाव, अनुदानाचे धोरण, कृषी उत्पदनाबाबातचे आयात निर्यात धोरण, कीटकनाशके, खते याबाबतचे धोरण, या सर्व पातळयांवर खेळ चालू आहेत. त्यात काही सुधारणा न करता कॉर्पोरेटधार्जिणे धोरण चालू ठेवायचे तसेच फक्त कर्जमाफी करून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटतील असे म्हणायचे हा नुसता कांगावा आहे. कर्जमाफीनंतरही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत हे वास्तव आहे. मग सरकार मानसोपचार तज्ज्ञांना तिथे पाठवून स्वतःचे हात वर करीत आहे. हा प्रश्न फक्त मने कोलमडण्याचा नाही तर त्यांच्यासाठी असलेली व्यवस्था कोलमडण्याचा आहे. उदारीकरण या नावाखाली भारतासारख्या गरीब देशातील शेतकऱ्यांना नागवण्याची धोरणे विश्वव्यापार संघटना राबवताना दिसत आहे. अनेक एकतर्फी व्यापार ''सुधारणा (?)'' लादून शेतकऱ्यांचे संरक्षण

काढून घेतले जात आहे. आपल्याच देशाचे सरकार आपल्याच देशाचे नागरिक असणाऱ्या शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहताना दिसत नाही. जगभर विविध देशांची सरकारे महाकाय भांडवली शक्तींच्याच ताब्यात गेल्याचे चित्र दिसते आहे. राज्यसंस्थांचे हया कॉर्पोरेट्सनी पार खुळखुळे करून टाकले आहेत. अशा आतून पोकळ आणि सत्वहीन, तत्वहीन झालेल्या सरकारपुढे कितीही व्यापक आंदोलने केली तरी फरक पडत नाही असा अनुभव वारंवार येतो आहे. शेतीच्या संकटाला जबाबदार असणारी खरी कारणे जनतेसमोर येताना दिसत नाहीत. अशा स्थितीत विश्वव्यापार संघटनेचा खरा चेहरा, त्यामागची अमेरिका आणि युरोपीय देशांची दुटप्पी नीती, तथाकथित ''खुल्या'' अर्थव्यवस्थेतील गुलामी आणि शोषणाचे डाव आणि त्याला असणारी सरकारची साथ हे वास्तव शेतकरी आणि सामान्य जनता हयांच्यासमोर येण्याची नितांत आवश्यकता आहे. कृषी व्यवस्थेचे स्वयंपूर्ण, 'स्वावलंबी' स्वरूप संपवून ती अधिकाधिक परावलंबी आणि दुबळी केली जात आहे. शेतकऱ्याच्या सुगीची लूट चालू आहे. ह्याबाबत खरी माहिती समोर आणणे आणि शेतकरी आणि सामान्य जनता, ग्रामीण कार्यकर्ते हयांना जागवणे ही काळाची गरज आहे.

या जागरणातून सरकारवर अंकुश ठेवणारी आणि राज्यकर्त्यांना जाब विचारणारी जनशक्ती उभी राहावी हया उद्देशाने रोझा लक्झेंबर्ग फाउंडेशन व फोकस ऑन ग्लोबल साउथ हयांनी सदर पुस्तिका तयार केली आहे. महाराष्ट्रातील जनतेसाठी ती मराठीत भाषांतरित करून देण्याच्या कामात अन्न अधिकार अभियान, महाराष्ट्र हया आघाडीने पुढाकार घेतला. सुहास कोल्हेकर आणि अलका गाडगीळ हयांनी हे सोप्या मराठीत करण्याचा प्रयत्न केला म्हणून ही पुस्तिका वेळेत प्रकाशित होत आहे हयाचा आम्हाला आनंद आहे. ही पुस्तिका वाचून शेती व शेतकऱ्यांची लूट, पिळवणूक थांबवण्यासाठी कृतीशील होण्याची गरज वाचकांना वाटली तरच हे लिहिण्यामागची मेहनत कामी येईल.

**– उल्का महाजन**

# प्रस्तावना

आंतर्राष्ट्रीय मुक्त व्यापाराच्या दृष्टीकोनातून २०१५ हे फार महत्वाचे वर्ष ठरते कारण वीस वर्षांपूर्वी म्हणजेच १९९५ साली विश्वव्यापार संघटनेची स्थापना झाली. गेल्याच दोन दशकांत दक्षिणी देशांतील शेतक-यांच्या स्थितीत काय फरक पडला हा प्रश्नही कळीचा ठरतो कारण कृषीकरारांतर्गत काही विशेष सवलती मिळाव्या अशी मागणी गेली अनेक वर्षे दक्षिणी देश करीत आहेत. परंतु विश्वव्यापार संघटनेवर सत्ता गाजवणारे अमेरिका आणि युरोपीय संघातील देश ही मागणी सतत नाकारत आले आहेत. त्यांची दंडेली एवढ्यावर थांबत नाही. भारत, चीन, इंडोनेशिया, दक्षिण आफ्रिका आणि इतर विकसनशील देशांनी आपल्यां कृषी अनुदानात कपात करावी वा ते पूर्ण बंद करावे यासाठी दबाव टाकण्याचे तंत्र या विकसित देशांनी अवलंबिले आहे. दुसऱ्या बाजूला हे श्रीमंत देश आपल्याा शेतकऱ्यांना मात्र भरघोस अनुदान देत आहेत हे लपून राहिलेले नाही. शिवाय श्रीमंत आणि विकसनशील देशांतील कृषी अनुदानात जमीन-अस्मानाइतका फरक आहे. २०१२ साली अमेरिकेने प्रत्येक शेतकऱ्याला सरासरी ७७,९०१ डॉलर तर भारताने २०१० साली प्रत्येक शेतकऱ्याला सरासरी ९० डॉलर इतके अनुदान दिले होते.[१] भारतापेक्षा अमेरिकेचे अनुदान सरासरी ७८५ पटींनी अधिक होते!

विश्वव्यपार संघटना जागतिकीकरण, मंडईकरण आणि पुनर्वसाहतीकरणाच्या प्रक्रियेतील एक हत्यार असल्यासारखीच आहे. या प्रक्रियेचे पर्यावसान गरिबांचे शोषण आणि त्यांचे दारिद्र्य वाढण्यात झाले आहे. सतत फायद्याच्या मागे लागलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या ही प्रक्रिया चालवण्याचे कार्य करतात. आपला बिझनेस वाढावा म्हणून यजमान देशांतील कायद्यांत या कंपन्या ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी हाराकिरी आणि भूमीगत कारवाया करायलाही त्या मागेपुढे पाहत नाहीत. सामान्य जनांचे हित वाऱ्यावर सोडून दिले जाते.

२० वर्षांपूर्वी मर्राकेश येथे विश्वव्यापार संघटनेची उभारणी केली गेली. स्थानपनेसमयी अविकसित देशांतील उपासमार कमी होईल, रोजगार वाढतील आणि विकासवृद्धी होईल असे दावे करण्यात आले होते. परंतु वास्तवातील चित्र याच्या नेमके उलटे आहे. प्रत्यक्षात भुकेची समस्या तीव्र झाली कारण विकसनशील देशांत अन्नसुरक्षेऐवजी खाद्यान्न निर्यातीला प्राधान्य देण्यात आले. शेतमालाचे भाव घसरले, शेतकऱ्याना वाजवी दरात कर्ज मिळणे दुरापास्त झाले आणि बेरोजगारीमध्ये वाढ झाली. गावांत रोजगार उपलब्धी नसल्यामुळे लोक शहरांत स्थलांतर करू लागले. शहरांवरील ताण वाढला. विकसित देशांतील बहुराष्ट्रीय कंपन्याच्या 'सरस्त्या मालांनी' विकसनशील देशांतील बाजार भरून गेले. या आयात संकटामुळे शेतीवरही सावट आले.

विश्वव्यापार संघटनेचा प्रमुख उद्देश अनैतिक व्यापारास रोखणे आणि मालाचा भडीमार रोखणे

---

*१. या पुस्तकात, डॉलरचा अर्थ अमेरिकी डॉलर आहे. याच्या शेवटच्या पानावर डॉलर व यूरोच्या तुलनेत भारतीय रुपयाची किंमत कुठल्या वर्षी किती होती ते दाखविले आहे.*

असा असला तरी कॉर्पोरेट फायद्यासाठी या गैरव्यवहारांकडे ही संघटना जाणून बुजून दुर्लक्ष करीत आहे. विकसनशील देशांना आपला माल विकण्यासाठी विकसित देशांतील बाजारात प्रवेश देण्यात येईल असे वचन देण्यात आले होते, ते वाऱ्यावर विरून गेले. दुसऱ्या बाजूला अमेरिका, युरोपीय संघातील देश, कॅनडा, इ. विकसित देशांतील अनुदानप्राप्त स्वस्त शेतमालांनी विकसनशील देशांतील बाजार भरून टाकण्यात आले. स्थानिक बाजारातील शेतमालाच्या किंमती त्यामुळे घसरल्या. शेतकऱ्यांना आपला माल कवडीमोलाने विकावा लागला. शेतकरी आणि शेतमजूर देशोधडीला लागले. शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त झाले.

विश्वव्यापार संघटनेच्या स्थापनेनंतर एक दीड दशक कृषी अनुदानाच्या मुद्द्यावरील मतभेदांच्या वावटळीत सापडले होते. गेली दोन वर्षे मात्र तिला संजीवनी मिळून ती कार्यरत झाली आहे. विश्वव्यापार संघटनेच्या चर्चांमध्ये कृषीक्षेत्र पुन्हा केंद्रस्थानी आले आहे. डिसेंबर २०१३ सालात बाली येथील मंत्रीपरिषदेमध्ये शांती अनुच्छेद[२] आणि व्यापार सुलभता करारावर सहमती दर्शवून भारताने विश्व व्यापार संघटनेला नवसंजीवनी दिली असे म्हणणे अतिशयोक्त ठरणार नाही. या कलमांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान आणि अन्नसुरक्षेस धोका ही संकटे येणार हे माहीत असूनही भारताने सहमती दर्शवली होती.

कृषीकरार वेळोवेळी वादाच्या भोवऱ्यात सापडतो. विकसनशील देशांना कृषी अनुदानात वाढ करू देण्यास श्रीमंत देश सतत विरोध करत राहिले. परंतु आपल्या शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या अनुदानात भरघोस वाढ करण्यास ते कचरले नाहीत. विकसनशील देश शेतीस अनुदान देतात तेव्हा ते दोन उद्देशांची पूर्ती करतात. अनुदानामुळे शेतकऱ्यांना निर्वाहाचे साधन मिळते आणि त्यांनी पिकविलेले धान्य खरेदी करून अन्नसुरक्षा प्राप्त करता येते. त्याा उलट विकसित देश देत असलेल्या कृषीअनुदानामुळे त्यांच्या शेतमाल व्यापाराला जबर फायदा होतो. गेली काही वर्षे विश्व व्यापार संघटनेत याच प्रश्नावर वादावादी होते आहे. उत्तरी देशांतील सतत वाढणाऱ्या कृषी अनुदानामध्ये कपात करावी, असे विकसनशील देशांचे म्हेणणे आहे, तर विकसित देश भारताचा अन्नसुरक्षा कार्यक्रम आणि किमान आधारभूत मूल्यांसारख्या (चळपळीीि ीिीिीि ीिलिश) उपक्रमांना विरोध करीत आहेत.

विश्वव्यापार संघटनेतील कृषीविषयक चर्चा 'अन्न विरुद्ध व्यापार' या वादात अडकली आहे. डिसेंबर २०१५ मध्ये केनीयातील नैरोबीत पार पडलेल्या मंत्रीपरिषदेत भारतासारख्या विकसनशील देशांच्या हाती काहीही लागले नाही. विकसनशील देश राबवीत असलेल्या अन्नभांडारांसारख्या उपक्रमांचे विषय चर्चेतून वगळण्यात आले, तसेच दोहा विकास अजेंडयावर चर्चा करण्याचेही टाळले गेले. मात्र घोषणापत्रात गुंतवणूक, प्रतिस्पर्धा धोरण, ईव्यापार, कामगार धोरण, सरकारी खरेदी, हवामान बदलासंबंधित व्यापार धोरण आणि वैश्विक मूल्य शृंखला अशा बहुराष्ट्रीय कंपन्यांना फायदा होणाऱ्या विषयांना चर्चेच्या सूचीमध्ये घालण्याचा प्रयत्न केला गेला.

---

*२. शांति उपबंध - म्हणजे दंडातून सवलतीची व्यवस्था, ज्यात कृषी सब्सिडी १० टक्क्याहून जास्त असल्यास दंडात ४ वर्षांची सूट*

व्यापार उदारीकरणाचे गैरफायदे माहीत असूनही भारत आणि इतर काही देशांची सरकारे मुक्तव्यापार आणि क्षेत्रीय व्यापार करारांसारख्या उपक्रमांचा अंगिकार करीत आहेत. गेल्या दहा वर्षात भारताने श्रीलंका, आसियान (आग्नेय-म्हाणजेच दक्षिण पूर्व देशांचा समुह), दक्षिण कोरिया आणि जपान बरोबर मुक्तव्यापार करार केले आहेत. युरोपीय संघ, न्युझीलँड आणि ऑस्ट्रेलिया सोबतही व्यापारविषयक चर्चा सुरू आहे. या करारांमुळे शेतीवरचे संकट अधिक तीव्र होण्याचा धोका संभवतो. द्विपक्षीय करार विश्वव्यापार करारांपेक्षा धोकादायक ठरू शकतात कारण त्यांच्या प्रक्रियांना गोपनीय ठेवले जाते. प्रभावित समुदायांच्या सल्लामसलतीच्या नावाखाली मोठ्या उद्योग समुहांचे हित विचारात घेतले जाते. मानवी हक्कांच्या दृष्टीकोनातून केल्या गेलेल्या परिणाम मूल्यमापन अभ्यासाचे निष्कर्ष गोपनीय ठेवले जातात, ते प्रसिद्ध केले जात नाहीत. परंतु द्विपक्षीय करारांचा फारसा परामर्श या पुस्तिकेत घेण्यात आलेला नाही. त्या संबंधीची पुस्तिका लवकरच प्रकाशित करण्याचा आमचा मनोदय आहे.

या पुस्तकाच्या माध्यमातून विश्वव्यापार संघटना आणि व्यापार उदारीकरणाच्या विविध पैलूंचा तसेच या करारांचा शेतकरी आणि अन्नसुरक्षेवर काय परिणाम होतो यासंबंधीची माहिती देण्याचा आणि चर्चा करण्याचा प्रयत्न केला आहे. व्यापार उदारीकरणामुळे भारतातील गरिबी, उपजीविकेची साधने, पर्यावरण, मानवी हक्क यांवर काय परिणाम होतात या व्यापार मुद्दयांना समजून घेण्याचा प्रयत्नच येथे केला आहे. या विषयीच्या सर्व मुद्दयांची सार्वजनिक चर्चा होणे गरजेचे आहे.

या पुस्तिकेत सहा विभाग आहेत. त्यापैकी भाग १ ते ५ नैरोबी मंत्रीपरिषदेआधी लिहिले गेले आहेत आणि शेवटचे प्रकरण परिषद पार पडल्यावर, नैरोबी घोषणापत्रावरील चिंतनाच्या स्वरूपात लिहिले आहे.

भाग १- व्यापार उदारीकरण आणि त्याचे विविध मार्ग- बहुपक्षीय, द्विपक्षीय, प्रादेशिक आणि एकतर्फी

भाग २- वीस वर्षांच्या व्यापार उदारीकरणाचा कृषीक्षेत्रावरील परिणामांचा मागोवा

भाग ३- विश्वव्यापार संघटनेबद्दल सर्वकाही-तिचे उद्देश, सिद्धांत आणि निर्णय घेण्याची प्रक्रिया

भाग ४- कृषीकरार आणि त्याचे पैलू (स्ववदेशातील समर्थन, निर्यात सब्सिडी- अनुदान) यांच्या व्याख्या

भाग ५- विश्वव्यापार संघटनेतील आजच्या घडीचा कळीचा मुद्दा- अन्नसुरक्षेसाठी अन्नभांडार

भाग ६- नैरोबी मंत्रीपरिषदेच्या घोषणापत्राचे विश्लेषण

## व्यापाराचे उदारीकरणः आयात आत्मनिर्भरतेचा मसुदा

व्यापार उदारीकरणाचा अर्थ व्यापाराला पूर्णपणे बंधमुक्त करणे होय. म्हणूनच याला मुक्त व्यापार असे म्हणतात. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर व्यापारावरचे निर्बंध काढणे किंवा शिथिल करणे ज्यायोगे एका देशांतून दुस–या देशांमध्ये माल किंवा सेवेचा प्रवाह सुरळीत राहतो. यामध्ये दोनप्रकारचे अडथळे असतात– जकातकर(निर्यात अनुदान, अधीभार) आणि इतर (विक्री किंवा सेवेच्या अधिकृत परवान्याचा कायदा–लायसेन्स,नियम/अटी). व्यापार उदारीकरणासाठी देशांतर्गत धोरणांमध्येही बदल करावे लागतात – उदा. स्थानीय चलनाचे अवमूल्यन, परवान्यांच्या अटींमध्ये शिथिलता, सरकारी नियमांमध्ये शिथिलता आणून गुंतवणुकीच्या संधी वाढवणे, देशी अन्न किंवा निर्वाह पिकांपेक्षा निर्यात पिकांना प्राधान्य देणे, आंतरराष्ट्रीय कंपन्यांना स्थानिक बाजारपेठ उपलब्ध करून देणे इ. व्यापार उदारीकरण आणि स्थानिक बाजार सुधारणा करीत असताना आर्थिक धोरण म्हणून मुक्त आर्थिक व्यवस्था स्वीकारली जाते. त्यामुळे खाजगीकरणाची वाट मोकळी होते. ९०च्या दशकांत भारतासह इतर अनेक विकसनशील देशांमध्येही आर्थिक धोरणांत बदल केले गेल्याचे चित्र दिसून आले होते.

व्यापार उदारीकरण अनेक प्रकारांनी करता येते. कोणताही देश द्विपक्षीय वा बहुपक्षीय करारांमार्फतही व्यापार उदारीकरण करू शकतो. द्विपक्षीय करार अन्य देश किंवा देशसमुहाबरोबर केला जावू शकतो. उदा. भारताने श्रीलंका, दक्षिण कोरिया, जपान आणि 'आसियान' (१० आग्नेय म्हणजेच  दक्षिणपूर्व देशांचे राजकीय आणि आर्थिक संघटन आहे ज्यात ब्रुनेई, कंबोडिया, इंडोनेशिया, लाओस, मलेशिया, म्यानमार, फिलिपीन्स, सिंगापूर, थायलंड आणि व्हिएतनाम सामील आहेत) सोबत मुक्तव्यापार करार केला आहे. या करारांत दोन देशांमध्ये मालाची देवाणघेवाण, विनिमय, व्यावसायिक संबंधाना महत्व, आयात करात कपात किंवा तो न लावणे, आयातकोटा, निर्यातीवर निर्बंध इत्यादी मुद्दे सामील असतात. काही द्विपक्षीय करार दोन्ही देशांत गुंतवणूक वाढवण्यासाठीही केले जातात.

व्यापार उदारीकरणाचा दुसरा एक प्रकार आहे 'प्रादेशिक व्यापार करार', उदा. भारताने दक्षिण आशियायी देशांबरोबर केलेल्या मुक्तव्यापार कराराला 'साफटा (South Asian Free Trade Agreement- SAFTA)  किंवा आसियान (ASEAN Free Trade Agreement) असे म्हणतात.

गेल्या एक दशकापासून द्विपक्षीय आणि प्रादेशिक व्यापार उदारीकरण करारांना तेजी आली आहे. बहुपक्षीय करार करण्याचा प्रकार तसा फार जुना नाही. बहुपक्षीय करारांत एकापेक्षा जास्ती देश असतात आणि ते सगळे एकाच महाद्विपातील असतात असेही नाही. ही करार डब्ल्युटीओ पेक्षाही व्यापक असू शकतो. उदाहरणार्थ सध्या प्रादेशिक सर्वसमावेशक आर्थिक भागीदारीसंबंधी (Regional Comprehensive Economic Partnership-RCEP) भारत आणि १६ देशांत चर्चा सुरू आहे. यात 'आसियान' देशांसोबत ऑस्ट्रेलिया, चीन, जपान, न्युझीलँड, दक्षिण कोरिया सामील आहेत. या बहुपक्षीय कराराचा केवळ आकारच नव्हे तर मुद्देही अधिक व्यापक असू शकतात. म्हणूनच याला महत्वाकांक्षी आणि विशाल करार असे संबोधले जात आहे. उदारीकरणाचा कोणता प्रकार उत्तम असू शकतो हा प्रश्न महत्वाचा नाही. काही देशांचे म्हणणे आहे की साऱ्या पद्धतींचे आपले असे वैशिष्ट्य असते. म्हणूनच बरेच देश व्यापार उदारीकरणाच्या या

साऱ्या पद्धती अंगिकारत आहेत.

गेल्या दोन दशकांत अधिकतर व्यापार उदारीकरण करार म्हणजेच विश्व व्यापार संघटनेच्या माध्यमातून झाले. विश्व व्यापार संघटना – डब्ल्युटीओची स्थापना १९९५ साली झाली होती. विश्व व्यापार संघटना ही केवळ व्यापार बंधमुक्त करण्याचे कार्य करीत नाही त्यासोबत ती देशांच्या सरकारांमध्ये वाटाघाटी घडवून आणून करार मुक्रर करण्यासाठीचे व्यासपीठही ती उपलब्ध करून देते. विश्व व्यापार संघटनेमध्ये सध्या १६२ प्रतिनिधी देश आहेत व १८ करारही तिच्या गाठीशी आहेत. हे करार माल, शेतमाल, बौद्धिक संपत्ती, सेवाक्षेत्र, आरोग्यसेवा आणि पादप स्वच्छता म्हणजेच जंतू–घाणीची स्वच्छता (phyto-sanitary) व्यापारांशी संबंधित आहेत.

द्विपक्षीय आणि बहुपक्षीय पद्धतींबरोबर स्वायत्त उदारीकरण (Autonomous Liberalization) ही सुद्धा एक पद्धत आहे. याला एकतर्फी व्यापार सुधारणाही म्हटले जाते. गेल्या तीन दशकांपासून भारतासोबत इतर विकसनशील देशांमध्ये या प्रकारच्या व्यापार सुधारणा घडून आल्याचे आपण पाहतो आहोत. एकतर्फी धोरण सुधारणांमध्ये विनिमय दर व्यवस्था, विदेशी गुंतवणूक, बाह्य कर्ज, आयात परवाने, आयात शुल्क आणि निर्यात अनुदानाचा समावेश होतो. भारत अन्नावरील आयात कर, जकात कर व कोटा टप्प्याटप्प्याने कमी करत आहे. खरेतर खाद्यान्नावरील जबर आयात करांमुळे भारतातील शेतकऱ्यांना संरक्षण मिळत होते. परंतु आयात करात जसजशी कपात होत गेली तसे परदेशी अनुदानित खाद्यान्नांशी स्पर्धा करणे आपल्या शेतकऱ्यांना कठीण होऊ लागले आहे. भारतात १९९५ पर्यन्त खाद्यतेलावरील आयात कर ४० टक्के इतका होता. त्यानंतर आयात करांत मोठी सवलत देउन तो आता केवळ १० टक्के इतकाच आहे. व्यापार उदारीकरणानंतर कोणत्याही देशाने दिलेल्या कर सवलतींपेक्षा ही सवलत फारच मोठी आहे.

२०१५ सालच्या विश्व व्यापार संघटनेच्या अहवालानुसार १९९५ साली अस्तित्वात असलेला ४० टक्के आयात कर भारताने २०१४ ते २०१५ पर्यंत १३ टक्क्यांवर[३] आणला. कोणत्याही देशाने अंगिकारलेल्या व्यापार उदारीकरणाच्या धोरणापेक्षा हे धोरण अतिशय मवाळ ठरले. अमेरिकेने लादलेल्या व्यापार निर्बंधांचा भारतासारख्या विकसनशील देशावरच नव्हे तर जपानसारख्या पुढारलेल्या देशालाही एकतर्फी व्यापारी उदारीकरण अवलंबिणे भाग पडले. अमेरिकेने १९७४ व्यापार कायद्यातील अनुच्छेद ३०१ नुसार अनेक देशांवर एकतर्फी व्यापार निर्बंध लागू केले. हे निर्बंध अधिकतः अशा देशांवर लागू केले ज्यांनी आपल्या धोरणानुसार अमेरिकी व्यापाराला सीमित केले होते. अशा प्रकारे (General Agreement on Trade and Treaty)– गॅट'च्या नियमांना डावलून एकतर्फी निर्बंध घालण्याचा निर्णय घेण्याचा अमेरिकेने पायंडा पाडला. अमेरिकेने लगोलग आपल्या देशातील व्यापार अधिनियम १९८८ च्या कलम ३०१मध्ये नवीन तरतुदी घालून त्याला अधिक बळकटी आणली आणि त्याचे सुपर ३०१ असे नामकरणही केले.

आज विकसनशील देशांमध्ये अर्थव्यवस्थेचे उदारीकरण आणि व्यापार निर्बंध शिथील करणे हे जणू लोकप्रिय आर्थिक धोरण बनत चालले आहे. आधीच्या दशकांमध्ये आयात कर, कोटा, निर्यात अनुदान आणि तांत्रिक निर्बंध इत्यादी धोरणे राबवली जात होती. विकसनशील देश

*3. http://www.thehindubusinessline.com/economy/indias-average-taroffs-up-marginally-in-4-years-wto review/article7275488.ece*

सुरक्षात्मक उपायांचा त्याग करून मुक्त व्यापाराचा अंगिकार करत आहेत. कोणत्याही देशातील व्यापार उदारीकरणाची स्थिती कशी आहे याचा अंदाज वैश्विक अर्थव्यवस्थेमध्ये त्या देशाचा किती प्रमाणात समावेश झाला आहे यावर अवलंबून असते. असे म्हटले जाते की वैश्विक अर्थव्यवस्थेमध्ये सामील होण्यामुळे देशाचा आर्थिक विकास आणि गरिबी निर्मुलनाला चालना मिळते. परंतु प्रत्यक्षात भारतासहित अनेक विकसनशील देशांतील गरिबी कमी होण्याऐवजी शेतकऱ्यांची स्थिती बिघडत चालली असून ते आत्महत्येस प्रवृत्त होत आहेत.

भारताने आपल्या अर्थव्यवस्थेला उच्च गुंतवणुकीच्या वैश्विक अर्थव्यवस्थेशी जोडून घेतले आहे. परिणामी येथील जीवनावश्यक खर्चात अमाप वाढ झाली आहे तसेच जागतिक बाजारात भारतीय रुपयाचे अवमूल्यन आणि पेट्रोल किंमतीत वाढ झाली आहे. महाराष्ट्रारातील शेतकरी संघटनेचे नेते विजय जावंधिया यांच्या म्हणण्यानुसार ''भारत सरकारच्या लागोपाठ येणाऱ्या वेतन आयोगांमुळे शहरी सुविधांचा उपभोग घेणाऱ्या नोकरदार वर्गाला हवी तेवढी पगार वाढ मिळाली पण शेतकरी व शेतमजुरांसाठी कोणतीही पावले उचलली गेली नाहीत. शेती करणे आता महाग झाले आहे तसेच जीवनावश्यक खर्च वाढत चालला आहे. शेतमालाचे भाव मात्र हेतूपूर्वक कमी ठेवून खाद्य पदार्थांच्या किंमती नियंत्रणाखाली ठेवल्या जात आहेत. अशाप्रकारे भारतातील शेतकऱ्याला दोन्हीकडून मार खावा लागत आहे. शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांमागे ही कारणपरंपरा आहे''.

व्यापार उदारीकरणाचे विकसनशील देशातील एक सत्य म्हणजे आयात शुल्कांत कपात, देशाच्या मिळकतीत घट आणि परिणामी समाजकल्याणकारी शिक्षण, आरोग्य आणि गरिबी निर्मुलनाच्या खर्चात घट करण्यात येते. याशिवाय विश्वव्यापार संघटनेमुळे शेतकऱ्यांच्या हिताची धोरणे आखण्यासही अडचणी निर्माण होतात. उदाहरण सांगायचे झाले तर शेतकऱ्यास आपली परंपरागत निर्वाहाची शेती सोडून निर्यातभिमुख, अधिक गुंतवणुकीची नगदी पिके घेण्यास भाग पडते. मोठ्या शेतकऱ्यांकडे भांडवलाची कमतरता नसते. त्यांच्यासाठी हे बदल जाचक ठरत नाहीत. पण अल्पभूधारकांना मात्र हा बदल जाचक ठरतो. हळूहळू ते कृषीबॅन्क आणि सावकारांच्या सापळयात सापडतात. लहान शेतकऱ्यांमध्ये कर्ज फेडण्याची क्षमता नसल्यामुळे ते आपली जमीन आणि संपत्ती गमावून बसतात. रोजगारासाठी त्यांना शहरात स्थलांतर करावे लागते किंवा मोठ्या मळेवाल्याकडे शेतमजुरी करावी लागते. जमीन असणाऱ्या एकेकाळच्या बळीराजाचे अशाप्रकारे भूमीहीन मजूरात रूपांतर होते.

खाद्यान्नाच्या उत्पादनात बदल झाल्यामुळे खाद्यान्नातील आत्मनिर्भरता धोक्यात येते. सर्वात महत्वाचे म्हणजे घरासाठी लागणाऱ्या डाळ-तांदुळाच्या कमतरतेमुळे अन्नसुरक्षाही धोक्यात येते. सुपीक शेतजमिनींचा वापर नगदी पिके घेण्यासाठी वापरल्यामुळे अन्न उत्पादनावर वाईट परिणाम होतो. मुख्य अन्नधान्यांची पिके देशांतर्गत साठवून न ठेवता त्याची निर्यात केली जाते. त्यामुळे गरीबांचे कुपोषण आणि दुष्काळ इ. संकटांचा सामना करण्यासाठी राखीव धान्यकोठार उभे करण्याची आपली क्षमता कमी होत चालली आहे. अन्नधान्य पिकांमध्ये आपली राज्ये खरेतर आत्मनिर्भर व्हायला हवी होती. त्याऐवजी ती अन्नसुरक्षा कार्यक्रम- लोक वितरण प्रणाली -म्हणजेच रेशनवर अवलंबून आहेत. व्यापार उदारीकरणामुळे ग्रामीण जनतेचे दारिद्र्य वाढत चालले आहे हे एक विदारक सत्य आहे.

# वीस वर्षांच्या व्यापार उदारीकरणाचे कृषिक्षेत्रावरील परिणाम–

सन् १९९० पर्यंत भारताची अर्थव्यवस्था 'बंद आर्थिक व्यवस्था' होती(खुली अर्थ व्यवस्था नव्हती).भारतातील आयातकर सरासरी ८० टक्क्यापेक्षा जास्त होता.९० टक्क्यापेक्षा जास्त उत्पादनांच्या आयातीच्या मात्रेवर बंधन घालून त्यांना सुरक्षित केलेले होते. परदेशी गुंतवणुकीवर कडक प्रतिबंध लावण्यांत आलेले होते.[४] सन् १९९१ मध्ये व्यापारी सुधारणांच्या नंतर अर्थव्यवस्थेला उदार बनवण्यांत आले आणि अश्याप्रकारे भारतांत अंतर्राष्ट्रीय व्यापाराची सुरवात झाली. सन् १९९१ मध्ये देशांत मोठ्या प्रमाणात व्यापार सुधारणा करण्यांत आल्या,त्यापैकी प्रमुख खालील प्रमाणे:

- घाऊक आयातीवरील मात्रात्मक बंधने हटविण्यांत आली,
- आयातकरांत मोठी घट, निर्यांत–उत्पादनांकरिता करण्यात येणाऱ्या आयात करांत विशेष सूट देण्यांत आली.
- विशिष्ट उत्पादनांच्या निर्यातीला मिळणारे प्रोत्साहन, भारतीय रुपयाचे अवमूल्यन करुन बंद करणे, विनिमय दराचा उपयोग निर्यातीला प्रोत्साहन व आयातीवर निर्बंध यावरील उपाय अश्या स्वरुपांत करणे,
- किमान आधारभूत किंमत यासारख्या लहान मोठ्या प्रशासकीय पध्दती नष्ट करणे.

आर्थिक उदारीकरणाच्या सुरवातीला कृषीक्षेत्राचा त्यांत समावेश केलेला नव्हता. विश्वबँकेव्दारा लागू करण्यांत आलेल्या रचनात्मक सुधार कार्यक्रमांच्या केंद्रस्थानी उद्योग होते. एप्रिल १९९४ मध्ये मार्राकेश, मोरोक्को येथे भारताने डब्ल्यू टी ओ च्या कृषि करारनाम्यावर हस्ताक्षर केले, तेंव्हा कृषीक्षेत्राच्या नीतीत, खरे बदल करण्यांत आले. यानंतर कृषीक्षेत्रांतील व्यापाराच्या उदारीकरणासाठी अनेक पावले उचलली गेली. त्यांत १९९४ ते १९९६ दरम्यानच्या कठोर सुधारणांचाही समावेश आहे. त्याची काही ठळक उदाहरणे अशी:

१. जानेवारी१९९४ मध्ये सरकारने बासमती तांदुळावरील किमान निर्यातमूल्य बंद केले.
२. मार्च १९९४ मध्ये साखर व कपाशीवरील आयात नियंत्रण हटविले आणि
३. फेब्रुवारी १९९५ मध्ये जवळजवळ सर्वच खाद्यतेलांना( फक्त खोबरेल तेल वगळता) खुल्या सामान्य परवाना (लाईसन्स)च्या श्रेणीत टाकून दिले.

---

*4. http://www.adb.org/sites/default/files/publication/28258/economics-wp177.pdf*

याच दरम्यान जमीन व बीज यासंबंधीचे राष्ट्रीय कायदे देखील बदलले जात होते. त्यांनी देखील कृषीक्षेत्रातील व्यापाराच्या उदारीकरणाला पुढे नेण्याच्या कामास हातभार लावला. अश्याप्रकारे शेती व बीज पुरवठा यांना बहुराष्ट्रीय कम्पन्याच्या हाती जाऊ दिले. लवकरच कमी किंमत आणि उत्पादनांतील चढउतार यामुळे व्यापार-उदारीकरणाचे गंभीर परिणाम दिसू लागले. नवीन बियाणें व अन्य सामुग्रीच्या वापरामुळे उत्पादनातील चढउतार वाढू लागले. त्यासोबत खाद्यान्न नसलेल्या बहुतांश पिकांच्या किमतींत घट झाली.शेतक-याच्या कापूस व तेलबीया यांच्या किमती तर दीर्घकाळापर्यंत घटतच गेल्या. यामुळे केवळ घरगुती मागणीच्या स्थितीचाच अंदाज आला असे नाही तर अंतर्राष्ट्रीय किमतींचे वाढते परिणामही दिसून येतात.

## भारतीय प्रकरणेः खाद्यतेल क्षेत्रावर प्रभाव

कृषीकरारनामा आणि व्यापार उदारीकरण यामुळे, विशेषत: आयात-निर्यातीच्या मात्रेवरील निर्बंध हटविल्यामुळे भारतांत आयातीचा महापूर आला. अन्य विकसनशील देशांत देखील हीच परिस्थिती निर्माण झाली. भारतात स्वस्त उत्पादनांची आयात होऊ लागली, त्यामुळे घरगुती वापराकरिता, स्थानिक बाजाराकरिता जी उत्पादने करण्यात आली होती, त्यांच्या किमती नाईलाजाने घटवाव्या लागल्या. उदाहरणार्थ, इंडोनेशियातून आयात झालेल्या स्वस्त नारळामुळे इथल्या नारळाच्या किंमतीत ८० टक्के घट झाली. भारतात आयातकर कमी झाल्याचा परिणाम म्हणून मलेशियातून खूप मोठे अनुदान मिळालेले सोयाबीनचे व पामतेल(ताडाचे तेल) बाजारांत येऊ लागले. सन् २०१५ च्या ऑगस्ट महिन्यापर्यंतच भारतांत १३.३३ लाख खाद्यतेल आयात झाले. मागील दोन दशकांत हे सर्वाधिक आहे.[५] सॉलव्हंट एक्सट्रॅक्टरस् असोसिएशन या तेलगाळकांच्या संघटनेनुसार सन् २०१४-१५ मध्ये वनस्पती तेलाच्या आयातीने १४६.१ लाख टन हा उच्चांक गाठला, जो मागील वर्षाच्या तुलनेत २३.६४ टक्के जास्त आहे.[६] भारतीय उत्पादकांच्या म्हणण्यानुसार आयात केलेल्या उत्पादनांच्या स्वस्त दरामुळे स्थानिक शेतकरी स्पर्धेतून बाहेर फेकला जातो आहे आणि त्याचा व्यवसाय नष्ट होतो आहे. आता भारत, बाहेरच्या पुरवठादारांवर अवलंबून आहे. भारतात खपणाऱ्या (वापरल्या जाणाऱ्या) जवळजवळ ७0टक्केपेक्षा जास्त वनस्पती तेल आम्हाला विदेशी व्यापा-यांकडून मिळते आहे.

खाद्य तेलातील उदारीकरणाची गोष्ट [७]

मागील २० वर्षे, भारतात चालत आलेल्या व्यापार उदारीकरणचे सर्वांत गंभीर परिणाम तेलबीया क्षेत्र आणि खाद्यतेल उद्योग यांत दिसून येतात,ते असे....

१.आत्मनिर्भरतेकडून आयातनिर्भरतेकडे.

२.छोटे उद्योगआधारित अर्थव्यवस्थेतून बहुराष्ट्रीय कम्पन्यांच्या अधिपत्त्याकडे,

*5. http://articles.economictimes.indiatimes.com/2014-09-15/news/53943093_1_vegetable-oil-imports-soyabean-oil-palm-oil*
*6. http://indiatoday.in/story/india-imports-record-14.61-mt-vegetable-oil-in-2014-15/1/524260.html*
*7. http://siccfm.blogspot.in/2012/01/trade-liberalization.and.impact-on.html*

३.सुट्यातेल विक्रीकडून ब्रॅन्डेड व पॅकेजड् तेल विक्रीकडे.

या दरम्यान विक्री व उपभोगाच्या पध्दतीत देखील बदल दिसून आले. ग्राहक आता पारंपरिक तेलांऐवजी, ताडतेलासारख्या खाद्यतेलांचा देखील वापर करु लागले होते. खाद्यतेल क्षेत्र हे एक असे उदाहरण आहे, ज्यांत बहुराष्ट्रीय कम्पन्यांनी सर्व प्रकारच्या खाद्यतेलांवर आपली मक्तेदारी कशा प्रकारे स्थापन केली.

हे पूर्ण क्षेत्र कारगील, कोनआगरा, बुंगे अश्या मूठभर बहुराष्ट्रीय कम्पन्यांनी फार झटकन काबीज केले. यावरुन आमच्या म्हणण्याला दुजोरा मिळतो की, डबल्यू टी ओ आणि मुक्त व्यापार करारनामे ज्या व्यापाराच्या उदारीकरणाची वकिली करत आहेत, ते प्रामुख्याने बहुराष्ट्रीय कम्पन्यांच्याच फायद्यासाठी आहेत.

**खाद्य तेल क्षेत्रांत व्यापार उदारीकरण:**

खाद्यतेल क्षेत्रातील व्यापार उदारीकरणाबद्दलचे भारताचे अनुभव फारच कडवट आहेत. त्यामुळे मागणी व उत्पादन यातील तफावत बरीच वाढली आहे.मागणी व उत्पादन यांत मोठी तफावत पहिल्यांदा १९८०च्या दशकांत दिसून आली. १९८८ मध्ये जेव्हा २० लाख टन तफावत झाली, त्यावेळी भारताला जवळजवळ १०० करोड अमेरीकी डॉलर खर्चून १९ लाख टन खाद्यतेल आयात करावे लागले होते.

खाद्य तेल आयातीमुळे जेंव्हा भारताचा विदेशी मुद्राकोश रिकामा होऊ लागला, तेंव्हा भारत सरकारने उत्पादन वाढविण्याकरिता अनेक पावले उचलली. यापैकीच एक म्हणजे तेलबीयांकडे उत्पादकांना आकर्षित करण्याकरता सन् १९८६ मध्ये तेल बियांवर संशोधन व तंत्रज्ञानास चालना देणाऱ्या प्रौद्योगिकी मिशनची स्थापना करण्यांत आली. यामुळे पुढील ६ वर्षांत तेलबीयांच्या उत्पादनांत ७० टक्के वाढ झाली. भारत आपल्या गरजेच्या ९८ टक्के उत्पादन करुन आत्मनिर्भर बनला.

अश्याप्रकारे सन् १९८६–८७च्या १५ लाख टन आयातीत घट होऊन सन् १९९२–९३ला ती केवळ १ लाख टन एवढीच उरली. परंतु खाद्य तेलाची ही आत्म निर्भरता फार काळ टिकू शकली नाही, विश्वबँकेच्या रचनात्मक सुधार कार्यक्रमाच्या दबावामुळे सन् १९९४–९५मध्ये खाद्यतेलांच्या व्यापाराचे टप्प्याटप्प्याने उदारीकरण सुरु केले गेले.

ह्याच काळांत मलेशिया, इंडोनेशिया, अर्जेंटिना आणि ब्राझिल सारखे खाद्यतेल निर्यातक देश आपले पामतेल आणि जी एम् सोयाबीन तेल भारताच्या बाजारांत भरण्याकरिता वाट बघत होते. एका दशकातच व्यापार उदारीकरणाने स्थिती पूर्ण उलटवली आणि आत्मनिर्भर भारत खाद्यतेल आयात करणारा देश बनला. त्यावेळी भारताने खाद्यतेल क्षेत्रांत खालीलप्रमाणे पावले उचलली होती–

- सन् १९९४ मध्ये पामोलीन तेलाला 'खुला सामान्य परवाना(लाईसन्स)' या श्रेणीत स्थान

देऊन खाद्य तेलाच्या आयातीवरील राज्याचे एकाधिकार समाप्त केले. त्यावर आता आयातकर केवळ ६५ टक्केच लागतो. नंतर अन्य खाद्य तेलांनाही अश्याच 'खुला सामान्य परवाना(लाईसन्स)'या श्रेणीत स्थान दिले गेले.

- डबल्यू टी ओ अंतर्गत सर्व कच्च्या व रिफाईंड तेलांवर ३००टक्के आयकर लागतो (सोयाबीन तेल सोडून,त्यावर तो केवळ ४५ टक्के आहे)पण तरीही भारताने खाद्य तेलांच्या आयातकरांत वेगाने घट केली. सन् १९९४ मध्ये हा ६५टक्के होता, सन् १९९६ मध्ये तो कमी करुन २०टक्के करण्यांत आला व १९९८ ला तो केवळ १५ टक्केच उरला.
- आयातीच्या प्रमाणावरील मात्रात्मक निर्बंध काढून त्याऐवजी आयात शुल्क लागू करण्यांत आले. हे सर्व डब्ल्यू टी ओ अंतर्गतच्या 'बाजारांत खुला प्रवेश' देण्याच्या नावाखाली करण्यांत आले. पण खरेतर हा निर्णय अमेरिकेच्या सूजन एस्सरसन (वाणिज्य विभाग)आणि एन् एन् खन्ना(वाणिज्य मंत्रालय, भारत सरकार) यांच्यामध्ये, अतिशय अपारदर्शक व लोकशाही विरोधी पध्दतीने एका व्दिपक्षीय चर्चेच्या दरम्यान करण्यांत आला. या वेळी असा निर्णय घेण्यात आला की, १ एप्रिल २००० ते १ एप्रिल २००१ या कालावधींत १४२९ वस्तूंना मात्रात्मक निर्बंध यादीतून वगळण्यांत येईल.

खाद्य तेल निर्मितीतील व्यापारीकरणाचे वाईट परिणाम लगेच दिसू लागले होते. उदारीकरणाचे हे प्रयत्न आणि १९९९ मध्ये झालेली खाद्यतेलाच्या अंतरराष्ट्रीय किंमतीतील मोठी घट यामुळे भारतात स्वस्त खाद्यतेलांचे, विशेषत:सोयाबीन आणि पामोलीन तेलाचे 'डम्पिंग' (अनावश्यक साठवण) होऊ लागले. सन् २००२-०३ मध्ये खाद्यतेल आयात १९९२-९३ च्या तुलनेत,एक लाख टन यापासून वाढून ४३ लाखटन झाली.अश्याप्रकारे या १० वर्षांत खाद्यतेलाबद्दलची आत्मनिर्भरता, जी १९९४-९५ मध्ये ९८ टक्के होती यात सन् २००२-०३ मध्ये घट होऊन ती केवळ ५३ टक्के झाली. तसेंच सन् २००२-०३ मध्ये एकंदर कृषी आयातीपैकी खाद्यतेल आयात, जी १९९१-९२ मध्ये ६ टक्के होती, त्यात वाढ होऊन ती ५२ टक्के झाली. भारत तेल घाण्यांची निर्यांत करणारा देश होता. ही निर्यांत सन् १९९३-९४ मधील ४८.४ लाख टन पासून घट होऊन २००२-०३ मध्ये ती १६.१ लाख टन झाली. स्वस्त आयात खाद्यतेलांच्या महापूरामुळे तेलबीयांच्या किमतीत प्रचंड घसरण झाली. यामुळे भारतातील तेलबीया पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची मोठी हानी झाली.(...शेतकऱ्यांवर विनाशकारी परिणाम झाले). सन् १९९९ मध्ये वर्तमानपत्रातून अश्या बातम्या येऊ लागल्या की, मोठ्या प्रमाणांत शेतकऱ्याना आपल्या तेलबियांची विक्री किमान आधारभूत किमतीपेक्षा ही कमी किंमतीत करणे भाग पडते आहे. पण तरीही सरकारने अजिबात हस्तक्षेप केला नाही. जेंव्हा योग्य किंमत मिळणे बंद झाले, तेंव्हा शेतकऱ्यांचा नाईलाज झाला, त्यांनी तेलबियांची लागवड करणे कमी केले. एवढेंच नाही तर डबल्यू टी ओ नंतर अंतरराष्ट्रीय किमतीतील चढ उतारांमुळे, घरेलू उत्पादनांच्या (स्थानिक बाजारपेठेतील) किमतींत फारच अस्थिरता देखील आली.

**नारळाच्या अर्थव्यवस्थेवरील परिणाम**

खोबरेल तेलाचा 'खुला सामान्य परवाना '(लाईसन्स) या श्रेणीत समावेश आणि ९० च्या दशकांत आयातकर कमी करण्यात येणे, यामुळे नारळाच्या किमतीत झपाट्याने घट झाली. खोबरेलतेलाची सरासरी किंमत सन् १९९६-९७ मध्यें रु.५५५३ प्रति क्विंटल (एक टन म्हणजे दहा क्विंटल) होती, त्यांत घट होऊन सप्टेंबर २000 मध्ये ती केवळ रु.२५00प्रति क्विंटल एवढीच झाली. सन् २000 ते २00५ या दरम्यान ही किंमत रु.६७५८ प्रति क्विंटल पर्यंत पोहचली.सन् २00५-0६ मध्ये त्यांत घट होऊन ती रु.५0७८ झाली आणि २00७ मार्च पर्यंत यांत आणखी घट होऊन ती रु.४८00 झाली. एवढेंच नाही तर ओल्या नारळाची किंमत १९९५ च्या आसपास रु.१0 प्रतिनग होती, ती घटून प्रतिनग रु.२-३.झाली. नारळाच्या घटत्या किंमती हा शेतक-यांच्या गंभीर चिंतेचा विषय होता, कारण त्यांचे दररोजचे नगदी उत्पन्न कमी झाले. दर वर्षी नारळाची किंमत घटतच होती. उदाहरणार्थ १९८८-८९ मध्ये त्याची किंमत रु.४५0 प्रति शेकडा (रु.४.५ प्रति नग) होती, सन् १९९७ मध्यें त्यांत थोडी वाढ होऊन ती रु.६५0 प्रति शेकडा झाली पण २00७-0८ मध्ये त्यांत परत घट होऊन ती रु.४५0 आणि २00९-१0 मध्ये ती केवळ रु.२५0 प्रति शेकडा राहिली.

नव्वदच्या दशकापासून नारळाच्या किंमतीत घट होण्याचे मुख्य कारण, कच्च्या व रिफाईंड पामोलीन तेलावरील (आयात) करदरांत सतत होणारी घट, हे आहे. सन् १९९४ ते२00५ पर्यंत पामोलीन तेलावरील करदर ११ वेळा बदलला गेला, त्यामुळे सहाजिकच नारळ आणि त्याच्या उत्पादनांच्या किमतीच्या स्थिरतेवर परिणाम झाला.एक मोठा धक्का एप्रिल २00८ मध्यें बसला, जेंव्हा सर्व कच्च्या खाद्य तेलांवरील आयातकर पूर्णपणे रद्द करुन तो शून्य केला गेला.

रिफाईंड तेलावरील करांतही घट करुन तो ७.५ टक्के केला गेला. याचे कारण सांगितले गेले की,वाढती महागाई आणि खाद्य तेलाची वाढती मागणी याला भिडण्यासाठी असे करणे आवश्यक होते. परंतु यामुळे खाद्य तेलांच्या आयातीत मोठी वाढ झाली. वर्ष२00७-0८ मध्ये आयातीत वाढ होऊन ती ५६.१ लाख टनावरून वाढून २00९-१0 मध्ये आयात ८८.२ लाख टन झाली.

सन् २00९ आणि २0११ च्या दरम्यान दोन मोठे बदल आले, ज्यामुळे परिस्थिती अधिकच बिघडली. या बदलांमुळे दक्षिण-पूर्व आशियाई देशांमधून, विशेषतः मलेशिया व इंडोनेशिया मधून फार मोठ्या प्रमाणांत पामोलिन (ताडाच्या) तेलांच्या आयातीत वाढ झाली. हे बदल आहेत...

(१) भारत व आशियाई देशांत मुक्त व्यापार करार,जो १३ ऑगस्ट २00९ रोजी बँकॉक येथे करण्यात आला आणि तो १ जानेवारी २0१0 पासून लागू झाला आणि

(२) दि. ११ जून २0११ला भारत आणि मलेशिया यांच्यात 'वृहद आर्थिक सहकार्य करार- (कॉम्प्रेहेन्सिव्ह ईकॉनॉमिक कोआपरेशन ॲग्रीमेंट).

खालील तक्त्यांत, आशियाई देशांसोबतच्या व्यापार उदारीकरणाचे भारतावर झालेले परिणाम दिलेले आहेत. या तक्त्यावरुन हे स्पष्ट होते की, ताड तेल आणि पामोलीन यांची एकत्रित

**तक्ता....**

| वर्ष (नोव्हेंबर –ऑक्टोबर) | रिफाइंडतेल आर् बी डी पामोलीन | – ताड | कचेचे तेल सूर्यमुखी | – सोयाबीन | – – | कुल अन्य |
|---|---|---|---|---|---|---|
| २००८–०९ | १२.४० | ५१.८७ | ५.९० | ८.९० | १.७६ | ८१.८३ |
| २००९–१० | २१.१३ | ५१.६९ | ६.३० | १६.६६ | १.४० | ८८.२३ |
| २०१०–११ | १०.८२ | ५३.७४ | ८.०४ | १०.०७ | ०.९९ | ८३.७१ |
| २०११–१२ | १५.७७ | ५९.९४ | ११.३५ | १०.७९ | १.९६ | ९९.८१ |
| २०१२–१३ | २२.२३ | ५८.८९ | ९.७३ | १०.९१ | २.०७ | १०३.८५ |
| २०१३–१४ | १५.७६ | ६२.५३ | १५.०९ | १९.५१ | ३.२९ | ११६.१८ |

स्रोत : राज्यसभेंत श्री. आनंद शर्मा यांनी खाद्यतेलाचे उत्पादन व मागणी या विषयांत विचारलेला तारांकित प्रश्न क्र.२०१, ज्याचे उत्तर कृषीमंत्री यांनी ७ ऑगस्ट २०१५ रोजी दिले.

*http://nmoop.gov.in/Parliament_Question/PO_207_07-08-2015_starred.pdf*

## डाळः आयातीवर वाढते अवलंबित्व

भारत जगातील डाळींचा सर्वांत मोठा उत्पादक पण आहे आणि उपभोक्ता देखील आहे. पूर्ण जगभरातील २५ टक्के डाळींचे उत्पादन इथेच होते आणि जगभरातील डाळीच्या वापरातील २७ टक्के वापर(खप) देखील इथेच होतो. गमतीची गोष्ट अशी की, डाळींची सर्वाधिक आयात(१५ टक्के) करणारा देश देखील भारतच आहे.

'व्यापारविषयक बुध्दिमत्ता व सांखिकी भागाच्या संचालनालय' यांच्यानुसार, सन् २००१–२००२ भारताने २२ लाख टन डाळींची आयात केली, ज्यांत सन् २००४–०५मध्ये घट होऊन ती१३ लाख टन झाली. सन् २००४–०५ नंतर डाळींच्या आयातीत सतत वाढ झाली आणि सन् २०१२–१३पर्यंत ही आयात ३८ लाख टन इतकी झाली.[८] किमतीच्या भाषेत बोलायचे तर असे दिसते की,२००१–०२ मध्यें एकंदर ७० करोड अमेरिकी डॉलरची आयात झाली. त्यांत २०१२–१३ त वाढ होऊन ती २३० करोड अमेरिकी डॉलर झाली. हे शक्य होण्याचे कारण असें की, डाळींचा 'खुला सामान्य परवाना' (लाईसन्स) या श्रेणीत समावेश करण्यात आला. मागील ३७ वर्षांपासून[९] भारत डाळींची आयात करीत आला आहे.

साधारण २५ वर्षांपूर्वी केवळ ४ लाख टन डाळींची आयात होत असे. या वर्षी मात्र यात वाढ

8. *http://www.thehindubusinessline.com/economy/agri-business/pulses-import-surges-to-record-41-mt-article7154938.ece*
9. *http:/www.orissadiary.com/ShoeBusinessNews.asp?id=62336*

होऊन आयात ७५ लाख टन होईल अशी दाट शक्यता आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणांत डाळींची आयात ज्या कारणाने शक्य झाली ते असे की, भारताने आपला आयातकर बराच कमी केला. सन् २००१ मध्ये हा आयातकर ५ टक्के होता. यांत वाढ होऊन मार्च २००३ मध्ये तो १० टक्के करण्यांत आला. परंतु जून २००६ नंतर हा पूर्णपणे रद्द करण्यात आला. आयात शुल्क नसल्यामुळे २०१४–१५ मध्ये सर्वाधिक म्हणजे ४१ लाख टन डाळींची आयात झाली. हा आत्तापर्यंतचा उच्चांक आहे. इतक्या प्रचंड प्रमाणांत डाळींची आयात होत असून देखील डाळींच्या किमती गगनाला भिडत आहेत. मागील दोन–तीन वर्षांत डाळी तिप्पट महाग झाल्या आहेत.याचे उदाहरण म्हणजे नोव्हेंबर २०१५ या महिन्यांत तूरडाळ रु.२०५ प्रतिकिलो या दराने विकली जात होती. दर वाढले म्हणून सरकारने आणखी जास्त प्रमाणांत डाळींची आयात केली.

हे माहीत होते की, अंतरराष्ट्रीय बाजारांत डाळींची कमतरता आहे आणि उत्पादक देश चढ्या दराने डाळी विकत आहेत, तरीही डाळीं महाग झाल्यामुळे गरीबांना त्यांच्या या एकमात्र प्रथिन स्त्रोतापासूनही वंचित रहावे लागत आहे. यामुळे देशातील मोठ्या जनसंख्येवर कुपोषणाच्या धोक्याचे सावट पसरले आहे.

## कापूस: व्यापारनिर्मित संकटाची जुनी गोष्ट

सन् २०१४–१५ मध्ये पुन्हा कापसाच्या अंतर्राष्ट्रीय किमतीत घसरल्या. अश्या प्रकारची घसरण सन् २००२–०६ च्या दरम्यानही दिसून आली होती. किंमत कमी झाल्यामुळे भारतीय कापड मिल व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणांत कापूस आयात करणे भाग पडले. तसेंच शेतकऱ्यांना वाचविण्याकरिता सरकारला त्यांचे उत्पादन किमान आधारभूत किमतीला खरेदी करणे भाग पडले. बऱ्याच काळापासून कापसाची अंतर्राष्ट्रीय बाजारातील किंमत स्थानिक(घरेलू) बाजारातील किमतीपेक्षा बरीच कमी आहे.त्यामुळे सन् २०१३–१४ च्या तुलनेत सन् २०१४–१५ मध्ये कापसाच्या निर्यांत मूल्याच्या आधारे बघता ४८ टक्के घसरण आली.त्याच बरोबर कापसाची आयात १२.७१ लाख गाठी(बेल्स)[10] वरुन वाढून सन् २०१४–१५ मध्ये १५.२२ गांठी झाली.[11] जानेवारी २०१५ मध्यें कापसाची अंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत घसरून प्रति पाऊंड ५७.०५ सेंटस् एवढीच झाली. मागील पांच वर्षातील ही सर्वांत कमी किंमत आहे. जेंव्हापासून कृषी क्षेत्राला मुक्त जागतिक व्यापाराकरिता खुले करण्यांत आले, तेंव्हापासून कापसाची अंतर्राष्ट्रीय बाजारातील किंमत सतत घटत गेली आहे.

भारतीय कापूस उत्पादकांना २००० च्या दशकाच्या सुरवातीपासूनच व्यापार उदारीकरणाचे कडवट अनुभव येऊ लागले होते. स्थानिक (घरेलू) बाजार खुला केल्यानंतर भारतीय कापूस उत्पादकांची पश्चिमेकडील, विशेषत: अमेरिकेतील, ज्यांना तिथे भरपूर अनुदान मिळते अशा, कापूस उत्पादकांशी स्पर्धा होऊ लागली. त्यासोबतच आमच्या शेतकऱ्यांवर अंतर्राष्ट्रीय

---

*10.(1 (bale) = 170 kg, 1 pound=453.59 gram or 1kg - 2.2 Pound) 1000 kg = 1 ton*
*11. http:/agricoop.nic.in/imagedefault/trade/CTN_172.pdf*
*12. http:/www.bloomberg.com/news/artciles/2015-02-04/india-farmer-suicides-on-rise-as-cotton-slump-spurs-debts*

बाजारातील किंमतीच्या उतार-चढावांचेही ओझे वाढू लागले. एवढेच नाही तर भारताच्या स्थानिक बाजारात देखील विदेशी कापूस स्वस्त दरांत येऊ लागला आहे.आयात कर खूपच कमी झाल्यामुळे विदेशी उत्पादकांना हे फार सोपे होते. त्याना भरपूर अनुदान मिळत असल्याने त्यांची उत्पादने बरीच स्वस्त होती.

अमेरिकेने १९९८ -२००२ च्या दरम्यान आपल्या जवळजवळ २५,००० कापूस उत्पादकांना १४.८ बिलियन(म्हणजे १४८० करोड)[13] अमेरीकी डॉलर्सचे अनुदान दिले. असे करुन कापसाचे दर जाणीवपूर्वक घसरवण्यात आले, जेणे करुन अंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर अमेरिकेला कब्जा मिळवता आला. पूर्वी या बाजारांत बुर्किना फासो, बेनिन, माली अश्या गरीब आफ्रिकी देशांचा माल येत असे. पण ते आता अमेरिकेपुढे कुणीही टिकू शकत नाहीत. यामुळेच अंतर्राष्ट्रीय बाजारात कापसाच्या किंमतीत सतत घट होते आहे. सन् १९९४ मध्ये कापसाची किंमत प्रती पाऊंड १.१० अमेरिकी डॉलर होती. सन् १९९७ मध्ये त्यांत घट होऊन ती ०.४० अमेरिकी डॉलर झाली. सन् १९९८-२००० दरम्यान ही किंमत थोडी वाढून ०.४७ अमेरिकी डॉलर झाली. एवढ्या कमी किंमतीत उत्पादन करणे आमच्याकडील सर्वांत कुशल शेतकऱ्यालाही शक्य झाले नाही. अंतर्राष्ट्रीय खाद्य नीती शोध संस्थेने (इंटरनॅशनल फूड पॉलिसी रिसर्च इंस्टीट्यूटने)आफ्रिकी देश बेनिन बद्दलच्या एका अहवालांत म्हटले आहे की, किंमतीत ४० टक्के घट झाल्यामुळे कापूस लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नांत २१ टक्के घट होईल आणि ग्रामीण भागांत ६ ते ७ टक्के गरिबी वाढेल.[14] यांच काळांत आम्ही भारतातही बघितले की,विदर्भातील कापूस लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये कर्जबाजरी होण्यांत खूप वाढ झाली. याच कारणामुळे शेतकऱ्यंनी केलेल्या आत्महत्त्यांमध्ये पण वाढ झालेली आहे.

## अन्य विकसनशील देशातील आयात लहरींची उदाहरणे

आयातीत आलेल्या महापूराची विश्वभरांत अनेक उदाहरणे मिळतील. संयुक्त राष्ट्राच्या 'अन्न आणि कृषी संस्थेने'(फूड अँड अॅग्रीकलचर ऑरगनायझेशनने) सन् २००३ पर्यंत अश्याप्रकारे आयातीत अचानक आलेल्या महापूरांचा अभ्यास केला.

सन् १९८० ते २००३ या दरम्यान 'अन्न आणि कृषी संस्थे'ला असे दिसून आले की, १०२ विकसनशील देशांतील जवळजवळ २३ खाद्य समुहांवर ७१३२ ते १२,१६७ वेळा आयातीचा महापूर आला. यावरुन असे दिसून येते की,अधिकाधिक देश जे आधी अन्न निर्यांत करीत होते, ते आता अन्न तुटवड्याने ग्रस्त होत, आयात करणारे देश होऊ घातले आहेत. सन् २०००च्या तुलनेत २००७ मध्ये कमी विकसित देशांचा आयात खर्च जवळजवळ ९०टक्के जास्त होता.

याच काळांत विकसनशील देशांमध्ये खाद्य आयात खर्चात २२ टक्के वाढ झाली. वर्ष २००७ मध्यें

13. http:/cip.cornell.edu/DPubS/Repository/1.0/Disseminate?view=body&id=pdf_1&handle=dns.gfs/12-00428204
14.http:/indiatogether.org/cotton-opinions

जागतिक अन्न आयात खर्च ७४५ अरब अमेरिकी डॉलर्स होता.हा २००६ च्या तुलनेत २१टक्के जास्त होता. ह्यापैकी २३३ अरब अमेरिकी डॉलर्सचा खर्च विकसनशील देश करत आहेत. 'अन्न आणि कृषी संस्थे'ने गरीब विकासशील देशांना आधीच इशारा दिला होता की, अश्याप्रकारे वाढत्या अन्न आयात खर्चाचा थेट परिणाम, अन्नवापरावर पडेल, त्यामुळे कुपोषणाची परिस्थिती अधिकच गंभीर होत जाईल .[१५]

'अन्न आणि कृषी संस्थे'च्या अहवालांत[१६] अन्न आयातीतील महापूराची अनेक उदाहरणे आहेत...जसे केनियात मका, साखर व दुग्ध उत्पादने, घानामध्ये तांदुळ, टमाटे व कोंबडी, केमरूनमध्ये कोंबडी, तांदुळ व वनस्पती तेल, टांझानियामधे तांदुळ व दुग्ध उत्पादने, मोजांबिक मध्ये कोंबडी व वनस्पती तेल, कोटे डी आइवर मध्ये तांदुळ, कोंबडी व साखर, होंडूरस मध्यें तांदुळ, फिलिपिन्समध्यें तंबाखू व कांदे आणि श्रीलंकेत दुग्ध उत्पादने.

अन्न आयातीतील महापूराची अनेक कारणे आहेत. जसें व्यापाराचे उदारीकरण, स्थनिक पिकांचे समर्थन थांबविणे,सरकारचा निर्यातीवर भर, मार्केटिंग बोर्डाचे विघटन, अंतरर्राष्ट्रीय वित्त संस्थांचा दबाव आणि विनिमय दरांत चढ-उतार इत्यादी. जेंव्हा पश्चिमी आफ्रिकी देश घानाने तांदुळावरील आयात करांत कपात करुन तो २० टक्के केला तेंव्हा तिथे तांदुळाची आयात दुप्पट झाली. केमरुनने आयातकर २५ टक्के घटवल्यावर तिथे कोंबडी(पोल्ट्री)ची आयात सहा पट वाढली. याशिवाय ही काही इतर कारणे आहेत, जसें...डम्पिंग, निर्यातक देशांतील अनुदानाची भूमिका, खाद्य अनुदान इत्यादी. युरोपीय संघाच्याच दुग्ध निर्यातीमुळे जमाईका, कीनिया, श्रीलंका आणि डोम्निकन रिपब्लिक येथील हजारो छोटे शेतकरी बरबाद झाले.[१७]

अन्न आयातीच्या महापूरामुळे भयानक मानवी आणि आर्थिक नुकसान होते. यामुळे विविध विकसनशील देशांतील कृषीक्षेत्रांत बेरोजगारी वाढली आहे. अनेक वेळा याचे परिणाम गरिबीत वाढ व खाद्यसुरक्षेत घसरण या रुपातही आढळून आले आहेत, कारण अशा परिस्थितीत छोटे शेतकरी स्थानिक बाजारांत आपला माल विकू शकत नाहीत. खालील दाखल्यावरुन हे अधिक स्पष्ट होईल....

- घाना: टमाटर पेस्ट:.घाना या पश्चिम आफ्रिकी देशांत युरोपीय संघातून होणारी टमाटर-पेस्टची आयात ६५० टक्के वाढली. सन् १९९८ मधील ३३००टन वरुन वाढ होऊन २००३ मध्ये ती २४,७४० टन झाली. परिणाम असा की, स्थानिक बाजारपेठेत स्थानिक शेतकऱ्यांचा हिस्सा केवळ ४० टक्केच उरला आणि किंमतीतही मोठी घट झाली.[१८]

- केमरून: पोल्ट्री:.सन् १९९९ ते २००४ च्या दरम्यान केमरून मधील पोल्ट्रीची आयात ३००

15.http://geoinovae.data.quonia.cz/materially/ZX501_Globaini_problemy_svetove_ekonomically_setkani_c_2/ActionAid_2008_agro_import.pdf
16. http://www.fao.org/docrep/014/i1952e00.htm
17.http://geoinovae.data.quonia.cz/materially/ZX501_Globalni_problemy_svetove_ekonomiky_Setkani_c_2/ActionAid_2008_agro_import.pdf
18. http://www.fao.org/docrep/014/i1952/i1952e07.pdf

टक्के वाढली. यामुळे जवळजवळ ९२ टक्के पोल्ट्रीधारकांना हा व्यवसाय सोडावा लागला, सन् १९९४ ते २००३ पर्यंत दरवर्षी ११०,००० ग्रामीण रोजगार नष्ट होत गेले.[१९]

- कोटे डी आइवर: पोल्ट्री:.सन् २००१ ते २००३ दरम्यान कोटे डी आइवर (आफ्रिका) मध्ये पोल्ट्री आयात ६५० टक्के वाढली. परिणामत: किमतीत घट झाली. १५०० उत्पादकांनी उत्पादन थांबविले आणि जवळजवळ १५,००० रोजगार नाहीसे झाले.[२०]

- मोजेम्बिक: वनस्पती तेल: वर्ष २००० ते २००४ दरम्यान मोजेम्बिक मध्ये तेल आयातीत (ताड, सोया आणि सूर्यमुखी) ५ पट वाढ झाली. स्थानिक उत्पादनांत वेगाने घट झाली,सन् १९८१च्या २१,००० टनावरुन घट होत होत, सन् २००२ मध्ये ते फक्त ३,५०० टनच राहिले. तेलबीया लावणारे १,०८,००० छोटे शेतकरी आणि त्यांच्याशी जोडलेली (सोयाबीन, कोपरा) उत्पादने करणाऱ्या जवळजवळ १० लाख परिवारांवर गंभीर संकट कोसळले. हजारो रोजगार नष्ट झाले .[२१]

- जमाईका: दुग्ध उत्पादन:१९९० च्या दशकांत उदारीकरणामुळे दुग्ध उत्पादनांची आयात वाढल्याकारणाने जवळजवळ ५० टक्के दुग्ध उत्पादकांनी आपले पशू विकून टाकले व त्याना व्यवसाय सोडणे भाग पडले. या परिसरांत १९९० च्या तुलनेत २००४ मध्ये रोजगार दोनत्रितीयांश पेक्षाही कमी झाले .[२२]

- श्रीलंका: दुग्ध उत्पादन: श्रीलंकेत दुग्ध उत्पादनांची आयात सन् १९८१ मधील १०,००० टनवरुन वाढून सन् २००५ मध्ये ती ७०,००० टन झाली. यामुळे स्थनिक बाजाराच्या ७० टक्के हिस्स्यावर कब्जा केला गेला. अशा परिस्थितीत स्थानिक उत्पादक स्वत.ला सावरु शकले नाहीत. या काळांत स्थानिक उत्पादनांत १५ टक्के पेक्षाही कमी वाढ झाली.[२३]

- सेनेगल: पोल्ट्री : कोंबडी आयातकर ८० टक्केवरुन घसरवून २० टक्के केल्यामुळे सन् १९९३ ते २००३ या दरम्यान पोल्ट्री उद्योगाचा ७० टक्के हिस्सा नष्ट करण्यात आला. यामुळे पोल्ट्री आयातीत ११पट वृध्दी दिसून आली. एकंदर आयातीच्या तीन चतुर्थांश हिस्सा केवळ युरोपीय संघाकडून कोंबडी च्या तंगड्यांच्या रुपांत येऊ लागला आणि याला स्थानिक कोंबडीच्या निम्म्या किमतीत विकले गेले.यामुळे स्थनिक कोंबडीची किंमत घटली व उत्पादनांत घट होऊन ते एक त्रितीयांशच झाले.जवळपास २००० रोजगार नष्ट झाले, दहातील सात पोल्ट्र्या बंद झाल्या. लहान शेतकऱ्यांवर याचे गंभीर विपरीत परिणाम दिसून आले.पोल्ट्री उद्योगातील मंदीमुळे मका पिकवणाऱ्या शेतकऱ्यांनाही भारी नुकसान सोसावे लागले. [२४]

---

*19. ftp://ftp.fao.org/docrep/fao/009/ah627e/ah627e00.pdf*
*20. http:..www.fao.org/docrep/014/i1952/i1952e07.pdf*
*21. http://ftp.fao.org/docrep/fao/009/ah627e/ah627e00.pdf*
*22. http://ftp.fao.org/docrep/fao/009/ah629e/ah629e00.pdf*
*23. http://www.fao.org/3/a-ah/761e.pdf*

- हैती: तांदूळ: सन् १९९७मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन् यांनी हैतीला तांदुळावरील आयातकर कमी करण्यास भाग पाडले. या दबावामुळे आयातकर ७० टक्केवरुन घट करुन फक्त ३ टक्के करण्यांत आला. क्लिंटन् यांचा दावा होता की, यामुळे हैतीला औद्योगिक युगांत प्रवेश करण्यास सहाय्य मिळेल.जास्तीत जास्त तांदुळ क्लिंटन् यांच्या स्वत.च्या अर्कासस या राज्यातून आयात होऊ लागला.यामुळे हैती हा अमेरिकेकडून तांदुळ आयात करणारा चौथा मोठा देश बनला,तो पश्चिम गोलार्धातील सर्वांत गरीब देश असूनही. हैती मधील धानाची शेती या कारणाने पूर्णपणे नष्ट झाली व परिणाम असा की, हैतीची खाद्य आत्मनिर्भरताही नष्ट करण्यात आली.

सन् २०११मध्ये बिल क्लिंटन् जेंव्हा हैतीकरता संयुक्त राष्ट्राचे विशेष प्रतिनिधी झाले तेंव्हा त्यांनी, हैतीला अमेरिकन तांदुळावरील आयातकर हटविण्यास भाग पाडल्याबद्दल सार्वजनिक रुपांत माफी मागितली.[२५] ते म्हणाले. अर्कासस मधील माझ्या काही शेतकरी मित्रांना याचा फायदा झाला पण हैती साठी हे फायदेशीर ठरले नाही.ही एक चूक होती.ही अशी चूक होती ज्यांत मीही सामिल होतो.मी दुसऱ्या कोणाकडे बोट दाखवत नाही. हे मी स्वत.च केले होते. आता मला रोज या ओझ्यासह जगावे लागेल की, माझ्यामुळे हैतीचे शेतकरी त्यांची धानशेतीची क्षमता हरवून बसले.[२६]

---

*24. www.fao.org/docrep/014/i1952e/i1952e.pdf*
*25. http://www.worldfuturefund.org/reports/haiti/clintonhaiti.html*
*26. http://democracynow.org/2010/4/1/clinton_rice*

# विश्व व्यापार संघटना - World Trade Organization

विश्व व्यापार संघटनेबद्दल आपल्याला माहिती असणे अत्यंत जरूरीचे आहे कारण त्याचे नियम, अटी आणि त्याअंतर्गत ज्या प्रकारचे करार केले जात आहेत त्याचा थेट संबंध आपला देश, आपले जीवन आणि आपल्या अर्थव्यवस्थेशी आहे. आपण जे खातो, जे कपडे अंगावर घालतो, जे विकत घेतो – ते सारे व्यवहार एकमेकांशी जोडलेले असतात.

## विश्व व्यापार संघटना काय आहे ?

विश्व व्यापार संघटना ही एक बहुपक्षीय संघटना आहे. याची निर्मिती व्यापाराचे उदारीकरण आणि मुक्त व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी केली गेली. विश्व व्यापार संघटनेनुसार ती केवळ एक आंतर्राष्ट्रीय संघटना आहे जी विविध देशांमधील व्यापाराच्या नियमांचे पालन करून कार्य करते. व्यापार सुकर आणि मुक्त रूपात चालू ठेवणे तसेच याची व्यवस्था पाहणे हेच त्याचे प्रमुख कार्य आहे. या बहुपक्षीय व्यापार व्यवस्थेच्या केंद्रस्थानी करार आहेत ज्यावर जगातील बहुसंख्य देशांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत[२७]– हे करार विविध देशांमधील व्यापाराच्या कायद्यांचा ढाचा तयार करते आणि आपल्या सदस्य देशांच्या व्यापारासंबंधीच्या हक्कांची रक्षा करते. आज विश्व व्यापार संघटना जगातील सर्वात शक्तीशाली नव उदारमतवादी व्यापारी संघटना आहे. व्यापारी करारांच्या मुद्यांसंबंधी ही संघटना देशातील सरकारने घेतलेले निर्णयही बदलण्यास सक्षम आहे.

विश्व व्यापार संघटनेची स्थापना १९९५ साली झाली पण याचे स्वरूप जनरल अग्रिमेंट ऑन टॅरिफ न्ड ट्रेड म्हणजेच गॅट या माध्यमातून हळूहळू विकसित होत गेले. दुसऱ्या महायुद्धानंतर जुलै १९९४ मध्ये अमेरिकेतील हॅम्पशायरमध्ये संयुक्तराष्ट्रमुद्रा आणि आर्थिक संमेलन पार पडले. यास ब्रेटन वुड्स (Bretton Woods) संमेलन या नावानेही संबेधले जाते. या संमेलनाचे आयोजन आंतर्राष्ट्रीय मुद्रा आणि आर्थिक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी केले होते. संमेलनास ४४ सदस्य देशांतील ७३० प्रतिनिधी उपस्थित होते. या संमेलनाची फलश्रुती म्हणजे पुनर्रचना आणि विकास बँक किंवा विश्व बँक आणि आंतर्राष्ट्रीय नाणेनिधीची निर्मिती. त्यानंतर आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी एका तिसऱ्या संस्थेची स्थापना करावी असेही ठरवण्यात आले. क्युबातील हवाना येथे १९४८ साली पार पडलेल्या संयुक्त राष्ट्र परिषदेच्या व्यापार आणि रोजगारसंबंधी बैठकीत आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना स्थापन करण्यासंबंधीची चर्चा झाली (International Trade Organization- आयटीओ). बहुपक्षीय व्यापाराची देखरेख आणि तंटा सोडवण्याचे अधिकार असलेली आयटीओची ही तिसरी ब्रेटन वुड्स संस्था होती. परंतु १९५० मध्ये अमेरिकी सिनेटने हवाना चार्टरला मंजुरी देणे नाकारले. अशा प्रकारे आयटीओची समाप्ती झाली.

---

*27. http://www.wto.org/english/thewto_e/whatis_e/inbried_e/inbr00_e.htm*

आयटीओच्या प्रारूपासंबधी चर्चा, तसेच या संघटनेत सामील व्हावे की नाही यासंबंधी अनेक देशांचा निर्णयही झालेला नसताना जिनीव्हा येथे २३ देशांतील प्रतिनिधींनी गॅटच्या (झ्रीींळीळेपरश्र असीशशाशपीं) तात्पुरत्या कराराचा स्वीकार केला. याचा उद्देश सलगपणे व्यापार उदारीकरण आणि औद्योगिक मालावरील आयात निर्यात कर कमी करून मुक्तव्यापार तत्वावर आधारलेला जागतिक बाजार निर्माण करणे असा होता. या तात्पुरत्या बहुपक्षीय कराराचा रोख होता आंतर्राष्ट्रीय व्यापाराला उत्तेजन देणे आणि १९३० साली आलेल्या आर्थिक मंदीपासून अंगीकारल्या जाणा-या संरक्षक उपायांमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई करणे. १९४८ च्या जानेवारी महिन्यात तयार केलेला गॅट हा करार आयटीओ लागू होईपर्यंतचा तात्पुरता उपाय म्हणून गणला जाणार होता. १९४८पासून बहुपक्षीय व्यापाराचे प्रशासन करणारी ही एकमेव संघटना होती. पुढे १९९५ विश्वव्यापार संघटनेच्या संस्थापनेनंतर गॅटचे महत्व कमी होत गेले.

गॅट हा करार कायदेशीररीत्या बंधनकारक नव्हता. अमेरिका आणि इतर अनेक देशांनी गॅटमधील आपल्या कायद्याशी विसंगत नसलेल्याच अटींचा स्वीकार केला. याला कराराचा सशर्त स्वीकार (Protocol of Provisional Application) [28] – असे म्हणतात.

विश्व व्यापार संघटनेच्या स्थापनेपूर्वी गॅटअंतर्गत अनेक चर्चा घडल्या. उरुग्वेतील सप्टेंबर १९८६ मध्ये मंत्रीस्तरीय बैठक फार महत्वाची ठरली. उरुग्वेतील अनेक जटील मुद्यांवर चर्चा झाली. तरीपण या चर्चेच्या केंद्रस्थानी अमेरिका, युरापीय संघ आणि जपान यांचा एक संयुक्त प्रस्ताव होता. या प्रस्तावामध्ये गॅटच्या रचनेत बदल करीत आंतर्राष्ट्रीय गुंतवणूक सरकारी नियंत्रणापासून मुक्त करण्याचा मुद्दा होता.

उरुग्वे चर्चा फेरी आठ नऊ वर्षे चालली (१९८६-१९९४) या दरम्यान व्यापार उदारीकरणाने जागतिकीकरणाचा साज चढवून नवे रूप धारण केले. औद्योगिकीकरण आणि निर्बंध हटवून गॅटने व्यापार उदारीकरणाचा मार्ग सुलभ केला. उरुग्वे फेरीचे महत्व अशासाठी आहे की त्यामुळे व्यापारात औद्योगिक मालाबरोबर कृषी उत्पादने, सेवा क्षेत्राचे खजगीकरण बौद्धिक संपदेची सुरक्षा यांचाही समावेश करण्यात आला. यासोबत कॉर्पोरेट फायद्यास बाधा आणणा-या कायद्यात आणि नियमांत फेरबदल करण्यात आले. डिसेंबर १९९१ पर्यंत एक विस्तृत प्रस्ताव तयार करण्यात आला, ज्याला फायनल ॲक्ट किंवा डंकेल प्रस्ताव या नावानी ओळखले जाते. आर्थर डंकेल १९८० ते १९९३ या काळात गॅटचे महानिर्देशक होते. म्हणून हा प्रस्ताव त्यांच्या नावानी ओळखला जातो.

एप्रिल १९९४ मध्ये मरकिेश (मोरक्को) मंत्रीस्तरीय बैठकीत फायनल ॲक्टचा औपचारिकरित्या स्वीकार करण्यात आला. या प्रकारे १ जानेवारी १९९५ पासून विश्व व्यापार संघटना अस्तित्वात आली आणि त्याने गॅट कराराची जागा घेतली.

मर्राकेशचा फायनल ॲक्ट एका पत्राएवढेच आहे. या पत्रासोबत साधारण वीसपेक्षाही अधिक करार जोडलेले आहेत. यातील सर्वात पहिला  विश्व व्यापार संघटनेच्या स्थापनेचा करार आहे.

*28. http://eh.net/encyclopedia/from-gatt-to-wto-the-evolution-of-an-obscure-agency-to-one-perceived-as-obstructing-democracy-2/*

याव्यतिरिक्त व्यापार आणि वस्तूमालासंबधीचा बहुपक्षीय करार – Multilateral Agreements on Trade and Goods सोबत अन्य काही करारांचा समावेश आहे. उद्दा. कृषीकरार, सॅनिटरी – (आरोग्य, स्वच्छता) आणि फायटो सॅनिटरी उपाय म्हणजेच जंतू आणि घाणीची स्वच्छता, व्यापारांतील तांत्रिक अडथळे, डंपिंग विरोधी, सब्सिडी आणि (काउंटरवेलिंग) सुरक्षा उपाय आणि इतर; सेवाक्षेत्र व्यापाराचा करार (General Agreement on Trade in Services-GATS) आणि व्यापारांशी निगडीत बौद्धिक संपदा हक्कांसंबधींचे मुद्दे (Trade Related spects of Intellectual Property Rights). फायनल ॲक्टमध्ये इतर महत्वपूर्ण निर्णयाचाही अंतर्भाव होता. उद्दा. वाद निराकरण (Dispute settlement understanding) व्यापार धोरण परीक्षण यंत्रणा (trade policy review mechanism) बहुपक्षीय व्यापार करार इ. यामध्ये एक करार सरकारी खरेदीसंबंधी आहे. विश्वव्यापार संघटनेचा उद्देश व्यापारातील निर्बंध दूर करणे आणि मोठया कॉर्पोरेट्स पूर्ण जगतात मुक्तपणे व्यापार करू शकतील अशी परिस्थिती निर्माण करणे. यामध्ये वस्तूमाल व्यपारावरील कर निर्बंध दूर करणे याचाही अंतर्भाव केला आहे. आरोग्य, पर्यावरण आणि कामगार कायदे इ. क्षेत्रांना करांतून वगळण्यात आले आहे.

## विश्व व्यापार संघटनेची वैशिष्ट्ये

विश्व व्यापार संघटना गॅटपेक्षा अनेक प्रकारांनी वेगळा आहे. गॅटचा संबंध केवळ वस्तूमालाच्या व्यापाराशी होता तर विश्व व्यापार संघटनेत व्यापाराचे तीन पैलू आहेत.

वस्तूमालाचा व्यापार
सेवांचा व्यापार
बौद्धिक संपदा (नवीन शोध)

विश्व व्यापार संघटनेचे दुसरे वेगळेपण म्हणजे त्याची वाद निराकरणाची प्रक्रिया ज्यात अनुशासन म्हणजेच शिस्तपालनासोबत व्यापारातील वादविवाद –भांडणे यांच्या संभावना कमी करण्याचे उपाय असे आहेत– कोणी सदस्य व्यापार कराराचे उल्लंघन करत असेल तर दुसरा सदस्य त्यादेशावर दंड आणि प्रतिबंध लावणे अशी कारवाई करू शकतो. कोणताही देश दुस–या देशास थढज च्या वाद निराकरण व्यासपीठात सुनवणीसाठी घेवून जावू शकतो. परंतु सत्य परिस्थिती अशी आहे की १९९१ पासून आजपर्यंत झालेल्या व्यापार तंट्यातील अधिकतर निर्णय प्रबख औद्योगिक देशांच्या बाजूनेच लागले आहेत. अनेक वेळा हे निर्णय राष्ट्रीय आरोग्य आणि सुरक्षा, श्रम, मानवी हक्क आणि पर्यावरणीय कायद्याच्या विरोधातीलही आहेत. याचे कारण म्हणजे प्रबळ राष्ट्रनी हे निर्णय व्यापारास आडकाठी करणारे आहेत अशा स्वरूपाची मांडणी केली. अनेकदा विकसनशील देश विश्व व्यापार संघटनेच्या धमक्यांना आणि दंडात्मक कारवाईला घाबरून आपल्या लोकहिताच्या धोरणांमध्ये बदल करण्याचे पाउल उचलतात एवढेच नव्हे तर वाद निराकरण व्यासपीठाच्या आदेशांना देशातील न्यायालयामध्येही आव्हान देता येत नाही. त्यांचे पालन करावेच लागते. याप्रकारे विश्व व्यापार संघटनेचा दर्जा राष्ट्रापेक्षाही वरचा ठरतो. विश्व व्यापार संघटनेचे कायदे मंडळ गॅटपेक्षाही वेगळे आहे. आणि त्यांच्या कराराचे तंतोतंत

पालन करावे लागते. विश्व व्यापार संघटनेच्या करारांना देशातील सरकारे मंजूरी (ीरींळषळलरींळेप) देत असल्यामुळे त्यांना कायदेशीर मान्यता मिळते. विश्व व्यापार संघटना करार कायमस्वरूपी असतो. विश्व व्यापार संघटनेच्या सर्व सदस्यांना समान अधिकार असतात. प्रत्येक देशांस एका मताचा अधिकार असतो आणि प्रत्येक मतास समान महत्व असते.

विश्व व्यापार संघटनेचे सचिवालय जिनिव्हा येथे आहे. आणि त्याचे विद्यमान महानिर्देशक रॉबर्ट अजेवेडो आहेत. विश्व व्यापार संघटनेचे सर्व प्रमुख निर्णय मंत्रीस्तरीय बैठकीत घेतले जातात. ही बैठक दोन वर्षांतून एकदा होते. ३० नोव्हेंबर २०१५ पर्यंत विश्व व्यापार संघटनेमध्ये १६२ सदस्य आहेत. या व्यतिरिक्त २२ देशांना निरीक्षकांचा दर्जा मिळाला आहे. सदस्यत्व मिळण्याआधी काही काळ निरीक्षक पदावर राहवे लागते. या प्रकारे जगातील जवळजवळ सर्व देश विश्व व्यापार संघटनेशी जोडले गेले आहेत. विश्व व्यापार संघटनेमध्ये सर्व प्रकारचे देश सामील झाले आहेत– भांडवलशाही, समाजवादी, श्रीमंत आणि गरीब, उद्योगप्रधान आणि विकसनशील देश.

विश्व व्यापार संघटनेचे बजेट सोळा कोटी स्विस फ्रँक्स इतके आहे. विश्व व्यापार संघटनेच्या एकूण व्यापारातील वैयक्तिक सदस्यांच्या हिश्श्यानुसार त्या देशाच्या योगदानाची रक्कम ठरवली जाते.

**आजपर्यंत आयोजित करण्यात आलेल्या मंत्रीस्तरीय बैठकी**

| बैठक | वर्ष | स्थान |
|---|---|---|
| ख | ९–१३ डिसेंबर १९९६ | सिंगापूर |
| खख | १८–२0 मे १९९८ | जिनिव्हा– स्वित्झरलँड |
| खखख | ३0 नोव्हेंबर ३ डिसेंबर १९९९ | सिएटल– अमेरिकस |
| खत | ९–१३ नोव्हेंबर २00१ | दोहा – कटार |
| त | १0–१४ सप्टेंबर २00३ | कॅनकून – मेक्सिको |
| तख | १३–१८ डिसेंबर २00५ | हाँगकाँग |
| तखख | ३0 नोव्हेंबर २ डिसेंबर २00९ | जिनिव्हा– स्वित्झरलँड |
| तखख | १५–१७ डिसेंबर २0११ | जिनिव्हा– स्वित्झरलँड |
| खद | ३–६ डिसेंबर २0१३ | बाली – इंडोनेशिया |
| द | १५– १८ डिसेंबर २0१५ | नैरोबी – केनिय |

*29. http://www.wto.org/english/thewtoše/whatisše/tifše/org3še.htm*

विश्व व्यापार संघटनेमध्ये अंतर्गत राष्टांचे अनेक गट आहेत

- कमी विकसित देश – Least Developed Countries– या गटांत जगातील सर्वात गरीब देश आहेत.
- लहान आणि संवेदनशील अर्थव्यस्था असलेले देश (Small and vulnerable economies) यामध्ये विश्व व्यापार संघटनेतील असे सदस्य आहेत ज्याचा जागतिक व्यापारातील हिस्सा खूप लहान आहे. तसेच हे देश आर्थिक अनिश्चितता आणि पर्यावरणीय घटनांबद्धल संवेदनशील आहेत.
- आफ्रिकी, कॅरिबियन व पॅसिफिक देश (African' Caribbean and Pacific countries- CP)
- या देशांचा युरोपीय समुहातील देशांबरोबर विशेषाधिकार असलेला व्यापारी संबंध आहे, लोमे संधी अंतर्गत तो प्राप्त झाला आहे. या संधीस कोटोनाऊ करार असेही म्हणतात. (Cotonou Agreement)
- आफ्रिकी समुह: यात विश्व व्यापार संघटनेचे आफ्रिकी सदस्य देश सामील आहेत.
- कपास– ४ (Cotton 4- C4): यात बेनीन, बुर्किना फासो, चाड आणि माले सामील आहेत; अफ्रिकी देशांचा हा समुह विकसित देशांत कापसाची सब्सिडी आणि शुल्क कपात करण्याची मागणी करत आहेत.
- जी – ९० (G-90) : यामध्ये आफ्रिकी समुह, उझ समुह (आफ्रिकी, कॅरिबियन, पॅसिफिक देश) आणि कमी विकसित देश सामील आहेत.
- जी– ३३ (G-33): हा विकसनशील देशांचा समुह आहे. आपल्या देशातील कृषीक्षेत्रात बाजाराला शिरकाव करू देण्याबाबत ते विरोध करत आहेत. या समुहामध्ये ३३ पेक्षा जास्त सदस्य आहेत.
- जी २० (G-20): हा विकसनशील देशांचा समुह आहे. हा समुह विकसित देशांतील कृषीक्षेत्रातील महत्वाकांक्षी सुधारणांसंबंधात बोलणी करत आहे, त्याच बरोबर स्वत:करिता लवचिक धोरणांची आशा करीत आहेत. (अर्थमंत्री आणि केंद्रीय बँक गव्हर्नरांचाही एक G-20 समुह आहे पण मूळ जी २० समुहाशी याचा काही संबंध नाही)
- कॅनर्स समुह (Cairns) : ही कृषीउत्पादनांची निर्यात करणा–या देशांची युती आहे. ही युती कृषीव्यापार उदारीकरणासंबंधी बोलणी करीत आहे; हा समुह निर्यात सब्सिडी आणि व्यापाराला विकृत करणाऱ्या सब्सिडींना पूर्णपणे संपुष्टात आणण्याची मागणीही करीत आहे, यामुळे या समुहात अमेरिका, युरोपीय समुह आणि जपान सामील नाहीत.

## विश्व व्यापार संघटनेमध्ये निर्णय घेण्याची प्रक्रिया

विश्व व्यापार संघटनेच्या नियमांनुसार प्रत्येक सदस्य देशाला एका मताचा अधिकार आहे.

श्रीमंत तसेच गरीब देशांचे मत समसमान आहे. परंतु विश्व व्यापार संघटनेमध्ये सर्वसाधारणपणे मताच्या आधारावर नव्हे तर सर्वसहमतीने निर्णय घेतले जातात. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास जोपर्यंत सर्व देशांची सहमती मिळत नाही तोपर्यंत कोणताही निर्णय घेता येत नाही. प्रत्येक देशाला आपल्या संसदेमध्ये या करारांची मंजुरी मिळवावी लागते. त्याबरोबरच विश्व व्यापार संघटनेमध्ये जोरजबरदस्तीनेच निर्णय घेतले जातात. अनेकदा सक्तीने किंवा देशांवर दबाव आणून निर्णय घेतले जातात. या प्रक्रियेत, लोकशाही मूल्ये, सहभाग, पारदर्शकता, आणि भागीदारी हे सिद्धांत पायदळी तुडवले जातात. विश्व व्यापार संघटनेमध्ये १६२ सदस्य देश असले तरी सर्व महत्वपूर्ण निर्णय एक निवडक देशांच्या समुहाद्वारे घेतले जातात. या समुहाला ग्रीन रूम किंवा फ्रेन्डस ऑफ द चेअर असेही म्हंटले जाते. (सभापतीच्या मर्जीतील). विश्व व्यापार संघटनेच्या स्थापनेपासून एकाही निर्णयावर मतदान घेतले गेलेले नाही. त्यामुळे असे लक्षात येईल की विश्व व्यापार संघटना ही अलोकशाहीवादी संस्था आहे. सगळ्या मंत्रीस्तरीय बैठकांमध्ये अमेरिका, युरोपीय संघातील देश, जपान आणि कॅनडा या देशांचा नेहेमीच दबदबा असतो. या चार देशांच्या युतीला अनेकदा चौकडी (Quadrilateral) असे संबोधले जाते. दोहा मंत्रीस्तरीय बैठकीनंतर विकसनशील देशांनी संपूर्ण ताकदीने आपले म्हणणे मांडायला सुरूवात केली होती. कृषी करारासंबंधी जी-३३ आणि जी-२० च्या भूमिकेला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. या प्रकारे ब्राझील, भारत ऑस्ट्रेलिया (Cairns समुहाच्या प्रतिनिधीच्या स्वरूपात) या नव्या चौकडीत सामील झाले आहेत. याव्यतिरिक्त लहान मंत्रीस्तरीय (Mini Ministerial) बैठकांची प्रक्रियाही अलोकशाहीवादी राहिली आहे. २००२ सालापासून २०१० पर्यंत मंत्रीस्तरीय बैठकांपूर्वी अनेक लहान मंत्रीस्तरीय बैठका झाल्या, ज्यात अजेंडा निश्चित करण्यासाठी सर्व सहा देशांनी व इतर काही खास देशांनी भाग घेतला. या लहान मंत्रीस्तरीय बैठकांमध्ये विकसनशील देशांचा सहभाग नगण्यच असतो. वाद निराकरण व्यासपीठ देखील लोकशाही पद्धतीनी काम करीत नाही. नियमाप्रमाणे विश्व व्यापार संघटनेचा कोणताही सदस्य कोणत्याही अन्य सदस्याला नियमभंगासाठी वाद निराकरण व्यासपीठात नेउ शकतो. परंतु अमेरिका किंवा युरोपीय संघांसारख्या शक्तीशाली देशांनी नियमभंग केला आहे असा आरोप कोणत्याही गरीब देशांनी केल्याच्या घटना घडलेल्या नाहीत. दुस-या बाजूला श्रीमंत देशांचे आर्थिक बळ इतके असते की ते कोणत्याही गरीब देशाला धमकी देवून घाबरवून टाकू शकतात. तत्वतः विश्व व्यापार संघटनेचे सगळे सदस्य देश समान असले तरी प्रत्यक्षात निर्णय प्रक्रियेत श्रीमंत देशांचेच वर्चस्व असते.

## विश्व व्यापार संघटनेची मूलभूत तत्वे पुढीलप्रमाणे –

१. 'सर्वात पसंतीचे राष्ट्र' (Most favoured nation (MFN) treatment) :

विश्व व्यापार संघटनेत कोणत्याही सदस्य देशाला आपल्या व्यापारी भागीदारांमध्ये कोणताही प्रकारचा भेदभाव करता येणार नाही. सर्वांना समान दर्जा दिला जाईल आणि सर्वांबरोबर 'सर्वात पसंतीचे राष्ट्र' या रूपात व्यवहार केला जाईल. उदाहरणादाखल एखादा देश एका विशिष्ट देशाला सूट देत (उदा. उत्पादनावर आयात करात सूट) असेल तर या

प्रकारची सूट विश्व व्यापार संघटनेच्या सर्व सदस्यांना द्यावी लागेल. या तत्वाप्रमाणे जेव्हा कोणताही देश विशिष्ट वस्तूमाल किंवा सेवाक्षेत्रासाठी आपली बाजारपेठ खुली करणार असेल तर तशी सूट इतर सदस्यांनाही द्यावी लागेल. हे तत्व गॅट्स (Article 2) आणि (Article 4) ट्रीप्समध्येही लागू होते. या तत्वांना मुरड घालून काही क्षेत्रांत सूट देण्यात आली आहे उदा. मुक्त व्यापार क्षेत्र, कस्टम युनियन असलेली व्यवस्था आणि पसंती दर्शवणारी व्यवस्था. काही देश समुह बनवून आपसात मुक्त व्यापारी करार करून इतर काही देशांना अटकाव करू शकतात. त्याचप्रमाणे विकसनशील देशांना आपल्या बाजारपेठेत प्रवेश देऊ शकतात. किंवा जे देश अनुचित पद्धतीने व्यापार करतात त्यांना अटकाव करू शकतात.

२. राष्ट्रीय व्यवहार

विश्व व्यापार संघटनेचे दुसरे मौलिक तत्व असे की आयात आणि स्थानिक उत्पादने आणि सेवाक्षेत्रांमध्ये कोणताही भेदभाव न करणे. आयात माल बाजारात पोचला की दोन्ही प्रकारच्या उत्पादनांशी समान व्यवहार ठेवावा लागेल. स्थानिक उत्पादनांवर कर लागत नसला तरी आयात मालावर कर लावणे हे या त्तवाचे उल्लंघन मानले जाणारे नाही. आयात मालावर जो अतिरिक्त कर लावला तो स्थानिक उत्पादनांवर लागत नाही. तसेच आयात माल देशी बाजारात आला की त्यावर कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कर लावू नये जो स्थानिक उत्पादनांवर लावला जात नाही. हे तत्व देशी सेवा आणि स्थानीय ट्रेड मार्क, कॉपी राईट आणि पेटंट ( उदा. एकाधिकार कायदे जे ट्रीप्समध्येही लागू होतात)

३. मुक्त व्यापार

विश्व व्यापार संघटनेचे तिसरे तत्व हे की – व्यापार निर्बंधांना हळू हळू कमी करणे. व्यापार निर्बंध पुढील प्रमाणे– जकात कर, करविहित बंधने उदा. आयात प्रतिबंध तसेच प्रमाणावर प्रतिबंध, ठराविक कोटा आणि प्रमाण प्रतिबंध

४. पूर्व अंदाज आणि पारदर्शकता (Predictability and transparency)

हे तत्व विदेशी कंपन्या, गुंतवणूकदार आणि सरकारांना आश्वस्त करते की व्यापार प्रतिबंधांना मनमानी पद्धतीने वाढवले जाणार नाही तसेच व्यापारासंबंधी सर्व धोरणे नियामक चौकटी विदेशी कंपन्यांसाठीही पारदर्शक राहतील. व्यापार व्यवस्थेला स्थिर आणि पारदर्शक करण्यासाठी सरकारांनी आपली धोरणे आणि पद्धतीं आपल्या देशांत जाहीर करणे किंवा कमीतकमी विश्व व्यापार संघटनेला सूचित करणे.

५. प्रामाणिक व्यापार स्पर्धेस उत्तेजन

या तत्वानुसार व्यापार पद्धती अधिक स्पर्धात्मक करण्याकरिता व्यापाराच्या अनुचित पद्धतींना परावृत्त केले पाहिजे. उदा. निर्यात सब्सीडी किंवा विदेशी बाजारात उत्पादनांचे डंपिंग करणे. घरेलू उत्पादनांच्या किंमतीपेक्षा कमी दरात आयात वस्तू मुबलक मिळू लागतात यालाच डंपिंग असे म्हणतात. यामुळे स्थानिक बाजाराला नुकसान पोचते. विश्व

व्यापार संघटनेचे हे मूलभूत तत्व असूनही विकसित देश या नियमाचे उल्लंघन करून आपल्या देशातील अत्याधिक सूट मिळालेल्या उत्पादनांनी विकसनशील देशांच्या बाजारपेठा भरून टाकतात, एवढेच नव्हे तर खूप कमी किंमतीत विकतात.

६. विकास आणि आर्थिक सुधारणांना प्रोत्साहन

(encouragement of development and economic reform)

बहुपक्षीय व्यापार व्यवस्थेत सगळे देश समान नाहीत या गोष्टीचा स्वीकार केला गेला आहे. म्हणून कमी विकसित देशांसाठी विशेष वागणूक मिळाली पाहिजे. उदा. त्यांच्या उद्योगांना आयात जकातींमधील कपातीशी जुळवून घेण्यासाठी पुरेसा अवधी दिला पाहिजे. कमी विकसित देशांना अतिरिक्त अवधी दिला जातो. उरूग्वे फेऱ्यांमध्ये याची ही चर्चा झाली की सक्षम देशांनी कमी विकसित देशांद्वारे निर्यात केल्या गेलेल्या उत्पादनांचा बाजार प्रवेश सुगम आणि सुकर केला पाहिजे. याबरोबरच या देशांसाठी तांत्रिक सहाय्य वाढवले पाहिजे. यासाठी काही विकसित देशांनी कमी विकसित भागीदार देशांच्या उत्पादनांच्या आयातीला करमुक्त आणि कोटामुक्त ठेवले आहे. तरीही या तत्वाचे पूर्णतया पालन होत नाही. कमी विकसित देश अजूनही आपल्या उत्पादनांना विकसित देशांत करमुक्त आणि कोटामुक्त करण्यासाठी संघर्ष करीत आहेत. या सोबत वर्ष २००१ मध्ये दोहा फे-यांदरम्यान विकसनशील देशांना विशेष आणि वेगळी वागणूक देण्याचा निर्णय घेतला गेला होता. यासाठी अजूनही हे देश संघर्ष करीत आहेत.

७. एकच प्रतिज्ञा (single undertaking)

या तत्वानुसार विश्व व्यापार संघटनेच्या प्रत्येक कराराचा विषय एका मोठया आणि अविभाज्य पॅकेजचा हिस्सा आहे. ज्यास वेगवेगळे करता येत नाही. जोपर्यंत सर्वकाही स्वीकार केले जात नाही तोपर्यंत काहीच स्वीकारू शकत नाही. अर्थात विश्व व्यापार संघटनेच्या सर्व करारांना एकाचवेळेस स्वीकार करण्याच्या प्रतिज्ञेच्या स्वरूपांत पाहिले जाते. कोणताही सदस्य देश आम्ही अमुक एक कराराचा स्वीकार करतो असे म्हणू शकत नाही. विश्व व्यापार संघटना आणि त्याचे सगळे करार हे एक पॅकेज आहे. सदस्य देशांनी याचा पूर्ण स्वीकार करावा किंवा किंचितही नाही.

## विश्व व्यापार संघटनेची उद्दिष्ट्ये

विश्व व्यापार संघटनेच्या प्रस्तावनेत त्याच्या उद्दिष्ट्यांचा स्पष्ट उल्लेख आहे. यामध्ये विश्व व्यापार संघटनेतील सदस्य देशांचा व्यापार आणि आर्थिक संबंधामुळे लोकांचा जीवनस्तर उंचावेल, रोजगाराची निश्चिती होईल, मिळकतीत निरंतर वाढ होत राहील आणि मागणीतही परिणामकारक वाढ होईल. (Effective Demand). यासोबत वस्तूमाल आणि सेवाक्षेत्रातील व्यापाराची वाढ होईल. पर्यावरणाचे संवर्धन आणि संरक्षण, जागतिक संसाधनांचा इष्टतम वापर आणि शाश्वत विकासाच्या तत्वांनुसार हा विकास झाला पाहिजे.

विश्व व्यापार संघटनेची मुख्य उद्दिष्टये पुढीलप्रमाणे–

१. सदस्य देशांच्या नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा
२. संपूर्ण रोजगार निश्चिती आणि मागणीतही परिणामकारक वाढ
३. वस्तूमाल उत्पादनात वाढ आणि व्यापार वृद्धी
४. सेवाक्षेत्रातील व्यापारांत वृद्धी
५. जागतिक संसाधनांचा इष्टतम वापर
६. पर्यावरण सरंक्षण व संवर्धन
७. शाश्वत विकास तत्वांचा स्वीकार

## विश्व व्यापार संघटनेतील प्रत्यक्ष वास्तव

विश्व व्यापार संघटनेची वैश्विक चौकट विश्वातील ९९ टक्के लोकांकरिता फायद्याचे ठरेल असे त्याच्या स्थापनेसमयी वाटले होते. सदस्य देशांना धोरणे आखण्यासाठी तसेच रोजगार निर्मिती साठी पुरेसा अवसर देणे, अन्न सुरक्षा, शाश्वत विकास, परवडणारी आरोग्य सुविधा, औषधांची उपलब्धता, जागतिक आर्थिक स्थैर्य या जागतिक पातळीवरील प्रयत्नांना चालनाच मिळेल, खीळ बसणार नाही. कॉर्पोरेट फायद्यापेक्षा मानवी हक्क, पर्यावरण शाश्वतता यांना अधिक महत्व दिले जाईल.

परंतु गेल्या वीस वर्षांत विश्व व्यापार संघटनेने आपल्या वचनांची पूर्ती केली नाही. याची महान उद्दिष्टये अजूनही गाठली गेलेली नाहीत. जेव्हापासून विश्व व्यापार संघटनेद्वारे आर्थिक जागतिकीकरणाला सुरूवात केली गेली तेव्हापासून सर्व जगात विषमता वाढली आहे. अस्सल मुक्त व्यापार कधीच होवू शकणार नाही अशीच विश्व व्यापार संघटनेची व्यवस्था आहे. खरेतर विश्व व्यापार संघटना मक्तेदारीला प्रोत्साहन देत आहे ज्यामुळे शक्तीशाली खेळाडूचे वर्चस्व राहते. चौकडी म्हणजेच अमेरिका, युरोपीय संघ जपान आणि कॅनडाची ही मिलीभगत. ही चौकडी सतत आपल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रतिनिधित्व करतात. विश्व व्यापार संघटनेचे करार म्हणजे आपल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या फायद्याकरिता विकसनशील देशांच्या बाजारपेठा काबीज करणे हा विकसित देशांचा व्यवहार राहिला आहे. अनेकदा बहुराष्ट्रीय कंपन्यांचा विश्व व्यापार संघटनेचे नियम बनवणे किंवा बदलणे यामागे हात असतो. याप्रकारे विश्व व्यापार संघटनेचा मुक्त व्यापार फक्त उत्तरेच्या औद्योगिक आणि विकसित देशांचे उत्पादक, कारखानदार आणि बहुराष्ट्रीय कंपान्यांकरिताच आहेत. ते दक्षिणेतील विकसनशील देशांच्या बाजारपेठांमध्ये आपली कृषी उत्पादने, आद्योगिक माल आणि सेवा यांचा शिरकाव व्हावा यासाठी प्रयत्न करीत आहेत. एवढेच नव्हे तर दक्षिणी देशांतील कच्चा माल आणि स्वस्त मजुरांचा आपले उत्पादन आणि वितरण क्षमता वाढवण्यासाठी उपयोग करून घ्यायचा आहे. दुसरीकडे श्रीमंत देश कधीही गरीब देशांतील उत्पादनांना आपल्या बाजारात सहजासहजी प्रवेश करू देत नाहीत. विटंबना या गोष्टीची आहे की विकसनशील देश विश्व व्यापार संघटनेमध्ये सामील होण्याकरिता आपली स्वतंत्र व्यापारधोरणेही सोडण्यास तयार होतात. त्यांना वाटते की विश्व व्यापार संघटनेमध्ये सामील होण्यामुळे त्यांचा स्वदेशी विकास, अन्नसुरक्षा आणि सार्वभौमत्व तसेच

औद्योगिकीकरणाला फायदा होईल. काही देशांनी तर आपल्या सरकारपेक्षाही विश्व व्यापार संघटनेला वरचा दर्जा दिला आहे. ज्या देशांनी आपल्या कायद्यात बदल करण्यास नकार दिला व विश्व व्यापार संघटनेच्या व्यापारास प्रतिबंध केला आहे किंवा ज्या देशांना विश्व व्यापार संघटनेच्या नावाने धमकी दिली गेली आहे अशा सर्व देशांनी घाबरून आपल्या धोरणांत बदल केले आहेत. या देशांनी आयात प्रमाणावरील रोखही काढून टाकला आहे. कितीतरी कृषी आणि औद्योगिक उत्पादकांच्या आयातीवर जकातकर कमी केला आहे. आणखी काही आयातींवर कर जसे होते तसेच ठेवण्यात आले. त्यामुळे विदेशी कंपन्या स्वदेशी कंपन्यांबरोबर स्पर्धा करू शकतील.

देशाच्या आर्थिक क्षमता निर्मितीसाठी आवश्यक अशी उच्चस्तरीय औद्योगिक आणि तांत्रिक माहिती मिळवण्याचे प्रयत्न सीमीत ठेवण्याच्या अटीस विकसनशील देश सहमत झाले. खरे तर तंत्रज्ञानाच्या मार्गांनी प्राथमिक उत्पादनापासून मूल्यावर्धित निर्मिती शक्य होते. विकसनशील देशांनी बौद्धिक संपदा अधिकारांसंबंधी करार केले आणि राष्ट्रीय विकास लक्ष्यांपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला. उदाहरणार्थ सेवाक्षेत्रातील व्यापारांसंबंधी करारांच्या अटींनुसार (General greement on trade in services) विदेशी सेवा प्रदान करणारे आणि देशातील सेवा प्रदान करणारे यांचे अधिकार समान असले पाहिजेत, त्यांचा संबंध दूरसंचार, वित्त, स्वास्थ्यसेवा, जल किंवा शिक्षणासंबंधी असावा. याप्रकारे या करारांमुळे विदेशी सेवा प्रदात्यांना देशात घुसण्याची संधी मिळाली. त्यामुळे देशी शिक्षण आणि जलसेवांशी संबंधित नियमांवरही परिणाम होत गेला. सेवांच्या व्यापारांसंबंधी कराराअंतर्गत, राष्ट्रीय व्यवहार तत्वांनुसार देशी बाजारात स्थानीय उत्पादकांना कोणताही विशेष अधिकार दिला जाणार नाही असे मान्य करण्यात आले. त्यांच्या क्षमता निर्मितीसाठीही सरकारद्वारे मदत दिली जाणार नाही हेही मान्य करण्यात आले ज्यामुळे औद्योगिक देशांतील कारभार, कंपन्या स्थानिक बाजारांत प्रतिस्पर्धी म्हणू शिरकाव करू शकतात.

या प्रकारे बौद्धिक संपदा अधिकार संबंधी व्यापार करारानुसार – (Trade related aspects of intellectual property rights TRIPS) विकसनशील देशांना बौद्धिक संपदा अधिकारांची सुरक्षा करावी लागेल, उदा. पेटंट, कॉपीराईट, ट्रेडमार्क, वनस्पती विविधता हक्क, –(Plant variety protection rights) इत्यादी. विश्व व्यापार संघटनेने बौद्धिक संपदा अधिकारंची स्थापना बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या फायद्यासाठी केली गेली होती. या बहुराष्ट्रीय कंपन्यांकडे सर्वात अधिक पेटंट आहेत. या पेटंटमध्ये औषधे आणि इतर उपयोगी जीवनावश्यक वस्तूंना अधिक महागडे बनवले. या बरोबरच बीज, झुडुपे, आदी इतर जीवनावश्यक वस्तूंचे पेटंट घेवून त्यांचे खाजगीकरण आणि व्यावसायिकीकरण होत आहे. विश्व व्यापार संघटनेच्या नियमांनुसार जीवनावश्यक वस्तूंनाही विशेष सुरक्षा मिळू शकते. औषधे आणि शल्यचिकित्सेत उपयोगी पडणा–या उपकरणांच्या पेटंटांचे दुष्परिणाम साऱ्या जगाने पाहिले आहेत. चिकित्साक्षेत्रात पेटंटधारक कंपन्या स्वस्त आणि सामान्य उत्पादनांवरही प्रतिबंध लावत आहेत. या प्रकारे मुक्त व्यापारामुळे एकाधिकारशाहीला प्रोत्साहन दिले जात आहे. याचे परिणाम आपल्या सर्वांना दिसत आहेत. विकसनशील देशांत औषधे आणि चिकित्सा गरीबांच्या आवाक्याबाहेर जात

## कृषीकरार – Agreement on Agriculture

व्यापाराच्या इतिहासातील कृषी करार हा सर्वात जटील करार आहे. कृषीकराराच्या माध्यमातून कृषी उत्पादनांच्या उदारीकरणाला नियंत्रित केले जाते. शेतीवर गुजराण चालवणा-यांची संख्या खूप मोठी आहे. कृषी उदारीकरणामुळे हा वर्ग प्रभावित होतो आहे. विकसनशील देशांतील शेती उत्पादनावर लोकांना पोटभर अन्न मिळणार की नाही आणि मिळाल्यास ते किती मिळेल हे अवलंबून असते. लोकसंख्येतील एक मोठा वर्ग आपल्या उपजीविकेसाठी निर्वाह पिके (sustenance crop) आणि नगदी पिकांवर अवलंबून आहे. संसाधनहीन आणि गरीब देशांना अन्नधान्य आयात करावे लागते. खाद्यान्नांच्या किंमतीतील चढउतारांमुळे ते प्रभावित होतात. उत्तरी देशांतील स्पर्धात्मक किंमतींमुळे धान्य निर्यात करणारे दक्षिणी देशही प्रभावित होतात.

१९९४ डिसेंबर पर्यंत गॅट करार अस्तित्वात होता. या कराराच्या परिघात कृषी किंवा कृषीमालाचा समावेश नव्हता. मर्राकेश बैठकीत विश्व व्यापार संघटनेच्या 'फायनल ॲक्ट' दस्तावेजात कृषी उत्पदनांनाही सामील केले गेले. उरुग्वे बैठकीत याला विस्तृत रूप देण्यात आले. विकसनशील देशांच्या खाद्यान्न बाजारावर कब्जा करण्याची युरोपीय संघ आणि अमेरिकेची ही चाल होती. तुम्हाला आश्चर्य वाटेल, कृषी कराराचा मसुदा कारगील कॉर्पोरेशनचे (धान्य निर्यात करणारी जगातील सर्वात मोठी कंपनी) भूतपूर्व कार्यकारी निर्देशक डॅन एम्सस्टांज यांनी तयार केला होता.[३०] डॅन एम्सस्टांज गॅटमधील अमेरिकेचे प्रतिनिधी होते. तसेच उरुग्वे फेरीतील (१९८७-८९)[३१] मुख्य मध्यस्तही होते.

डिसेंबर १९९३ मध्ये ब्लेअर हाउस सहमतीच्या रूपात कृषीकराराचा अंतीम मसुदा तयार करण्यात आला. हा मसुदा ब्लेअर हाउस, वॉशिंग्टन येथे अमेरिका आणि युरोपीय संघांनी मिळून तयार केला.[३२] या दोन महाशक्तींच्या असे लक्षात आले की आपण दोघेही शेती अनुदान देतोय तसेच विश्व बाजारातील निर्यातीत आपण प्रतिस्पर्धी आहोत. यामुळे दोघांचेही नुकसान होते आहे. या दोहोंनी गॅटमध्ये कृषीकरारांना सामील करण्याचे ठरवले. यामध्ये कृषीवरील अनुदानात कपात, व्यापार सुकर करण्यासाठी कृषीक्षेत्राला दिलेले संरक्षण दूर करणे ही कलमे सक्तीची केली गेली. या मसुद्यातील हे कलम अनेक विकसनशील देशांना अन्याकारक वाटले. पण श्रीमंत देशांच्या दबावाखाली त्यांना अखेरीस हे मान्य करावे लागले. विकसनशील देशांनी करार मान्य करण्याचे ठरवले कारण त्यांना सांगण्यात आले होते की त्यांच्या शेतमालाला विकसित देशातील बाजारपेठ खुली होईल, शेतमालाला जास्त भाव मिळेल, त्याला मोठे मार्केट मिळेल. त्यामुळे हा शेतकऱ्यांचा विजय आहे असा गाजावाजाही या देशांनी केला. प्रत्यक्षात श्रीमंत देशांनी आपला शेतमाल आणि प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांनी विश्व बाजार काबीज केला. व्यापाराचे जाचक नियम आणि अटी, उत्पादन खर्चात वाढ आणि प्रमुख उत्पादनांच्या निर्यातीचे गडगडणारे भाव यामुळे विकसनशील देश या स्पर्धेत टिकाव धरू शकले नाहीत.

---

*30. http://www/lobbywatch.org/archieve2.asp?arcid=1005*
*31. http://www.usda.gov/wsp/portal/usda/usdahome?contentid=2003/04/0132.html*
*32. http://www.fao.org/docrep/004/w7841le/w7841e04.htm*

कृषीकराराचा मुख्य उद्देश व्यापारातील प्रतिबंध दूर करणे आणि शेतीला आंतरराष्ट्रीय व्यापारात सामील करणे हा होता. कृषीकरारानुसार कृषी उत्पन्न विपणनामध्ये तीन अडचणी आहेत – क) बाजार प्रवेशास प्रतिबंध (कर अणि इतर शुल्क), ख) घरगुती समर्थन (शेतमालाला सब्सिडी– ज्यामुळे स्वदेशी अन्नधान्य स्वस्त होते) ग. निर्यात प्रतिस्पर्धा, ज्यामध्ये निर्यात सब्सिडी आणि निर्यातसंबंधींचे उपाय सामील आहेत. या सा–या व्यापार प्रतिबंधांना निश्चित कालावधीत टप्प्याटप्प्याने कमी करणे हे कृषीकराराचे लक्ष्य ठरवले गेले.

## **बाजारात शिरकाव करण्याची संधी** (Market Access)

विविध देश कोणत्या मर्यादेपर्यंत विदेशी वस्तूंना आपल्या बाजारात शिरकाव करण्याची अनुमती देतो याला 'बाजारात शिरकाव करण्याची संधी' असे म्हणतात. बरेच देश विदेशी मालाला मर्यादित ठेवून स्वदेशी उत्पादकांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेपासून सुरक्षित ठेवतात. याच्या दोन पद्धती आहेत – क) कर (आयात कर) , ख) इतर शुल्क. कृषी उत्पादनांच्या आयातीला नियमीत करण्याकरिता, सर्वसाधारपणे या दोन्ही पद्धतींचा उपयोग केला जातो. या संरक्षणवादी पद्धतींना काढून टाकणे वा त्यांना नियमित करणे याकरिता बाजारात प्रवेशाच्या संधींचा निर्णय आपल्याजवळ ठेवला गेला. संधी देऊन वा नाकारून देशांवर नियंत्रण मिळवणे हा डाव होता.

जकात कर हा व्यापारातील अवरोध नसून त्यातून सरकारला महसूल मिळतो. विकसनशील देशांसाठी जकात कर हे उत्पन्नाचे महत्वपूर्ण साधन असते. व्यापारातील जाचक अट म्हणजे कोटा (प्रमाण), व्यापार प्रतिबंध, अस्थायी कर, न्युनतम आयात मूल्य, परवाना देणे वा नाकारणे (discretionary licensing), राज्याच्या व्यापाराच्या पद्धती (State trading measures), ऐच्छिक प्रतिरोध करार (Voluntary restraint agreement) इत्यादी सामील आहेत. हा प्रतिरोध मुक्त आणि उचित व्यापारात (Free and fair trade) अडथळे निर्माण करतो. कृषीकरारांतर्गत अतिरिक्त शुल्क रद्द केले जाते किंवा त्यांचा जकाती करातच अंतर्भाव केला जातो. या प्रक्रियेला अतिरिक्त शुल्काचे जकातीत रूपांतर म्हणतात. या जकातीची रक्कम निश्चित करण्याकरीता १९८६ ते ८८ च्या आधार घेतला आहे. अतिरिक्त शुल्क रद्द केले गेले की नियमानुसार ते पुन्हा सुरू करता येत नाही. कृषीकराराप्रमाणे या शुल्काचे जकातीमध्ये रूपांतर करणे बंधनकारक आहे. बाजारातील प्रवेश संधीअंतर्गत पुढील अटी आहेत–

- विकसित व विकसनशील देशांनी आपल्या अतिरिक्त शुल्कांना थेट जकातीत रूपांतरीत करावे.
- सर्व प्रकारचे कर बंधनकारक आणि स्थायी स्वरूपाचे असावे. त्यांना एका मर्यादेपलिकडे वाढवू शकत नाही. उदा. भारताने आपल्या धान्यावर १०० टक्के, प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांवर १५० टक्के आणि खाद्य तेलावर ३०० टक्के कर निश्चित केला आहे.
- कृषी कराराप्रमाणे निश्चित केलेल्या करांमध्येच कपात करणे शक्य आहे. (applied) उपयोजित करांमध्ये कपात करण्याची मुभा नाही.
- विकसित देशांनी आपल्या आयात जकातीमध्ये सहा वर्षांच्या अवधीत समप्रमाणात ३६ टक्के कपात करावी. ज्यात कोणत्याही एका उत्पादनावर कमीतकमी १५ टक्के कपात करावी

लागेल.[३३]

- विकासनशील देशांनी आपला जकात कर दहा वर्षांच्या अवधित समप्रमाणात कमी करावा, ज्यामध्ये कोणत्याही एका उत्पादनावर कमीत कमी १० टक्के कपात असावी.
- कमी विकसित देशांमध्ये आपल्या जकातकर दरांमध्ये कपात करण्यासाठी सर्वसाधारणपणे कोणत्याही प्रकारची अट नाही. परंतु त्यांनी आपल्या जकातकर दराला स्थिर ठेवावे.

जकातकराची रक्कम निश्चित करण्याकरिता १९८६ ते ८८ चा आधार घेतला आहे. याआधारे आजचा जकातदर निश्चित करण्यात आला आहे. १९८६ ते ८८ ही आधारवर्षे मानण्याचा निर्णय विकसित देशांचा. याच वेळेस उरूग्वे फेऱ्यांची सुरूवात झाली होती. सर्व विकसित देशांना कृषी करारात ढवळाढवळ होते आहे असे वाटू लागले होते. त्यामुळे त्यांनी आपल्या जकात करात भरपूर वाढ केली. पुढे जाऊन करात कपात करण्याची पाळी आली तरी अडचण निर्माण होवू नये म्हणून हे करण्यात आले होते. खरे पाहायला गेले तर करांतील ३६ % कपात या देशांसाठी काही मोठी बाब नव्हती.

कृषीकरार आयातीवरील कोणत्याही प्रकारच्या अतिरिक्त करास नाकारत नाही. सरकारांकडे विश्व व्यापार संघटनेकडे कराराच्या चौकटीत काही पर्याय उपलब्ध आहेत. या मधील प्रमुख उपाय पुढीलप्रमाणे– बाजारातील शिरकावाच्या संधी –

- आयात मर्यादेमुळे आंतर्राष्ट्रीय कर्ज परतफेडीतील (balnce of payment) समस्या कमी होतील (गॅटमधील कलम XII आणि कलम XVIII)
- सर्वसाधारण संरक्षण(गॅटमधील कलम दखद व संरक्षणकरार–Safeguard agreement)
- सर्वसामान्य अपवाद (गॅटमधील कलम दखद सार्वजनिक नैतिकता, मानवी–प्राणी–वनस्पती जीवन आणि आरोग्य रक्षणासंबंधी आहे)
- आरोग्य आणि घाण/जंतूंपासून बचावासंबंधी (Sanitary and phyto sanitary) उपाय. यामध्ये अन्न सुरक्षितता, प्राणी आणि वनस्पतींच्या आरोग्यासंबंधींचे उपाय
- व्यापारातील तांत्रिक अडचणी, उदा. उत्पादन मानके, तांत्रिक नियमन व लेबलिंगसंबंधी
- विश्व व्यापार संघटनेतील इतर तरतुदी खासकरून कृषी संबंधी नाहीत.

**प्रवेशाच्या न्यूनतम संधीः**

वैश्विक बाजारात प्रवेश करण्याची संधी हवी असल्यास देशांनी आपल्या घरगुती उपभोगानुसार किमान प्रमाणातील कृषी उत्पादने आयात करणे बंधनकारक आहे. असे केल्यासच विश्व बाजारात प्रवेश मिळू शकतो. जकात कराव्यतिरिक्त इतर प्रतिबंधांचे करात रूपांतर केल्यास त्याच्या दरात मोठी वाढ होऊ शकते. (उदा. जपान मध्ये तांदूळ आयात केल्यास ८०० टक्के आयात कर भरावा लागतो) या स्थितीवरील तोडगा म्हणून काही उपायांचा अंर्तभाव केला आहे. 'बाजारात प्रवेश' या कलमाखाली तो सुकर करण्याचे उपाय कृषीकरारात अंतर्भूत आहेत.

---

*33. प्रशुल्क-क्रम /श्रेणी वे उत्पाद है जिन्हे आयात प्रशुल्क के निर्धारण के लिए काफी विस्तृत रुप मे परिभाषित किया जाता है । इन उत्पादों को उप विभाजित भी किया जाता है । उत्पादों के कोड में मौजूद अंकों की संख्या से विभाजन की स्थिति का पता लगाया*

देशांना 'विशेष व्यवहार' पोट कलमाचा फायदा घ्यायचा असल्यास (special treatment clause) 'किमान उपयोगाच्या संधी' निर्माण कराव्या लागतील. या पोटकलमानुसार कृषी उत्पादनांची आयात घरगुती खपाच्या ३% पेक्षा कमी असेल तर 'प्रवेशाच्या न्यूनतम संधी' नुसार 'आयात करातील कोटा' (Tariff rate quota) लागू करावा लागेल. विशिष्ट प्रमाणासाठी आयात कराचा दर कमी असेल. यामुळे कमी आयात कर असलेले किमान प्रमाणातील आयात धान्य मिळते. या प्रमाणापुढील आयात कर वाढत जाईल. १९९५ वर्षातील अनुमती असलेला आयतीचा कोटा वर्ष १९८६-८८ या मूळ वर्षातील सरासरी वार्षिक उपभोगाच्या ३ टक्के पेक्षा कमी नसावा असे त्रैराषिक विश्व व्यापार संघटनेने तयार केले आहे. वर्ष २000 अंती विकसित देशांनी हा कोटा ५ % करावा आणि विकसनशील देशांनी हा कोटा २००४ अंती वाढवावा असे ठरले. या तरतुदीमुळे जरूरी असो वा नसो किमान शेतमाल आयात करावा लागणार. ही जबरदस्तीची तरतूद मुक्त व्यापारात कशी असू शकते? अशी तरतूद असलेल्या व्यापारास मुक्त व्यापार कसे म्हणावे? खरेतर स्वदेशी बाजाराला संरक्षण देण्याची जरूरी असताना किमान शेतमाल आयात करण्यास भाग पाडले जाते. किमान संधी वचनबद्धतेतून (Minimum access commitment) टॅरिफ रेट कोटा म्हणजेच जकात कर दराचा कोटा सर्वात अनुकूल देशास (Most favoured nation) दिला जातो. खरेतर सर्व देशांना तो समानपणे मिळायला हवा. २०१५ मध्ये विश्व व्यापार संघटनेच्या ३७ सदस्य[३४] देशांनी (युरोपिय संघातील २८ देशांना एक मानून) त्यांच्या यादीत टॅरिफ रेट कोटा जाहीर केला आहे. विश्व व्यापार संघटनेच्या सदस्य देशांमध्ये उत्पादनावरील एक हजाराच्या वरील टॅरिफ कोटा आहेत.

## विशेष संरक्षण

विदेशी मालापासून स्वदेशी बाजाराचे संरक्षण केवळ वस्तूंसाठीच जारी करता येते. या वस्तूंवर कर आकारला जातो त्यांनाच संरक्षण देता येते. या तरतुदीमुळे देश तात्पुरत्या स्वरूपातील अधिक शुल्क आकारू शकतो. परंतु हे शुल्क सी शुल्काच्या एक तृतियांशापेक्षा अधिक नसावे. आयातीत वाढ किंवा प्रभावित वस्तूंची किंमत अचानक घसरल्यास या तरतुदीचा उपयोग करू शकतो. दोन प्रकारच्या स्थितीत हे विशेष संरक्षण लागू करता येते. क)आयात माल जेव्हा निर्धारित प्रमाणाची सीमा पार करतो, ख)निर्धारित किंमतींपेक्षा आयात मालाची किंमत घसरते तेव्हा आधार वर्षाच्या संदर्भात उत्पादनाच्या किंमती सरासरी किती असाव्या हे ठरवले जाते.

एका वेळेस कोणतीही एक तरतूदच लागू करता येते, दोन्हीही नाही. वर्तमानातील आयातीची किंमत संदर्भवर्षांच्या सरासरी मूल्यांपेक्षा कमी असल्यास विशेष सुरक्षा तरतुद लागू करता येते. कृषीकरारानुसार देशांना हे मूल्य जाहीर करावे लागते. दुस-या बाजूला प्रमाण टिर्गर प्रमाण दोन घटकांना जोडून तयार केलेले आहे - घरेलू खपामधील बदल आणि आयात प्रमाणातील एकूण वाढ या सूत्रानुसार अतिरिक्त सीमा शुल्क जारी करण्यात येते. कृषीतील 'विशेष सुरक्षा' आणि व्यापारातील विशेष संरक्षण तरतुदी भिन्न आहेत. जेव्हा आयातीमुळे नुकसान होण्याचा संभव असतो तेव्हा विशेष संरक्षण तरतूद लागू होते आणि घरेलू कृषीउत्पादनांवर संकट येवू नये

*34. http://www.wto.org/english/resše/bookspše/agricšagreementšseriesš2.pdf*

म्हणून कृषी सुरक्षा उपाय लागू करता येतात.

ज्यांनी विशिष्ट उत्पादनांकरिता 'सीमाशुल्कीकरण' केले आहे अशा अडतीस विकसित आणि विकसनशील देशांनाच विशेष संरक्षण तरतुदी लागू करता येतात. या गटामध्ये एकही कमी विकसित देश सामील नाही. दक्षिण आफ्रिका देशासोबत 'सीमासंघा'त सामील असलेल्या उपसहारा आफ्रिकी देशांना हा उपाय उपलब्ध झाला. हे देश आहेत– दक्षिण आफ्रिका, नामिबिया, स्टीझरलँड, आणि बोस्टवाना. विशेष संरक्षण तरतुदी एकानंतर एक अशा क्रमानी निर्धारित केल्या जातात. काही प्रबळ देशांकडे मोठ्या प्रमाणावरील उत्पादनांना तरतुदीक्रम उपलब्ध आहे. ते देश याचा पुरेपूर फायदा उठवतात. उदा. युरोपीय संघाकडील ५३९ उत्पादने ज्यातील २४ टक्के कृषी उत्पादने आहेत, नॉर्वेकडील ५८१ उत्पादने, स्विझरलँड–लिचेंस्टनकडील ९६१ उत्पादने.[३५] या तुलनेत विकसनशील देशांनी विशेष संरक्षण प्रावधानांचा फारसा उपयोग केलेला दिसत नाही.

### विशेष व्यवहार उपकलम

आपल्या काही उत्पादनांसाठी 'सीमाशुल्कीकरण' करू इच्छित नाहीत अशा देशांना विशेष व्यवहार उपकलम लागू होते. संरक्षण उपकलमाप्रमाणे विशेष व्यवहार उपकलमही सीमाशुल्कात पूर्ण सूट मिळत नाही, पण काही काळासाठी हे स्थगित केले जाते. यामध्ये प्रमुख खाद्यांना काही काळासाठी सुरक्षित ठेवले जाऊ शकते. विकसित देशांसाठी हा अवधी त्याच्या समाप्तीपर्यंत महणजे वर्ष २००० पर्यंत होता. विकसनशील देशांसाठी स्थगितीचा अवधी १० वर्षांचा, म्हणजे वर्ष २००४ पर्यंतचा होता. काही देशांनी आपल्या केवळ दोन उत्पादनांसाठी त्याचा उपयोग केला. जपान आणि कोरियाने तांदुळासाठी, इस्त्राईलने बकरीच्या मासांसाठी आणि काही दुग्धजन्य पदार्थांसाठी त्याचा उपयोग केला होता. चीन–ताइपी हा देश २००१ साली सदस्य बनला. तांदुळासाठी त्या देशालाही 'विशेष व्यवहार' प्रावधान राबवता आले.

त्या उत्पादनांना टप्प्याटप्प्याने वाढणाऱ्या कोट्याच्या तत्त्वावर बाजारपेठेत प्रवेश मिळणे ही या देशांची गरज होती. उदा. दक्षिण कोरियाने तांदळाच्या आयातीचे जकात धोरण २०१४पर्यंत पुढे ढकलले, परिणामी १९९५ मध्ये ठरलेल्या ५१३०७ टन आयात कोटा घेऊन किमान बाजार प्रवेशानुसार (एमएमए) कोरियाला बाजारात प्रवेश करावा लागला आणि यामुळे २००४ मध्ये द. कोरियाच्या एकूण वार्षिक तांदूळ वापराच्या ४ टक्के म्हणजे २०५२२८ टन वाढ एमएमए मध्ये झाली आणि एप्रिल २००४ मध्ये ४.४ टक्क्यांवरून ७.९६ टक्क्यांपर्यंत वाढ करण्याच्या अटीवर कोरियाच्या तांदूळ आयातीला दिलेल्या या खास सवलतीला २०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. परिणामी २०१४ मध्ये तांदूळ आयातीचा आकडा ४०८७०० टनांपर्यंत पोहोचला.

मे २००५ पर्यंत पांचापैकी चार देशांनी या बंधनांचे पालन बंद केले आणि आता केवळ जकात आकारणी उरली आहे. जपान, चिनी तैपेई, इस्राएल आणि कोरिया प्रजासत्ताक यांनी नियंत्रणांचे रूपांतर समकक्ष जकातीमध्ये केले आणि संबंधित उत्पादनांवर साधारण कस्टम कर आकारणी सुरू केली. तांदळाच्या सर्वसाधारण कस्टम करातील रूपांतरासाठी फिलिपाइन्सला जून २०१७

*35. http://www.southcentre,int/wp-content/uploads/205/12/NšSpecial-Safeguard-in-agriculture.pdf*

पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

## दोहा बैठकीनंतरचा बाजार-प्रवेश

एओएच्या बाजारप्रवेश नियमांचा विकसित देशांमधील संरक्षित बाजारपेठांमध्ये खुलेपणा आणण्यास फारच थोडा उपयोग झाला. 'संवेदनशील उत्पादन', 'अयोग्य कर आकारणी', 'उच्च कर' किंवा 'करांचे सुलभीकरण' असे शेरे मारून आपल्या हितसंबंधांतील उत्पादनांवर 'एसएसजी'मार्फत निर्बंध लादून या देशांनी आयात व्यापाराची मोडतोड केली.

जुलै पॅकेज या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या धोरणानुसार यातील काही तरतुदी अंमलात आणल्या गेल्या. यामध्ये संवेदनशील उत्पादने, विशेष उत्पादने आणि विशेष संरक्षित उत्पादने यांचा समावेश होतो. जागतिक शेतीमाल व्यापारातील बदलांचा पाया या कराराने घातला. जिला 'विकास परिषद' संबोधण्यावर विकसित राष्ट्रांनी भर दिला अशा दोहा (कतार) येथील जागतिक व्यापार संघटनेच्या २००१ मधील चौथ्या बैठकीचा हा परिणाम होता. या बैठकीचा हेतू प्रामुख्याने सरकारांनी आखावयाची स्पर्धा, गुंतवणूक, पारदर्शकताविषयक धोरणे आणि व्यापारविषयक सवलतीची 'सिंगापूर मुद्दा' या गोंडस नावाखाली निर्मिती असा होता. तरी त्या नावाने मुक्त व्यापार प्रचारात आणण्याचा विकसित देशांचा मतलबी हेतू पुरता फसला. कारण विकसित राष्ट्रांकडून अंतर्गत अनुदानाची कपात, विकसित देशांकरिता विस्तारित बाजारपेठांची मागणी आणि शेतीमालाच्या अनुदानावरील नियंत्रणे यांवर एकमत होऊ शकले नाही. विशेषत: विकसित देशांमधील कापूस उत्पादकांना देण्यात येणाऱ्या भरघोस अनुदानाला चार पश्चिम आफ्रिकी देशांनी विरोध केला. मेक्सिकोतील कॅनकून येथे २००३ मध्ये भरलेल्या जागतिक व्यापार संघटनेच्या पाचव्या बैठकीवरदेखील या कापसाच्या मुद्याचा परिणाम झाला. कॅनकूनच्या अपयशाचा एक परिणाम असा की सिंगापूर मुद्यावर निर्णय घेता न आल्याने जागतिक व्यापार संघटनेची मंत्रीपरिषद बरखास्त करण्यात आली.

संवेदनशील उत्पादने : कमी करआकारणी करण्यात येणाऱ्या उत्पादनांचा 'संवेदनशील उत्पादनां'मध्ये समावेश करण्याचा अधिकार विकसित आणि अविकसित अशा दोन्ही प्रकारच्या देशांना आहे. त्या देशाच्या करआकारणीच्या हिश्श्यावर ते अवलंबून आहे. विकसित देशांना हा हिस्सा ४ टक्के तर अविकसित देशांना ५.३३ टक्के आहे. वाढीव कोट्यासाठी करावयाच्या विनिमयात या उत्पादनांवरील करात काही अंशी कपात अपेक्षित आहे. याचा अर्थ, संवेदनशील उत्पादनांच्या बाजार प्रवेशासाठीदेखील कर आकरणी कोट्याची सांगड घालावी लागेल.

उच्च कर : विकसित देशांच्या हितसंबंधांतील उत्पादनांवर कमी कर आकारणीचा मुद्दा विकसनशील देशांनी दोहा बैठकीत उचलून धरला. १९९५ मध्ये ओईसीडी देशांमध्ये गहू २१४ टक्के, बार्ली १९७ टक्के आणि मका १५४ टक्के अशी सरासरी आकारणी होती. उरुग्वे कर निरीक्षण बैठकीनंतर यूएनसीटीएडी आणि डब्ल्यूटीओ यांनी केलेल्या विकसित देशांच्या निर्यातविषयक १९९७ च्या संयुक्त पाहणीनुसार अमेरिका, कॅनडा, जपान आणि युरोपियन युनियनमधील देश कर आकारणीत कमालीची तफावत दिसून आली. या आत्यंतिक कर आकारणीमुळे विकसनशील देशांमधून विकसित देशांना होणाऱ्या कापड, मासे, मत्स्यपदार्थ इत्यादीसारख्या

पदार्थांच्या निर्यातीला खीळ बसते. उदा. अमेरिका, कॅनडा, जपान आणि युरोपियन युनियनमधील देश साखर, दुग्धजय पदार्थ, मांस, फळे, भाज्या यांवर ३५० ते ९०० टक्के इतकी उच्च कर आकारणी करतात. हा विकसनशील देशांसाठी गंभीर मुद्दा आहे.

करवृद्धी : मूल्यवर्धित करांमुळे विकसनशील देशांकडून विकसित देशांना होणाऱ्या निर्यातीला खीळ बसते. अर्धप्रक्रिया केलेल्या पदार्थांच्या तुलनेने कच्च्या मालावर विकसित देश कमी कर आकारतात. अशा करवृद्धीमुळे कच्च्या मालाची बाजारपेठ वधारते. परंतु उच्च किमतीच्या तयार मालाला स्पर्धेपासून सुरक्षित ठेवते. परिणामी विकसनशील देश कच्च्या मालाचे निर्यातदारच बनून राहतात आणि तयार वस्तूंच्या उत्पादनाच्या बाजार-प्रवेशात मागे पडतात. शेतीमालाचे उत्पादन आणि त्यावरील प्रक्रियेच्या क्षेत्रात विकसनशील देश मागे पडण्याचे हे एक कारण आहे. उदा. उत्तर अमेरिकेतील देशांमध्ये प्राणी आणि प्राणिज उत्पादने, भाज्या, साखर आणि तंबाखू व तंबाखूजन्य उत्पादनांची करवृद्धी आढळली. ही वाढ या प्रकारची उत्पादने करणाऱ्या देशांना मारक ठरली. संवेदनशील उत्पादनांना करवृद्धीची पद्धत लागू पडत नाही.

कर सुलभीकरण : विकसनशील देशांतील उत्पादनांपासून आपली बाजारपेठ सुरक्षित ठेवण्यासाठी विकसित देशांकडे आणखी एक उपाय असतो. नॉर्वे, स्वित्झर्लंड, कॅनडा आणि काही युरोपियन समुदायातील देश आयात करावयाच्या शेतीमालावर अवर्धित कर आकारतात, त्यायोगे विकसनशील देशांमधून होणाऱ्या आयातीपासून संरक्षण मिळते. त्यामुळे एओए हे केवळ गरीब देशांमधील बाजारपेठेच्या खुलेकरणावर भर देते आणि विकसित देशांचे हितसंबंध जोपासते असे म्हणता येईल. सभासद देशांमध्ये दुहेरी व्यवहारातून खुलेपणा आणण्याची कल्पना निनरर्थक असल्याचेही यावरून स्पष्ट होते आणि दोहा परिषदेत विकसनशील देशांना विशेष आणि निराळी वागणूक देण्यास विकसित देशांचा विरोध होता, हे त्याचेच द्योतक आहे.

विशेष आणि निराळी वागणूक : विशेष आणि निराळी वागणूक देऊन विकसनशील देशांतील शेतीला प्रोत्साहन देणे दोहा परिषदेला अभिप्रेत होते. पैसा, स्पर्धात्मकता आणि तंत्रज्ञानाची कमतरता असल्यामुळे विकसनशील आणि अल्प विकसित देशांनी विशेष सवलती मिळविण्यासाठी दीर्घकाळ संघर्ष केला आहे. दोहा परिषदेतील जाहीरनाम्यानुसार या सवलती पायाभूत असल्याचे प्रतिपादन विकसनशील देश नेहमीच करत आले. देशातील अन्नसुरक्षा, शेतीवरील उपजीविका आणि ग्रामीण विकास यांच्या पूर्ततेसाठी विशेष उत्पादने आणि विशेष संरक्षक यंत्रणा यांची तरतूद झाल्याशिवाय दोहा परिषदेच्या आराखड्यासंबंधी सर्वसमावेशक करार करायचा नाही असे जी ३३ या विकसनशील देशांच्या गटाने ठरविले. परंतु गरिबांना अन्नसुरक्षेची हमी देण्यासाठी आयात हाच सर्वोत्तम पर्याय आहे, असा पवित्रा घेत विशेषत: अमेरिकेने या मुद्द्याला सतत विरोध केला. कारण या संरक्षक तरतुदी विकसित देशांच्या गरीब देशांतील बाजारपेठेतील शिरकावाला अडथळा ठरल्या असत्या. तथापि जुलै २००४ च्या आराखड्याच्या आधारे विकसनशील देशांनी शेतीसाठी अशा सवलती प्राप्त केल्या. डिसेंबर २००५ च्या हाँगकाँग येथील परिषदेत त्यावर शिक्कामोर्तब झाले आणि ६ डिसेंबर २००८ रोजी विशेष आणि निराळी वागणूक साध्य करणारी सूत्रे त्यांच्या हाती आली.

विशेष उत्पादने : अन्नसुरक्षा, शेतीवरील उपजीविका आणि ग्रामीण विकास यांकरिता विशिष्ट

महत्त्वाची शेती उत्पादने म्हणजे विशेष उत्पादने. या वर्गीकरणामुळे विकसनशील देशांना करकपातीमध्ये लवचिकता आणता येते. उत्पादनांचे हे त्या देशांनी स्वत: करावयाचे वर्गीकरण अन्नसुरक्षा, शेतीवरील उपजीविका आणि ग्रामीण विकास याबाबत बारा निकषांवर आधारित आहे. ते उत्पादन दुहेरी आहे का, देशांतर्गत वापर, रोजगार निर्मिती, उत्पन्न, अथवा खर्च यामध्ये त्याचा जास्त प्रमाणात वाटा आहे का किंवा एखाद्या डब्ल्यूटीओ सदस्याकडून सहकार्य मिळण्यासाठी त्याची नोंदणी उपयुक्त ठरेल का आणि ते उत्पादन १९९५ ते २००१ या काळात त्या देशाकडून निर्यात झाले आहे का, असे हे निकष आहेत.

डिसेंबर २००५ च्या हाँगकाँग मंत्रिपरिषदेने घोषित केले की, 'अन्नसुरक्षा, शेतीवरील उपजीविका आणि ग्रामीण विकास या निकषांच्या आधारे विशेष उत्पादनांमध्ये योग्य त्या वस्तूंचा समावेश करण्यासंबंधी विकसनशील देशांना स्वातंत्र्य असेल. ही उत्पादने अधिक लवचिक धोरणास पात्र ठरतील. तेव्हापासून भारत, जी २० आणि जी ३३मधील देशांनी २० टक्के शेतीउत्पादनांचा शून्य करआकारणीत समावेश करण्याची मागणी केली. तथापि, विशेष उत्पादने आपला विकसनशील देशांमधील बाजार प्रवेश रोखतील, असे म्हणत विशेषत: अमेरिका वगैरे विकसित देशांनी तिला तीव्र विरोध केला.

बहुधा त्यामुळेच ६ डिसेंबर २००८ च्या दुरुस्त्यांमधून जी ३३ देशांच्या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात आले आणि विशेष उत्पादनांवरील करात १२ टक्के उत्पदनांवर ११ टक्के कपात आणि ५ टक्के उत्पादनांना शून्य टक्के करआकारणी सुचविण्यात आली. उदा. भारतातील ७०० पैकी फक्त ३५ शेती उत्पादनांचा शून्य टक्के यादीत समावेश होऊ शकला. याचा अर्थ भारतातील प्रत्येक राज्यातील एकाच उत्पादनाला संरक्षण मिळाले. खरे म्हणजे भारतासारख्या वैविध्यपूर्ण हवामानाच्या देशात शंभर उत्पादने विशेष म्हणून घोषित केली तरी अन्नसुरक्षा, शेतीवरील उपजीविका आणि ग्रामीण विकास साध्य करण्यास अपुरीच पडतील. अद्याप भारताने अशा उत्पादनांची यादी जाहीर केली नसली तरी त्यामध्ये साधारणत: दुग्धजन्य पदार्थ, फळे, मसाले, धान्ये, तेलबिया अणि खाद्यतेलांचा समावेश असावा. विशिष्ट उत्पादनांना करकपात मर्यादेबाहेर ठेवून भारतासारखे देश विकसित देशांच्या स्पर्धेला तोंड देऊ शकतील, अशी आशा बाळगू या. श्रीमंत देशांना विविध गटांना अनुदाने देण्यास आणि विकसनशील देशांतील मालावर उच्च कर लावण्यास उपयोगी पडणाऱ्या परिस्थितीवर यामुळे नियंत्रण मिळविता येईल.

विशेष संरक्षण यंत्रणा :– दोहा कराराने विशेष संरक्षण यंत्रणा (एस.एस.एम.) ही विशेष आणि वेगळ्या वागणुकीस उपयोगी पडणारी आणखी एक सुविधा विकसनशील देशांना दिली आहे. २००५ मधील हाँगकॉग मंत्रिपरिषदेचा जाहीरनामा म्हणतो, आयातीचा आकार आणि किंमत यावर आधारित आकारणी विकसनशील राष्ट्र करू शकतात. आयातीची लाट आणि दरांतील घसरण यापासून आपल्या गरीब शेतकऱ्यांचा बचाव करण्यास त्यांना एस.एस.एम. उपयुक्त ठरेल.[३६]

---

*36. आयात लहर या अत्याधिक कृषि आयात का अर्थ है जब अचानक आयात की मात्रा बहुत ज्यादा बढ जाती है या आयात औसत से काफी कम कीमत पर होने लगता है । आयात लहर के स्थानीय उत्पादन और किसानों की आजीविका पर दूरगामी प्रभाव पडते है । इससे स्थानीय खाद्य सुरक्षा भी बहुत प्रभावित होती है क्योंकि आयात मात्रा में अचानक वृद्धि से कीमतों में गिरावट से घरेलू आर्थिक क्षेत्रों के लिए शतरा बढ जाता है ।*

देशांतर्गत शेतकऱ्यांना मारक ठरणारी शेतीमालाची जादा आयात किंवा दरातील घसरण यावर नियंत्रण ठेवण्याचे साधन त्या कराराने विकसनशील देशांना उपलब्ध करून दिले.

तथापि एस.एस.एम. लागू करण्यासाठी या देशांना आयातीचे प्रमाण आणि दरातील घसरणीचे नीचांक निर्धारित करावे लागतील. साधारण सीमा शुल्कात वाढीसाठी आयातीचा आकार आणि दरातील घसरणीसाठी दर निर्धारण उपयोगी पडेल. दर निर्धारणापेक्षा खाली उतरू लागले की एस.एस.एम.लागू करता येईल. म्हणून कर आकारणी केव्हा करायची ते निर्धारणाचे निकषांवरून ठरविता येईल. आयातीच्या प्रमाणाचे निर्धारण जास्त उंचीवर झाले तर किंवा दर निर्धारण फारच खालच्या पातळीवर झाले तर एस.एस.एम.ची परिणामकारकता उरणार नाही. डब्लू.टी. ओ. मधील वाटाघाटी या कारणामुळेच (अ) निर्धारण, (ब) उपाययोजनेची व्याप्ती आणि (क) उपाययोजनेचा कालावधी या टप्प्यांवर रखडल्या.

उत्तरेतील भरघोस अनुदानप्राप्त उत्पादनांच्या आयातीमधील आकस्मिक वाढीवर नियंत्रण ठेवण्याकरिता सहजपणे एस.एस.एम. वापरता यावे ही विकसनशील देशांची मागणी यामुळेच पुढे आली. आयात वस्तूंचे मूल्य आणि आकार या दोहोंमुळे बाजारपेठेत निर्माण होणाऱ्या परिस्थितीवर नियंत्रण मिळविता आले पाहिजे. उपाययोजना तात्पुरती असावी आणि बाजारपेठेला किती हानी पोहोचली ते सिद्ध करण्याचे पुरावे आवश्यक मानले जाऊ नयेत. कारण ते लवकर मिळत नाहीत. याशिवाय, सर्व शेती उत्पादनांना एस.एस.एम. वापरता यावा, उपाययोजना अतिरिक्त कर आकारणी व्हावी आणि तिचे विद्यमान समस्येशी समप्रमाण असावे, आयातीचा आकार जेवढा मोठा आणि किमतीतील घसरण जितकी अधिक, तितक्या जास्त प्रमाणात अतिरिक्त कर लावता यावेत, अशी मागणी विकसनशील देशांनी केली.

तथापि विकसित ब्राझीलसारख्या काही निर्यातदार विकसनशील देशांनी एस.एस.एम.ला नेहमीच विरोध केला. या उपायाच्या वापरावर अनेक अटी लादून त्यांनी ते निष्प्रभ करून टाकले. उदा. ४० टक्क्यांपेक्षा आयात वाढली तर एस.एस.एम. वापरताच येणार नाही म्हणून भारत व अन्य देशांनी ते अमान्य केले. मूल्य निर्धारण लागू करण्यापूर्वी बाजारपेठेची पाहणी व्हावी असे अमेरिकेचे मत. याउपरही आयात करणाऱ्या देशाने तीन वर्षांतील आयातीचा आकार जास्त असल्याचे दाखवून द्यायला हवे, असे अमेरिका म्हणाली. या उपायांची परिणामकारकता कमी करणे एवढाच अमेरिकेचा हेतू! दुर्दैवाने डिसेंबर २००८ च्या परिषदेत कृषी समितीच्या अध्यक्षांनी अशा अनेक अटी पुढे आणल्यामुळे विकसनशील देशांना एस.एस.एम. निरुपयोगी बनला.[३७] विकसनशील देशांतील मालाच्या आयातीचा परिणाम आपल्या देशातील उत्पादनांवर होऊ नये म्हणून विकसित देशांनी ठरविल्यापेक्षाही बऱ्याच कमी होत्या, हे विशेष!

आजही एस.एस.एम. हा डब्लूटीओमधील कृषी वाटाघाटींमध्ये वादाचा मुद्दा आहे आणि विकसित व विकसनशील देशांतील विवादाचा विषय आहे. डिसेंबर २०१५ मधील नैरोबी मंत्रिपरिषदेपुढील चर्चेत विकसित राष्ट्रांनी खोडा घातला. एस.एस.एम.चा मुद्दा विकसनशील देशांनी सोडून द्यावा अन्यथा आणखी काही उत्पादनांचा विशेष यादीत समावेश करावा असा आग्रह युरोपियन युनियन आणि अन्य विकसित देशांनी धरला.

---


*37. जैसा WTO में दिए गए २४ एप्रिल २००६ के अमेरिका के प्रस्ताव में उल्लिखित है ।*

भारतातील काही अर्थतज्ज्ञांनीसुद्धा विकसित देशांची तळी उचलून धरली ही खेदाची गोष्ट! भारतात विशिष्ट उत्पादनांवरील अधिकतम कर आणि जवळजवळ नगण्य असणारे उपयोजित कर यांतील अंतर जास्त आहे असा दावा काही तज्ज्ञांनी केला. त्यामुळे एस.एस.एम. ऐवजी उपयोजित करांत वाढ करून ते अधिकतम करांच्या जवळपास आणावे. परंतु भारतात काही उत्पादनांबाबत अधिकतम आणि उपयोजित करांमध्ये जवळजवळ काहीच अंतर नाही. (उदा. सफरचंदावर ७० टक्के आणि गिरणीत सडलेल्या तांदळावर ७० टक्के तसेच दुग्धोत्पादन आणि कुक्कुट उत्पादनांवरील करांत फारसा फरक नाही.) परिणामकारक एस.एस.एम. हाती नसेल तर भारतासारख्या देशांतील शेतकऱ्यांना आकस्मिक आयात वाढीसारख्या संकटापासून वाचवता येणार नाही. मात्र त्याच अर्थतज्ज्ञांनी अमेरिका वगैरे देशांनी उपभोगलेल्या एस.एस.जी. सुविधेला आक्षेप घेतला नाही. म्हणूनच शेतीमालाच्या किंमती वाढत असण्याच्या काळात एस.एस.एम.चा मुद्दा विकसनशील देशांच्या दृष्टीने फारच महत्त्वाचा आहे. किंबहुना दोहा परिषदेने निर्माण केलेले ते एक प्रभावी हत्यार आहे आणि सोपी आणि वापरण्यायोग्य तरतूद झाली नाही तर ते व्यर्थ ठरेल.

अंतर्गत (अनुदान) आधार :

याचा अर्थ देशांतर्गत शेती उत्पादकांना किंवा संरचना आणि संशोधन क्षेत्रातील कार्याकरिता देण्यात येणारे वार्षिक आर्थिक अनुदान केवळ अंतर्गत अनुदान असते आणि सीमाबाह्य उपाययोजना, जसे जकात आणि निर्यात अनुदान यांच्याशी त्यांचा काही संबंध नसतो. उरुग्वे बैठकीमध्ये गाठण्यात आलेल्या अंतर्गत अनुदानाच्या उच्च पातळीनुसार हे उपाय विकसित देशात जास्त करून अमलात आणले जातात. तेव्हा अनुदानाचे स्वीकारार्ह प्रमाण ठरविणे आणि शेतकऱ्यांच्या व्यापाराला मारक परिस्थिती नाहीशी करणे हा त्यांचा उद्देश असतो.

व्यापार विच्छेदक आणि व्यापार अविच्छेदक अशा दोन प्रकारांत या अनुदान आधारांची विभागणी करता येईल. पुढे त्यांची विभागणी अशी होते. अ) उत्पादन लक्षित आणि उत्पादन–अलक्षित एकत्रित अनुदान आधार, ब) किमान अनुदान आधार, क) नीलकक्ष (सूट) आधार आणि ड) हरित कक्ष (सूट) आधार.




नारिंगी कक्ष : एकत्रित आधार उपाय (एस.एस.एम.) व्यापारच्छेदनासाठी वापरले जातात. किंवा उत्पादनावर नियंत्रण ठेवण्यासाठी या उपायांना अन्य जागतिक व्यापार संघटना सदस्यांकडून कायदेशीर आव्हान देता येते.

ए.ओ.ए.च्या नियमानुसार एस.एस.एम. म्हणजे विशिष्ट शेती उत्पादने किंवा साधारण शेती

*38. हा लॅटिन भाषेतील एक शब्द आहे ज्याचा अर्थ न्यूनतम, सूक्ष्म किंवा लघू असा होतो. यास न्यूनतम समर्थन असेही म्हणतात.*

उत्पादनांना देण्यात येणारा अनुदान आधार. उत्पादनलक्ष्यी आधार (उदा.बाजारपेठेत आणावयाच्या वस्तू) बिगर उत्पादनलक्ष्यी आधार (उदा. सिंचन, बीज, खते इ.) कपात निर्धारण सर्व प्रकारच्या कृषी उत्पादनांना लागू असले तरी ए.एम.एस.चा हिशेब विशिष्ट उत्पादनांना विशिष्ट काळाच्या संदर्भात लागू करण्यात येतो. किंमतीवरील परिणाम आणि त्यांची सरकारला सोसावी लागणारी किंमत हे त्यांचे दोन निकष आहेत. हा अनुदान आधार अंतर्गत नियंत्रित मूल्य आणि निश्चित सीमाबाह्य संदर्भ मूल्य[३९] यावरून निर्धारित करतात. उत्पादनाला आधार देण्यासाठी सरकारने केलेली तरतूद आणि पूर्वनिश्चित महसूल यांचा समावेश ए.एम.एस.च्या हिशेबात करण्यात येतो.

विकसनशील देशांत एकूण शेतीउत्पादनाच्या[४०] १० टक्के आणि विकसित देशांत ५ टक्के ए.एम.एस. धरतात. जर आधार किमान पातळीच्या पुढे गेला तर संपूर्ण अनुदान आधार त्या देशाच्या एकूण चालू ए.एम.एस.मध्ये धरला पाहिजे. अनुदानाच्या किमानतेचा परिणाम शेतकरी आणि त्याच्या व्यापारावर होता कामा नये. डब्लू टी ओ चे सदस्यत्व घेतलेल्या वर्षात संबंधित देशांनी (१९८६–८८) व्यापारावर परिणाम करणाऱ्या अंतर्गत अनुदान आधाराला शिस्त लावण्याचा प्रयत्न केला, विकसित देशांकरिता २000 पर्यंत (सहा वर्षे) २० टक्के आणि विकसनशील देशांकरिता (दहा वर्षात) १३ टक्के घट करण्यात आली. कपात निर्धारण फक्त ए.एम.एस. च्या पातळीवर आणि बिगर उत्पादन – पोटउत्पादनांकरिता आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर प्रत्येक उत्पादनाचा अथवा उत्पादन प्रकाराचा आधार कमी करण्यात आला नाही. अशा प्रकारे एका कृषी क्षेत्रातील अनुदानात कपात करून दुसरीकडे वाढ करण्यात आली.

कमी विकसित देशांनी कोणतीही कपात करणे आवश्यक नव्हते. डब्लू टी ओ मध्ये अंतर्गत अनुदानाची कमाल पातळी बंधनकारक[४१] आहे. उरुग्वे बैठकीत १३१ विकसनशील देशांसह ३0 देशांनी[४२] हे मान्य केले आहे. किमान पातळीच्या वर ते खूपच अंतर्गत अनुदाने देतात आणि व्यापाराला मारक ठरणारा अनुदान आधार कमी करण्याचे त्यांनी ठरविले आहे. (नारिंगी कक्ष) तेव्हा त्यांच्यासाठी किमान पातळी ही मर्यादा नसून प्रवेशद्वार आहे. उर्वरित १0१ सदस्यांनी १९८६–८८ मध्ये आपण अनुदान आधार न पुरवण्याचे घोषित केले. म्हणजेच पायाभूत वर्षात (१९८६–८८) त्यांचा ए.एम.एस. शून्य होता. (भारतासह) त्यामुळे ए.एम.एस. संबंधित कपात निर्धारण त्यांना लागू नव्हते.

त्या १0१ सदस्यांनी (पैकी बरेच विकसनशील) पायाभूत वर्षासाठी ए.एम.एस. न स्वीकारल्यामुळे उत्पादन आणि कोलमडणारा व्यापार यांना किमान पातळीपर्यंतच आधार देण्यात येत होता. जोपर्यंत त्यांचा अनुदान आधार किमान पातळी ओलांडत नाही तोपर्यंत ते आपल्या निर्धारणाची पूर्तता करतात.[४३] याचा अर्थ (भारतासह) या देशांमधील अनुदान आधार सूट नसलेल्या नारिंगी कक्षात समाविष्ट होतो. वर्ष २0१0–११ च्या आकड्यांनुसार[४४] तो १0 टक्के नेमून दिलेल्या मर्यादेपासून खूप दूर असल्याचे स्पष्ट होते.

---

39. *स्थायी बाहरी संदर्भ मूल्य वर्ष १९८६ से १९८८ के उपर आधारित होता है (या जैसे सदस्यें के समझौते में उल्लिखित है )। इसे फ्री ऑन बोर्ड यूनिट के औसत मूल्य या कॉस्ट इंश्युरेंस फ्रेट के औसत मूल्य के आधारपर तय किया जाता है ।*
40. *उत्पादन मूल्य =  खेत का मूल्य* x *उस फसल का कुल उत्पादन*
41. *WTO की प्रतिबद्धता सूची के भाग-४ मे क्रियांवयन अवधि के दौरान वार्षिक बाध्यकारी प्रतिबद्धता स्तर का विवरण है*
42. *http://www.wto.org/english/tratop_e/agric_e/negs_bkgrnd07_domestic_e.htm*
43. *FAO Commodity and Trade Policy Research Working paper no.45;http://www.fao.org/3/a-i3819e.pdf*
44. *सप्टेंबर २००४ मध्ये भारताने ७ वर्षांच्या (२००४-०५ से २०१०-११)अंतर्गतअनुदान आधार समर्थनाच्या बाबत WTO ला सूचित केले होते.*

तक्ता १ मध्ये विकसित देशांमधील अधिकतम आणि चालू एएमएस दाखविले आहे, जे २० टक्के टक्के कपातीनंतर युरोपियन समुदायात ६७.२ दशलक्ष युरोवर आणि अमेरिकेत १९.१ द.ल. डॉलरवर स्थिरावले. एकूण अधिकतम एएमएस आणि चालू एएमएस मधील फरक वाढीतील व्याप्ती दर्शवितो.

तक्ता १

| | युरोपियन युनियन (कोटी युरो) | | अमेरिका (कोटी डॉलर्स) | |
|---|---|---|---|---|
| वर्ष | अधिकतम एएमएस | चालू एएमएस | अधिकतम एएमएस | चालू एएमएस |
| १९९५ | ७८.७ | ५०.१८१ | २३.०८३ | ०६.२१४ |
| १९९६ | ७६.४ | ५१.१६३ | २२.२८७ | ०५.८९८ |
| १९९७ | ७४.१ | ५०.३४६ | २१.४९२ | ०६.२३८ |
| १९९८ | ७१.८ | ४६.९४७ | २०.६९५ | १०.३९२ |
| १९९९ | ६९.५ | ४८.१५७ | १९.८९९ | १६.८३२ |
| २००० | ६२.२. | ४३.९०९ | १९.८९९ | १६.८४३ |
| २००१ | ६७.२ | ३९.३९१ | १९.८९९ | १४.४८२ |
| २००२ | ६७.२ | २८.५९८ | १९.८९९ | ०९.६३७ |
| २००३ | ६७.२ | ३०.८९१ | १९.८९९ | ०६.९५० |
| २००४ | ६७.२ | ३१.२१४ | १९.८९९ | ११.६२९ |
| २००५ | ६७.२ | २८.–४२७ | १९.८९९ | १२.९४३ |
| २००६ | ६७.२ | २६.६३२ | १९.८९९ | ०७.४७२ |
| २००७ | ६७.२ | १२.३५३ | १९.८९९ | ०६.२६० |
| २००८ | ६७.२ | ११.७९६ | १९.८९९ | ०६.२५५ |
| २००९ | ६७.२ | १०.८८३ | १९.८९९ | ०४.२६७ |
| २०१० | ६७.२ | ०६.५०२ | १९.८९९ | ०४.१२० |
| २०११ | – | – | १९.८९९ | ०४.६५४ |

नीलकक्ष – उत्पादनावर मर्यादा आणण्याचा कार्यक्रम, ज्यातून उत्पादकाला थेट अनुदान देण्यात येते, तो १) निश्चित क्षेत्रावर आधारित असला पाहिजे, २) प्राण्यांवरील अनुदान ठराविक संख्येत देण्यात येते. ३) उत्पादनाच्या पायाभूत पातळीच्या ८५ टक्के किंवा कमी देण्यात येते.

शासकीय आधार कार्यक्रमासाठी या तीन निकषांची पूर्तता होत असेल तर करात निर्धारणाचा प्रश्न येत नाही. अन्यथा तो नारिंगी कक्षात समाविष्ट करून विकसित देशांसाठी ५ टक्के एवढ्या किमान आकारणीसाठी विचारता घेतला जातो. (आणि विकसनशील देशांसाठी १० टक्के) उत्पादन नियंत्रण आधार खूपच कमी असल्यामुळे विकसनशील देशांसाठी नीलकक्ष विशेष महत्त्वाचा नाही.

नीलकक्ष अनुदान आधीच्या काळातील निश्चित उत्पादन आकडेवारीनुसार ठरविले जाते. म्हणून त्याला 'सशर्त नारिंगी कक्ष' म्हणतात. त्याचा दुसरा उद्देश व्यापाराला मारक अनुदानापासून विकसनशील देशांना दूर नेणे हा आहे. (नारिंगी कक्ष) आणि त्यांना हितकारक अनुदानाकडे नेणे असा आहे. (हरितकक्ष) कारण नीलकक्ष अनुदान सशर्त आहे. उरुग्वे बैठकीने त्यावर संख्यावाचन मर्यादा घातली नाही.

तक्ता २ – भारत, युरोप आणि भारतातील नीलकक्ष आधार

| वर्ष | भारत | अमेरिका(कोटी डॉलर्स) | | युरोपियन युनियन(कोटी युरो) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ८५ टक्के किंवा त्याखालील वित्त | एकूण नीलकक्ष | निश्चित क्षेत्र लाइव्ह स्टॉक | निश्चित हेडखाली वित्त | एकूण नीलकक्ष |
| १९९५ | शून्य | ०७.०३० | ०७.०३० | १५.६४८ | ५.१९७ | २०.८४६ |
| १९९६ | शून्य | – | – | १७.१९३ | ४.३२७ | २१.५२१ |
| १९९७ | शून्य | – | – | १६.१९१ | ४.२५१ | २०.४४३ |
| १९९८ | शून्य | – | – | १५.९७७ | ४.५२६ | २०.५०४ |
| १९९९ | शून्य | – | – | १५.१२८ | ४.६६४ | १९.७९२ |
| २००० | शून्य | – | – | १६.८२५ | ५.३९७ | २२.२२३ |
| २००१ | शून्य | – | – | १८.१४४ | ५.५८१ | २३.७२६ |
| २००२ | शून्य | – | – | १६.२६७ | ८.४५९ | २४.७२७ |
| २००३ | शून्य | – | – | १७.०७३ | ७.७०८ | २४.७८२ |
| २००४ | शून्य | – | – | १७.५७३ | ९.६६३ | २७.२३७ |
| २००५ | शून्य | – | – | ८.२६३ | ५.१८१ | १३.४४५ |
| २००६ | शून्य | – | – | २.८८५ | २.८११ | ५.६९७ |
| २००७ | शून्य | – | – | २.८९१ | २.२७४ | ५.१६६ |
| २००८ | शून्य | – | – | ३.०८९ | २.२५८ | ५.३४८ |
| २००९ | शून्य | – | – | ३.०६३ | २.२५९ | ५.३२४ |
| २०१० | शून्य | – | – | – | – | ३.१४२ |

हरितकक्ष : विशेषतः युरोपियन युनियन आणि अमेरिकेकडून दुरुपयोग केला जाणारा हरितकक्ष हा सर्वाधिक विवादास्पद उपाय आहे. कारण या प्रकारातील आधार उपाय नैसर्गिक आणि व्यापाराला पूरक असल्यामुळे डब्ल्यू टी ओ त्याला मर्यादा ठरवून देऊ शकत नाही.

एओएच्या परिशिष्ट २ मध्ये हरितकक्ष उपाय योजनांची यादी दिली आहे. व्यापार उच्छेदक परिणाम होता कामा नये ही या उपाययोजनांमधील एक मूलभूत अपेक्षा आहे. दुसरे ते सर्वाधिक निधीतून सरकारने योजले पाहिजेत, तिसरे त्यांचा उत्पादकाला किंमत आधार म्हणून उपयोग होता कामा नये. तेव्हा सरकारी सेवा कार्यक्रम आणि उत्पादकाला थेट पतपुरवठा असे त्यांचे दोन प्रकार पडतात. डब्ल्यूटीओच्या मर्यादा आणि कायदेशीर आव्हान यापासून ते मुक्त आहेत. विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही देशांना ते वापरता येतात.

शेतीविषयक सेवा व अन्य लाभ, ग्रामीण समाज, अन्न सुरक्षेच्या हेतूने राबवले जाणारे सार्वजनिक उपक्रम, अंतर्गत अन्न पुरवठा याबाबत 'हरितकक्ष' उपाययोजना येतात.

- संशोधन, सर्वसाधारण सेवा, जंतुनाशके व आजार नियंत्रण, प्रशिक्षण, विस्तार, पाहणी, विपणन, पाणीपुरवठा अथवा सांडपाणी निचरा यासारख्या पायाभूत सुविधांची उभारणी इ. २०१३ मध्ये या उपायांचा वापर बाली मंत्रिपरिषदेने जमीन सुधारणा आणि ग्रामीण जीवनशैलीसंदर्भात केला होता. जमीन पुनर्वसन, मृद्संधारण संसाधन व्यवस्थापन, दुष्काळ व्यवस्थापन, पूर नियंत्रण, ग्रामीण रोजगार योजना, संपत्तीचा विमा, शेतकरी इ. अन्नसुरक्षेसाठी सार्वजनिक अधिग्रहण (राष्ट्रीय विधिमान्यता आणि वित्तीय पारदर्शकता अत्यावश्यक)[४५] तथापि नियंत्रित किंमतीच्या संदर्भात अनुदान कोणत्या प्रकारे दिले जावे याचा तपशील पुढील प्रकरणात आला आहे.
- अंतर्गत अन्नपुरवठा तरतूद
- नैसगिक आपत्तीपासून संरक्षण
- अकृषिक उपक्रमांकडे जाण्यापासून उत्पादकास रोखण्यासाठी संरचनात्मक उपाय योजनांची आखणी
- पर्यावरणीय आणि प्रादेशिक सहकार्य योजना
- आणि सर्वांत विवादास्पद असा आर्थिक आधार म्हणजे एकूण उत्पन्नाचा ३० टक्क्यांपेक्षा जास्त तोटा सहन करावा लागणाऱ्या या उत्पादकाला देण्यात येणारे आणि ७० टक्क्यांपेक्षा अधिक नुकसानीत द्यावयाचे अनुदान

कपात निर्धारणातून या उपाययोजनांना वगळण्यात आले आहे. तथापि युएनसीटीएडीच्या अभ्यासातून[४६] स्पष्ट झाले आहे की विकसित देश हा निकष पाळत नाहीत आणि त्याचा व्यापारावर विपरीत परिणाम होतो. हरितकक्षातील व्यापार उच्छेदक घटक दूर केले तर महत्त्वाच्या अर्थव्यवस्थांमध्ये १७ ते ३० टक्के वाढ होऊन त्यांची निर्यात ४० ते ६० टक्के घटेल. विकसनशील देशांचीही (मागास देशांसह) निर्यात २० टक्के वाढविता येईल. तेथे कृषी रोजगारात वाढ होईल. त्यामुळे कुशल आणि अकुशल कामगारांना रोजगार मिळून दारिद्र्य निर्मूलन होईल. विकसनशील देशांतील ही रोजगार वाढ नैसर्गिक रोजगार वाढीपेक्षा जास्त म्हणजे ३ ते ५ टक्के दराने होईल. विकसनशील देशांत वेतनाचे मान १ टक्क्याने वाढेल. अशा प्रकारे 'हरित कक्ष' अनुदानांची कपात चांगला परिणाम साधतील.

'हरित कक्ष' अनुदाने व्यापाराला मारक नाहीत. या विकसित देशांच्या दाव्याबाबत भारतासह विकसनशील देशांना नेहमीच संशय वाटला. विकसित देशांनी व्यापार उच्छेदक अनुदाने नारिंगी कक्षातून हरित कक्षाकडे वळवल्यामुळे हे घडते आणि म्हणूनच 'हरित कक्ष' उपायांना शिस्त लावावी आणि त्यांची निश्चित व्याख्या करण्यात यावी अशी मागणी विकसनशील देश सातत्याने करतात.

---

45. *http://www.wto.org/english/thewto_e/minist_e/mc9_e/desci37_e.htm*
46. *http://wtocentre.iift.ac.in/DOC/Studies_GreenBoxSubsidiesATheoreticalAndEmperialAssessmen.pdf*

बाजारपेठेवरील आपले वर्चस्व अबाधित राखण्यासाठी विकसित राष्ट्रे व्यापार उच्छेदक उपायांचे रूपांतर व्यापार पूरक उपायांमध्ये वरचेवर करत राहतात. दरम्यान दीर्घकालीन आर्थिक दुर्बलतेमुळे विकसनशील देशांना प्राप्त झालेल्या सवलतींचा फारसा उपयोग होत नाही, ते शेतक–यांना अनुदाने देऊ शकत नाहीत. या त्रुटींशिवाय एओएकडून विकसित देशांच्या व्यापार उच्छेदक वर्तणुकीचेच बळकटीकरण होऊन त्यांना कायदेशीर स्वरूप दिले जाते.

तक्ता ५ आणि ६ मधून विकसित देश नारिंगी आणि हरितकक्षांची कशी सांगड घालतात ते दिसून येईल. युरोपियन युनियनने आणि अमेरिकेने १९९५ ते २०१० या काळात अंतर्गत अनुदान आधार नारिंगी कक्षाकडून हरितकक्षाकडे कशा प्रकारे वळवला ते तक्ता ५–६ वरून स्पष्ट होते. युरोपियन युनियनचे नारिंगी कक्षातील अनुदान १९९५ मध्ये ५०.२ दशलक्ष युरोपासून २०१० मध्ये ६.५ दशलक्ष युरो इतके खाली आहे, तर हरित कक्षातील अनुदान याच काळात १८.८ दशलक्ष युरोपासून ६८ दशलक्ष युरो इतके वाढले. अशाच प्रकारे, अमेरिकेने हे अनुदान १९९५ मधील ४६ दशलक्ष डॉलरपासून २०११ मध्ये १२५ दशलक्ष डॉलरपर्यंत वाढवले.

तक्ता ३ – विविध श्रेणीनिहाय भारताचे हरितकक्ष अनुदान (दशलक्ष अमेरिकी डॉलर)

| वर्ष | साधारण सेवा | अन्न सुरक्षेसाठी सार्वजनिनिक उपक्रम | थेट पतपुरवठा | एकूण हरित |
|---|---|---|---|---|
| १९९५–१९९६ | ३९८ | १५७० | २२८ | २१९६ |
| १९९६–१९९७ | २३९ | १७०९ | ५५४ | २५०२ |
| १९९७–१९९८ | २६५ | २०१८ | ५९० | २८७३ |
| १९९८–१९९९ | ८४ | २०६८ | १२४ | २२७६ |
| १९९९–२००० | ८५ | २१२३ | २८४ | २४९३ |
| २०००–२००१ | ८६ | २६२९ | १३६ | २८५१ |
| २००१–२००२ | १०० | ३६६८ | २३४ | ४००२ |
| २००२–२००३ | १०० | ४९९६ | १४१ | ५२३७ |
| २००३–२००४ | ११३ | ५४७६ | २९४ | ५८८३ |
| २००४–२००५ | ३५२ | ५७३० | १०१ | ६१८३ |
| २००५–२००६ | ४८८ | ५२११ | २०७ | ५९०७ |
| २००६–२००७ | ६४८ | ५६४० | २०५ | ६४९३ |
| २००७–२००८ | ८२१ | ७७६८ | ९७७ | ९५६७ |
| २००८–२००९ | ८७२ | ९४९५ | ६५६० | १६९२७ |
| २००९–२०१० | ७७६ | १२२८२ | ४३२३ | १७३८१ |
| २०१०–२०११ | ११२४ | १३८१२ | ४५४२ | १९४७२ |

भारतीय अभिलेखानुसार, 'हरित कक्ष'मध्ये अमेरिकेतून ५१,०८२ लक्ष डॉलर अनुदान देण्यात येते.

तक्ता – ४ – भारतात आर्टीकल ६.२ खाली दिलेली अनुदाने (दशलक्ष अमेरिकन डॉलरमध्ये)

| वर्ष | गुंतवणूक अनुदान | अल्प उत्पन्नावर अनुदान | एकूण अनुदान कलम ६.२ नुसार |
|---|---|---|---|
| १९९५–१९९६ | १०५ | १५० | २५४ |
| १९९६–१९९७ | ११३७ | ३७३८ | ४८७५ |
| १९९७–१९९८ | ११४३ | ४०२९ | ५१७२ |
| १९९८–१९९९ | २ | ६७५७ | ६७५९ |
| १९९९–२००० | २ | ७१६३ | ७१६५ |
| २०००–२००१ | १ | ८४७८ | ८४७८ |
| २००१–२००२ | २ | ८२५२ | ८२५४ |
| २००२–२००३ | ३ | ७३३८ | ७३४१ |
| २००३–२००४ | ४ | ९०२१ | ९०२६ |
| २००४–२००५ | ४०८ | १०२८१ | १०६८९ |
| २००५–२००६ | ४८५ | ११८३१ | १२३१६ |
| २००६–२००७ | ६२९ | १४९०७ | १५५३६ |
| २००७–२००८ | ११३५ | २११७७ | २२३१२ |
| २००८–२००९ | १४६६ | २९९८९ | ३१४५९ |
| २००९–२०१० | १६१४ | २८२४१ | २९८५६ |
| २०१०–२०११ | २५३० | २९०७८ | ३१६१० |

या संदर्भात हे नमूद करण्याजोगे आहे की, अंतर्गत अनुदानासाठी विशेष आणि निराळी वागणूक (एस आणि डी) देऊन विकसनशील देश नारिंगी कक्षांतील हिशेबानुसार अन्नसुरक्षा साठ्यांच्या किंमतीचे नियंत्रण करू शकतात. शहरी आणि ग्रामीण गरीब जनतेला अनुदानयुक्त अन्नपुरवठा करण्याची विकसनशील देशांना परवानगी आहे. 'एस आणि डी' तरतुदी कृषी आणि ग्रामीण विकासासासाठी थेट अथवा अप्रत्यक्ष अनुदाने देण्यासाठी विकसनशील देशांना वापरता येतील, अल्प उत्पन्न गटातील शेतकऱ्यांना अनुदाने देण्यासाठी वापरता येतील. कलम ६.२ मधील अनुदाने कपात निर्धारणातून वगळण्यात आली आहेत. त्यामुळे एएमएसच्या हिशेबातही ती धरली जात नाहीत. 'डब्ल्यूटीओ'ने अल्प उत्पन्न किंवा साधनहीन शेतकऱ्यांची यांची निश्चित व्याख्या केलेली नसल्यामुळे विकसनशील देश निर्णय घेण्यास मुक्त आहेत. भारतीय मानकानुसार १० हेक्टरपेक्षा कमी जमीन धारण करणारा शेतकरी अल्प उत्पन्नधारक आणि साधनहीन शेतकरी समजण्यात येतो. त्यानुसार ९९ टक्के कृषी क्षेत्र या प्रकारात मोडते. त्यामुळे कलम ६.२ प्रमाणे अनुदान कपात करण्याची भारताला गरज नाही.

## अनुदान कपात – फसलेला प्रयोग

जागतिक व्यापार संघटनेच्या (डब्ल्यूटीओ) वीस वर्षांच्या इतिहासात, विकसित देशांनी आपल्या कृषी क्षेत्राला दिलेली अनुदाने एओए वाटाघाटीमध्ये नेहमीच अडथळा ठरली. विशेषत: अमेरिका आणि विकसनशील देश यामध्ये हा विवादाचा मुद्दा आहे. विकसनशील देशांतील शेती उत्पादकांपुढे समस्या उभी करणारे विकसित देशांमध्ये आपल्या शेतकऱ्यांना दिलेले अनुदान कसे नियंत्रणाखाली ठेवावे यावर एकमत झाले नाही. या शेतकऱ्यांना भरपूर अनुदान प्राप्त आयात उत्पादनातील स्वत:च्या देशात आणि निर्यातीवरील नियंत्रणापुढे परदेशात तोंड द्यावे लागते.

दोहा बैठकीत निरनिराळी प्रमाणके तयार करून अंतर्गत अनुदानात कपात करण्यास विकसित देशांना भाग पाडण्याचा प्रयत्न करण्यात आला. अनुदान कपातीची अंमलबजावणी होण्यासाठी सर्वंकष व्यापार उच्छेदक अंतर्गत अनुदाने (ओटीडीएस्) ही कल्पना दोहा बैठकीत मांडण्यात आली. ती म्हणजे नारिंगी कक्ष अनुदाने, किमान अनुदाने आणि नीलकक्ष अनुदाने यांचे मिश्रण आहे. (तक्ता ५ व ६ पाहा).

तक्ता – ५ – अमेरिकेतील अंतर्गत आधार (डब्ल्यूटीओच्या सूचनांनुसार)

| वर्ष | एकूण एएमएस | एकूण नील | एकूण | किमान ओ टी डी एस | एकूण हरित | एकूण अंतर्गत आधार |
|---|---|---|---|---|---|---|
| १९९५ | ६,२१४ | ७०३० | १,६४३ | १४,८८७ | ४६,०४१ | ६०,९२८ |
| १९९६ | ५,८९८ | – | १,१७५ | ७,०७२ | ५१,८२५ | ५८,८९७ |
| १९९७ | ६,२३८ | – | ८१२ | ७,०५० | ५१,२५२ | ५८,३०२ |
| १९९८ | १०,३९२ | – | ४,७५० | १५,१४२ | ४९,८२० | ६४,९६२ |
| १९९९ | १६,८६२ | – | ७,४३५ | २४,२९७ | ४९,७४९ | ७४,०४६ |
| २००० | १६,८४३ | – | ७,३४१ | २४,१८४ | ५०,०५७ | ७४,२४१ |
| २००१ | १४,४८२ | – | ७,०५४ | २१,५३६ | ५०,६७२ | ७२,२०८ |
| २००२ | ९,६३७ | – | ६,६९० | १६,३२८ | ५८,३२२ | ७४,६५० |
| २००३ | ६,९५० | – | ३,२३७ | १०,१८७ | ६४,०६२ | ७४,२४९ |
| २००४ | ११,६२९ | – | ६,४५८ | १८,०८७ | ६७,४२५ | ८५,५१२ |
| २००५ | १२,९४३ | – | ५,९८० | १८,९२३ | ७२,३२८ | ९१,२५१ |
| २००६ | ७,७४२ | – | ३,६०१ | ११,३४३ | ७६,०३५ | ८७,३७८ |
| २००७ | ६,२६० | – | २,२६० | ०८,५२० | ७६,१६२ | ८४,६८२ |
| २००८ | ६,२५५ | – | ९,९७१ | १६,२२६ | ८६,२१८ | १०२,४४४ |
| २००९ | ४,२६७ | – | ७,२५८ | ११,५२५ | १०३,२१४ | ११४,७३९ |
| २०१० | ४,११९ | – | ५,६६५ | ९,७८४ | १२०,५३१ | १३०,३१५ |
| २०११ | ४,६५४ | – | ९,७१४ | १४,३६८ | १२५,११७ | १३९,४८५ |

**तक्ता – ६ – युरोपियन युनियन अंतर्गत आधार (डब्ल्यूटीओच्या सूचनांनुसार)**

| वर्ष | एकूण एएमएस | एकूण नील | एकूण डिमिनिमिस | ओटीडीएस | एकूण हरित | एकूण अंतर्गत आधार |
|---|---|---|---|---|---|---|
| १९९५ | ५०,१८१ | २०,८४६ | ८२५ | ७१,८५२ | १८,७७९ | ९०,६३१ |
| १९९६ | ५१,१६३ | २१,५२१ | ७६१ | ७३,४४५ | २२,१३० | ९५,५७६ |
| १९९७ | ५०,३४६ | २०,४४३ | ७३३ | ७१,५२१ | १८,१६७ | ८९,६८८ |
| १९९८ | ४६,९४७ | २०,५०४ | ५२५ | ६७,९७५ | १९,१६८ | ८७,१४३ |
| १९९९ | ४८,१५७ | १९,७९२ | ५५४ | ६८,५०२ | २१,९१६ | ९०,४१९ |
| २००० | ४३,९०९ | २२,२२३ | ७४५ | ६६,८७६ | २१,८४८ | ८८,७२४ |
| २००१ | ३९,३९१ | २३,७२६ | १०१२ | ६४,१२८ | २०,६६१ | ८४,७९० |
| २००२ | २८,५९८ | २४,७२७ | ११४२ | ५५,२६६ | २०,४०४ | ७५,६७० |
| २००३ | ३०,८९१ | २४,७८२ | ११५४ | ५७,६२६ | २२,०७४ | ७९,७०० |
| २००४ | ३१,२१४ | २७,२३७ | २०४२ | ६०,४९३ | २४,३९१ | ८४,८८४ |
| २००५ | २८,४२७ | १३,४४५ | १२५१ | ४३,१२३ | ४०,२८० | ८३,४०४ |
| २००६ | २६,६३२ | ५,६१७ | १९७५ | ३४,०३४ | ५६,५३० | ९०,८३३ |
| २००७ | १२,३५४ | ५,१६६ | २३८९ | १९,९०९ | ६२,६१० | ८२,५१९ |
| २००८ | ११,७९६ | ५,३४८ | १०८३ | १८,२२६ | ६२,८२५ | ८१,०५१ |
| २००९ | १०,८८३ | ५,३२४ | १३९३ | १७,६०० | ६३,७९८ | ८१,३९८ |
| २०१० | ६,५०२ | ३,१४२ | १३९३ | ११,०३७ | ६८,०५२ | ७९०८८ |

डिसेंबर २००८ प्रमाणक मसुद्याने ओडीटीएस् आणि वैयक्तिक अंतर्गत अनुदान कपातीसाठी बहुस्तरीय सूत्र प्रस्तावित केले. प्रमाणक मसुद्याने ओडीटीएसमध्ये ६० टक्के अमेरिका आणि जपानकरिता (त्यांचे अनुदान १० दशलक्ष ते ६० दशलक्ष डॉलर दरम्यान आहे) आणि ८० टक्के युरोपियन युनियनकरिता (त्यांचे अनुदान ६० दशलक्ष डॉलर पेक्षा जास्त आहे) कपात सुचविली. १० दशलक्ष डॉलरपेक्षा कमी अनुदान देणाऱ्या अन्य विकसित देशासाठी ५५ टक्के कपात सुचविली. तथापि ओडीसीएसने या देशांसाठी ठरविलेल्या निकषांमुळे ते तितकेसे परिणामकारक ठरले नाही. ६० टक्के कपात केल्यावरही ओडीटीएसने निर्धारित केलेल्या (९.७ दशलक्ष डॉलर १९१०)[४७] पातळीपेक्षा अमेरिकेतील अंतर्गत अनुदान कितीतरी वर राहते (१४.५ दशलक्ष डॉलर) तेथे कपातीला अजूनही वाव आहे. त्याप्रमाणेच निर्धारित (११ दशलक्ष युरो २०१०)[४८] पातळीपेक्षा युरोपियन युनियनने ८० टक्के कपात करूनही २२ दशलक्ष युरोपर्यंत अनुदान वर राहते. अशा प्रकारे, जागतिक उत्पादनांची किंमत कमी करणारी आणि शेतकऱ्यांना गरिबीच्या खाईत लोटणारी विकसित देशांमधील अंतर्गत अनुदाने ओटीडीएसला कमी करता आली नाहीत. त्यांची अनुदाने अधिकतम आणि उपयोजित पातळ्यांच्या मधोमध राहिली. त्यावरून विकसित देश केवळ स्वत:च्या शेतकऱ्यांचे संरक्षणच नव्हे तर विकसनशील देशांतील बाजारपेठा काबीज करण्यात यशस्वी ठरले हे स्पष्ट होते.

---

*47. http://www.southcentre.int/wp-content/uploads/2013/08/AN_AG14_Comments-on-WTO-Agriculture-2011-Report_EN.pdf*
*48. ibid*

विकसित देशांमधील व्यापारउच्छेदक कृषी अनुदाने कमी करण्याच्या विषयाची चर्चा नैरोबी बैठकीच्या आधी होऊ शकली नाही. किंबहुना विकसनशील देशांकडून दिल्या जाणाऱ्या कृषी अनुदानावरच विकसित देशांनी आक्षेप घेतला. ६.२ कलमाखाली भारत अत्यल्प शेतकऱ्यांना जादा अनुदाने देत आहे असा आरोप अमेरिकेने बाली मंत्रिपरिषदेत केला आणि ती थांबवावी[४९] असे आवाहन केले. आपल्याकडील अंतर्गत अनुदानात कपात करावयाची सोडून दोहा बैठकीत ठरल्यानुसार भारत, इंडोनेशिया, दक्षिण अफ्रिका वगैरे देशांना अनुदान कपात करण्याची गरज नसतानाही अमेरिका व युरोपियन युनियन तसा आग्रह धरू लागली. भारतातील सार्वजनिक वितरण सेवा (पीडीएस) सारख्या उत्पादनावरील अनुदान देऊन साधनहीन गरीब घटकाचे सबलीकरण करणाऱ्या योजनांनाही विकसित देशांनी आक्षेप घेतला.

**निर्यातीवरील अनुदान :**

निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी अनुदान देण्याच्या योजना सरकारे राबवितात. त्यायोगे देशांमधील अंतर्गत उत्पादनापेक्षा स्वस्त भावात आपल्या उत्पादनांची निर्यात करता येते. वास्तविक हा प्रकार अनुचित असल्याने 'गॅट'ने सुरुवातीला कृषी वगळता सर्व उत्पादनांवरील निर्यात अनुदानावर बंदी घातली होती. परंतु अमेरिका आणि युरोपियन युनियन या दोन बलाढ्य निर्यात गटांच्या हितसंबंधामुळे 'एओए'ने त्या अनुदानांचा व योजनांचा शेवट करण्याऐवजी त्यांना 'निर्यात अनुदान' आणि 'निर्यात स्पर्धा' अशी नावे दिली. विकसनशील देशांना अशी अनुदाने देता येत नाहीत. इतर उत्पादकांना त्यांच्या वस्तूंच्या किंमती अधिक ठरल्यामुळे याचा फटक बसतो. परिणामी अनुदान देणे परवडते, असे देश गरीब देशातील बाजारपेठा काबीज करुन तेथील स्वस्त उत्पादनाची गळचेपी करतात. जगभर भाव कोसळतात. सर्वत्र बाजारपेठेत अनिश्चितता निर्माण होते. सर्वात घातक म्हणजे या विषम स्पर्धेमुळे विकसनशील देशातील शेतीचा नाश होतो. या प्रकारामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतीमालाचे मूल्य कमी करणे आणि निर्यातदार कंपन्यांची जबाबदारी सरकारांनी उचलणे भाग पडते. जागतिक बाजारपेठेचा कब्जा करण्यासाठी कारगिल, कॉन ॲग्रा, आर्चर डॅनिएल्स मिडलॅण्ड यासारख्या कंपन्यांनी निर्यात अनुदानांचा मोठ्या प्रमाणावर फायदा उठवला. मालाची हाताळणी, साठा, वाहतूक, प्रक्रिया, प्रतसुधारणा आणि निर्यात यांसाठी अनुदाने देण्यास डब्ल्यूटीओची स्पष्ट मान्यता असल्यामुळे जागतिक धान्य व्यापारात ७० टक्के वाटा असणाऱ्या 'कारगिल'सारख्या कंपनीचा फायदा झाला. अंतर्गत आणि निर्यातीवरील अनुदानांवर पोसल्या जाणाऱ्या या कंपन्या स्वस्त किंमतीस बाजारपेठेत माल आणून केवळ आंतरराष्ट्रीय दराची घसरणच नव्हे तर विकसनशील देशांमधील उत्पादनांनाही धोका निर्माण करतात. देशांतर्गत उत्पादनांना मिळणारे अल्प मूल्य हे भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे मुख्य कारण आहे.

लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे या अवाढव्य कंपन्या स्वत:च्याच देशातील अनुदाने नव्हे तर विकसनशील देशांतील सवलतीही पदरात पाडून घेतात. २००१ मध्ये भारताने दारिद्र्य रेषेखालील किंमतीचा २0000 टन गहु फिलिपाईन्सला पाठवला. परंतु तो व्यवहार 'कारगील'मार्फत झाला. भारतीय अन्न महामंडळाची गव्हाची किंमत प्रति टन ८३०० रुपये होती, खुल्या बाजारात ती ७००० रुपये होती, परंतु 'कारगील'ला तो गहू ४३०० रुपये प्रतिटन इतक्या अल्प दराने विकता आला.

*49. Azevedo issues sanitized version of 'consultation' meetings; SUNS#8034; 4 June 2015*
*50.*

विकसनशील देशांतील भांडवलापेक्षा कित्येक पटीने भांडवली सामर्थ्य असणाऱ्या 'कारगील'[५०] कंपनीला अनुदानाचा लाभ मिळाला. याशिवाय त्या गव्हाच्या राजपुरा ते जामनगर बंदरापर्यंतच्या वाहतुकीचा खर्च सोसून सरकारने 'कारगील'ला कमिशन दिले. अशा प्रकारे कमिशन, बाजारशुल्क, लेव्ही, सेस इत्यादी हिशोबात धरता ४३० रुपये क्विंटलने विकून महामंडळाला १३० रुपये प्रतिक्विंटल अनुदान द्यावे लागले.

अमेरिका आणि युरोपियन युनियनमधील भांडवलादारी कंपन्यांशी स्पर्धा करू न शकणाऱ्या विकसनशील देशांना निर्यात अनुदानाची गरज आहे. दुर्दैवाने त्यासंबंधीचे सगळे प्रस्ताव केराच्या टोपलीत गेले. उलट अमेरिकेतील कृषी विधेयक २०१४ सारख्या  कायद्यांनी अशी अनुदान कपात होणार नाही, हे अधोरेखित केले आहे. कापसावर अमेरिका देत असलेल्या अनुदानामुळे चाड, बेनिन, बर्किना फासो आणि माली या देशांतील कापूस उत्पादकांचा गळा घोटला. भारतातील विदर्भातील अनेक ओक कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी भाव न मिळाल्याने कर्जबाजारी होऊन आत्महत्या केल्या. वास्तविक कमी कर आकारणीमुळे भारताला अधिक बाजारपेठ मिळविणे शक्य होते.

जागतिक व्यापार संघटनेच्या तंटे निवारण समितीच्या मार्च २०१५ मधील आदेशाला धाब्यावर बसवून सप्टेंबर २००५ पर्यंत कापूस उत्पादकांना देण्यात आलेली अनुदाने अमेरिकेने थांबवली नाहीत. १९९९ ते २००२ या काळात त्या उत्पादकांना १२.५ कोटी डॉलर अनुदाने देण्यात आल्याचा निष्कर्ष समितीने  काढला, त्यामुळे ब्राझील आणि आफ्रिकेतील कापूस शेतकऱ्यांवर विपरीत परिणाम करत अमेरिकेतील कापूस उत्पादन वाढले. या समितीने साखरेवर परिणाम करत अनुदान बेकायदा आहे असा ठपका युरोपीयन युनियनवरदेखील ठेवला. परंतु विकसित देशांवर अंकुश ठेवण्यात जागतिक व्यापार संघटना अपयशी ठरली. कापसावरील अनुदानासंबंधीचा अमेरिकेवरील दावा जिंकणाऱ्या ब्राझील व त्याच समितीने दिलेल्या दुसऱ्या निर्णयानुसार बौद्धिक संपदेच्या वापरापोटी अमेरिकेला ८२० कोटी डॉलर द्यावे लागले. ''एओए''ची निर्यात स्पर्धा सूत्रे पुढीलप्रमाणे :-

- निर्यात कार्यक्षमतेनुसार थेट पत पुरवठा
- अंतर्गत किंमतीपेक्षा स्वस्त दराने सरकारी यंत्रणेमार्फत निर्यात विक्री
- लेव्हीसारख्या माध्यमातून अनुदान उभारणी
- अंतर्गत वाहतुकीपेक्षा निर्यात माल वाहतुकीला झुकते माप
- निर्यात मालात समाविष्ट करण्यासाठी शेती मालाला प्राधान्यक्रमाने अनुदान

विकसनशील देशांना २०२१ पर्यंत म्हणजे आणखी पाच वर्षे निर्यात, अंतर्गत आणि बाह्य वाहतूक, माल हाताळणी यावर अनुदाने देता येतील. डिसेंबर २००८ च्या मसुद्याला यात टप्प्याटप्प्याने कपात अभिप्रेत आहे. सर्व प्रकारच्या निर्यात अनुदानाचे टप्प्याटप्प्याने निर्मूलन यावर हाँगकाँग जाहीरनाम्याने शिक्कामोर्तब झाले आहे. तथापि, विकसित देशांतर्गत अनुदानाचा निर्यातवृद्धी वापर करीत आहेत, त्यांच्या अंतर्गत उत्पादनाचा आपल्या उत्पादनांवर परिणाम होतो अशी तक्रार विकसनशील देश करत असतात. बाली मंत्रिपरिषदेतून काही साध्य झाले नसले तरी २०१५ मधील नैरोबी बैठकीतून त्या दिशेने पावले पडू लागली आहेत.

---

*36. कारगिल जगातील सर्वात मोठा धानय वयापारी आहे जो उत्तर अनेरिका, युरोप आणि एशिया तील जवळ जवळ ५० देशांना खरेदी, प्रसंस्करण, प्दळणवळण, साठवणूक, निर्यात आणि व्यापारातील व्यवहारांना नियंत्रित करतो.*

# विश्वव्यापार संघटनेमध्ये अन्न सुरक्षा आणि सार्वजनिक अन्नभांडार व्यवस्थेचा मुद्दा

मागील भागांत आपण हिरवा बॉक्स अनुदान आणि सार्वजनिक अन्न साठवण व्यवस्थेचा मुद्दा याबद्दल वाचले.चला, सार्वजनिक अन्न साठवण या मुद्याबद्दल आणखीन खोलांत समजून घेऊ. अन्न साठवण याचा सरळ अर्थ असा की, अन्नसुरक्षेकरिता सरकारने केलेला अन्नाची साठवण. भारतात सार्वजनिक वितरण व्यवस्थेकरिता(रेशनमधून वाटपाकरितां) सरकार शेतकऱ्यांकडून धान्य खरेदी करुन त्याची गोदामांमध्ये साठवण करते. विकसित देश याचा विरोध करत आहेत. त्यांचे म्हणणे असे की, भारताकडे एवढा मोठा साठा असला तर भारत कधीही अंतर्राष्ट्रीय बाजार व व्यापाराला विकृत करु शकेल. आमचे म्हणणे असे की,गरीबांची भूक भागविण्यासाठी धान्य साठवणे हा भारताचा अधिकार आहे.

धान्य साठविण्याच्या मुद्यावर विश्वव्यापार संघटनेमध्ये गेली ४ वर्ष मोठा वादविवाद सुरु आहे. भारत आणि अन्य विकसनशील देशांत अन्न सुरक्षेकरितां सरकारी खरेदी व साठवण फारच महत्वाची आहे. यामुळे केवळ करोडो ग्रामीण व शहरी गरीबांच्या स्वस्त जेवणाची निश्चिती होते ऐवढेच नाही तर यामुळे लहान व फारशी संसाधने नसलेल्या(गरीब, कोरडवाहू, अल्पभूधारक) शेतकऱ्यांना किमान आधारभूत किमतीची शाश्वतीही मिळते. मात्र अन्न साठवण्याच्या व्यवस्थेवर विकसित देश सतत आघात करत आहेत.

हिरवा बॉंक्सच्या नियमांनुसार अन्नसुरक्षेकरिता केलेल्या धान्य साठवणीवर काहीही बंदी नाही. विकसित आणि विकसनशील, असें दोन्ही गटातील देश सरकारी भांडार(गोदाम)ठेवू शकतात. मात्र अट अशी आहे की, सरकारला त्या वेळच्या बाजार मूल्यानेच धान्य खरेदी करावे लागेल आणि जर सरकारी भांडारातून धान्य विकायचे असेल तर ते ही त्यावेळच्या स्थानिक बाजारातील किमतीलाच विकावे लागेल. जर धान्य बाजारातील किमतीऐवजी सरकारने ठरविलेल्या किमतीने खरेदी केले जाणार असेल, ज्याला समर्थन किंवा निर्धारित किंमत(किंवा भारतात किमान आधारभूत किंमत) म्हणतात, तर याला अनुदान(सबसिडी) मानले जाईल. हिरवा बॉंक्सच्या नियमांनुसार सरकारी साठवण कार्यक्रमाकरिता जितक्या प्रमाणांत सरकारी किमतीवर (बाजारातील किमतीवर नाही), समर्थन दिले गेले आहे, त्याला व्यापार विकृत करणारे स्थानिक अनुदान(घरेलू सबसिडी) मानले जाईल.

मागील भागांत आम्ही बघितले आहे की, जवळजवळ १०१ देशांनी, ज्यात बहुतांश विकसनशील देश आहेत,आपले ए एम् एस् मूल्य(समर्थनाचे सर्व उपाय) शून्य असल्याचे सांगितले होते.या देशांकडे,ज्यांत भारताचाही समावेश आहे, दहा टक्केपेक्षा अधिक( डी मिनिमिस स्तर) समर्थन देण्याचा अधिकार नाही.(विकसित राष्ट्रांकरिता ही मर्यादा ५ टक्केच आहे).

डबल्यू टी ओ मधील बाजार मूल्य समर्थन ठरविण्याच्या पध्दतीबद्दल विकसनसील देशांनी हरकत घेतली आहे.या पध्दतीमुळे उत्पादन मूल्याच्या १०टक्के मर्यादेत राहणे फार कठीण होत आहे.

मागील भागांत आम्ही बघितले की समर्थन मूल्य[51] ठरवितांना ( स्थानिक बाजारातील किंमत आणि बाहेरची संदर्भ किंमत यातील फरक याला उत्पादनाची मात्रा (जी सरकार व्दारा निर्धारीत किंमतीसाठी योग्य आहे) याचा गुणाकार करुन मिळवले जाते. उदाहरणार्थ, सन् २०१४–२०१५ या वर्षी भारतात गव्हाचे सरकारी मूल्य[52] (म्हणजेच किमान आधारभूत किंमत) रु. १४.५० प्रति किलो होते, तर त्याचे बाहेरचे संदर्भ मूल्य(जे १९८६–८८ च्या गव्हाच्या किमती नुसार आहे) ३.५४ रुपये प्रति किलो [53] होते.

अशा परिस्थितीत, डबल्यू टी ओच्या नियमांनुसार अनुदान(सबसिडी) होते (१४.५०–३.५४)=१०.९६ रुपये प्रति किलो. अशाचप्रकारे सन् २०१४–२०१५, ग्रेड ए तांदुळाची किमान आधारभूत किंमत[54] होती २१.०० रुपये प्रति किलो. ही साळीच्या किमान आधारभूत किमतीच्या दीडपट अधिक होती. तांदुळाचे बाहेरचे संदर्भ मूल्य(जे १०८६–८८ च्या तांदुळाच्या किमती नुसार आहे)३.५२ रुपये प्रति किलो[55] होते. अशा प्रकारे तांदुळाचे अनुदान(सबसिडी) होते(२१.००–३.५२)=१७.४८ रुपये प्रति किलो. गहू व तादुळांच्या प्रति किलो दिल्या जाणा–या अनुदानाला(सबसिडीला) त्या वर्षीच्या गहू किंवा तांदुळाच्या त्या वर्षीच्या एकंदर उत्पादनाने गुणले जाते. ही पध्दत अतिशय चुकीची आहे कारण अनुदानाकरिता खरेदी केलेल्या मात्रेऐवजी त्या वर्षीच्या एकंदर उत्पादनाने गुणले जाते. त्यामुळे सरकारी कार्यक्रमाव्दारे दिल्या जाणा–या अनुदानाची(सबसिडीची) मात्रा खूपच वाढते. अशा परिस्थितीत भारतासारख्या विकसनशील देशाला आपल्या समर्थन कार्यक्रमाला डिमिनिमिस स्तराच्या खाली ठेऊन पुढे जाणे फारच अवघड जाते.

समर्थन मूल्य ठरविण्याच्या या पध्दतीत दोन अडचणी आहेत. पहिली की ह्यात तीस वर्ष जुन्या बाजार मूल्याचा वापर केला जातो आणि दुसरी ह्यात केवळ सरकारने खरेदी केलेली मात्रा नाही तर त्यावेळचे एकंदर उत्पादन हिशोबात घेतले जाते. अर्थात् भारत सरकारने आपल्या समर्थन कार्यक्रमाकरिता अगदी थोडेच धान्य खरेदी केले तरी हिशोब मात्र' असा केला जाईल की जसे सरकारने त्यावेळचे त्या पिकाचे संपूर्ण उत्पादनच समर्थन मूल्य देऊन खरेदी केले.यामुळे अनुदानाचा स्तर वास्तविकतेपेक्षा खूपच जास्त दिसतो(भासतो).

याकारणाने विकसनशील देशांना अन्न सुरक्षा आणि सार्वजनिक साठवण कार्यक्रमांना १० टक्के मर्यादेच्या आत ठेवणे फारच कठीण होते. डिसेंबर २००८च्या मसुद्यांत यांत बदल करण्याचा प्रयत्न करण्यांत आला पण सहमती मात्र होऊ शकली नाही आणि हा मुद्दा सोडवायचा राहून गेला.

### विश्वव्यापार संघटनेच्या एकतर्फी नियमांना भारताचे आव्हान

भारतासारखे विकसनशील देश कृषी कराराच्या एकतर्फा नियमांमुळे त्रस्त आहेत. या नियमांमुळेच आजही विकसित देश व्यापार विकृत करणारी आपली अनुदाने (सबसिडी) सुरुच

51. http://www.wto.org/english/docs_e/14-ag_02?e.htm#annIII7
52. http://pib.nic.in/newssite/PrintRelease.aspx?relid=110936
53. http://www.jgls.sdu.in/citel/pdf/services/menon.pdf
54. http://pib.nic.in/newsite/Print|Release.aspx?relid=122585
55. ibid

ठेवून आहेत आणि दुस–या बाजूने ते विकसनशील देशांच्या शेती (कृषी) व खाद्यान्न धोरणांवर प्रभाव टाकून त्यांच्या स्वायत्ततेला धक्का लावत आहेत.जगातील एक त्रितीयांश भुकेले लोक भारतांत रहातात. पण तरीही भारत आपला अन्नसुरक्षा कायदा २०१३ नुसार अन्नसुरक्षा कार्यक्रम संपूर्णपणे लागू करण्यास घाबरतो आहे.या कार्यक्रमाव्दारे जवळजवळ दोन त्रितियांश जनतेला धान्य वितरण करण्याची तजवीज आहे.त्याकरता २० बिलियन डॉलर(साधारण १२०हजार करोड रुपयांची)गुंतवणूक आवश्यक आहे. भारताला धास्ती वाटते की, यामुळे त्याच्याकडून डी मिनिमिस(१० टक्के)मर्यादेचे उल्लंघन होईल. अशाप्रकारे डब्ल्यू टी ओ के नियम भारताला त्याचा अन्न सुरक्षा कायदा पूर्णपणे लागू करु देत नाही. सन् २०१२ मध्ये भारताने जी ३३च्या माध्यमातून एक प्रस्ताव पाठवला आहे ज्यांत हिरव्या बॉक्सच्या नियमांना अधिक लवचिक करण्याची मागणी केलेली आहे.या प्रस्तावानुसार विकसनशील देशांनी गरीब संसाधनहीन उत्पादकांकरिता केलेल्या धान्न्य साठवणुकीला ए एम् एस् मध्ये धरले जाऊ नये, वगळले जावे.

भारताचा उद्देश अन्नसुरक्षेकरिता स्थानिक समर्थन नियमांमध्ये बदल करुन घेणे असा होता. असे झाले तर भारत गरीब संसाधनहीन उत्पादकांकडून[56] किमान आधारभूत किमतीने गहू व तांदुळाची खरेदी करणे चालू ठेवूं शकेल. भारतातील काही राज्यांमधील शेतकऱ्यांची मोठी जनसंख्या सरकारी खरेदी कार्यक्रमामुळेच बचावली आहे कारण दरवर्षी त्यांचे उत्पादन विशेषतः सरकार गहू व तांदुळ, किमान आधारभूत किमतीला खरेदी करते. भारताच्या या प्रस्तावाशी मोठे धान्य उत्पादक जसे अमेरिका, यूरोपीय संघ, कॅनडा, ऑस्ट्रेलिया व अन्य देश सहमत नाहीत. त्यांना वाटते की हे व्यापाराला विकृत करणारे मूल्य समर्थन आहे कारण या व्यवहारांत उत्पादकांना सरळ लाभ दिला जातो आहे. दुसरें असे की, यात धान्य बाजार दराने खरेदी केले तर याला व्यापार विकृत करणारा असे मानले जाणार नाही. पण इथे बाजारच्या दराऐवजी सरकारी किमान आधारभूत किमतीने खरेदी केली जाते आहे.

विकसित देशांच्या विरोधामागील सत्य (खरे कारण) काही निराळेच आहे. त्यांना त्यांचे धान्य विकसनशील देशांच्या बाजारांत विकायचे आहे.जर विकसनशील देश धान्यसाठवण आणि वितरण करुं लागले, तर यांच्याकडचे धान्य कोण विकत घेणार? विकसित देशांकरिता प्रतिबंधित कृषी मूल्य व्यवस्थेचे अनेक फायदे आहेत.

१. प्रतिबंधित न्यूनतम समर्थन मूल्य असल्यामुळे बहुराष्ट्रीय कम्पन्या जसे की ग्लेंकेर, टोयफर, कारगिल आणि ऑस्ट्रेलियन वीट बोर्ड, न्यूनतम समर्थन मूल्यापेक्षा कमी किमतीने उत्पादन खरेदी करुं शकतील.

२. प्रतिबंधित न्यूनतम समर्थन मूल्य असल्यामुळे राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्या अंतरगत सरकारी धान्य खरेदी कमजोर पडेल. त्यामुळे बहुराष्ट्रीय कम्पन्यांना ही तफावत भरून करण्याकरिता सुवर्ण संधी लाभेल.

---

*56. निम्न आय संसाधनहीन उत्पाजकों की श्रेणी में भारत के करीब ९८.९७ प्रतिशत किसान आते है जिनके पास १० हेक्टेयर से कम भूमी है*

खुद्द अमेरिकेचा धान्य तिकिटांचा[57](फूड स्टँम्पस् चा) खर्च वेगाने वाढतो आहे. सन् २०१०मध्ये अमेरीकेचे कृषी अनुदान १३०.३बिलियन(म्हणजे १३०३० करोड) डॉलरस् होते जे आत्तापर्यंतचे सर्वाधिक अनुदान होते. यापैकी १२०.५ बिलियन (म्हणजे १२०५०करोड)डॉलरस् ला अमेरिकेने हिरव्या बॉक्समधील खर्च[58] या स्वरुपांत दाखविले आहे. अमेरिकी सरकारच्या आंकड्यानुसार सन् २०१० मध्ये अमेरिकेच्या एकंदर हिरव्या बॉक्स खर्चापैकी ८० टक्के हिस्सा ९४.९ बिलियन म्हणजे ९४९ करोड डॉलर्स स्थानिक खाद्य मदतीकरिता केला गेला होता ज्यांत फूड स्टँम्पस् चा देखील समावेश आहे.

सन् २००९–१० मध्यें अन्न सुरक्षेअंतर्गत सार्वजनिक साठवणीसाठी भारताचे अनुदान जवळजवळ १२३० करोड डॉलर्स होते.त्याच वर्षातील अमेरिकेचे अनुदान भारताच्या आठपट जास्त होते. अमेरिकेत ८ करोड लाभार्थी आहेत, तर भारतांत त्याच्या सहापट जास्त(४७.५० करोड)लाभार्थी आहेत.[59] भारताच्या अन्नसुरक्षा कायदा २०१३ ची व्याप्ती[60] बरीच जास्त आहे आणि तो भारताच्या दोन त्रितीयांश जनतेला(८२ करोड)भोजन अधिकाराची सुनिश्चिती देतो आहे. ही व्याप्ती अमेरिकेच्या दहा पट जास्त आहे. डबल्यू टी ओ च्या दुटप्पी निकषांचे(मापदंडांचे) धोरण यावरुनही दिसून येते की, सन् २०१०मध्ये भारत प्रत्येक शेतकऱ्याला सरासरी रु,४६००(९९ डॉलर्स) चे अनुदान देत होता तर अमेरिका, सन् २०१२ मध्ये आपल्या प्रत्येक शेतक–याला सरासरी जवळजवळ २७ लाख रुपये(५७९०१ डॉलर्स)ची सबसिडि[61] देत होता. ही भारताच्या सबसिडीपेक्षा ५८५ पट जास्त आहे. तरीही अमेरिका सतत भारतावर दबाव टाकते आहे की, भारताने आपल्या लहान व गरीब शेतकऱ्यांना अनुदान देणे बंद करावे.

बाली येथील मंत्रिस्तरीय चर्चेत (२०१३) धान्य साठविण्याचा मुद्दा

डिसेंबर २०१३ मध्ये बाली येथे झालेल्या मंत्रिस्तरीय चर्चेत दोन प्रमुख मुद्दे होते

(१) अन्नसुरक्षे करता धान्य साठवण्या करता कायम स्वरुपी उत्तर, आणि

(२) व्यापारातील सुलभता ज्याचा उद्देश सीमाशुल्क प्रक्रियांना सरळ व पारदर्शक करणे, इलेक्ट्रॉनिक पध्दतीने परतावा व जोखिमेच्या प्रबंधासाठी तंत्रज्ञानाचा वापर. परंतु भारत आणि विकसनशील देश धान्य साठवणूकीच्या मुद्यावर कायमस्वरुपी उपाय जोपर्यंत निघत नाही,तोपर्यंत व्यापार सुहजता करार करण्याकरतां तयार नव्हते. अशा प्रकारे बाली येथे मुक्त व्यापार (बनाम)उर्फ अन्नसुरक्षा यावर बराच वादविवाद झाला.

ऑक्टोबर २०१३ मध्ये भारताच्या नेतृत्वात विकसनशील देशांनी अन्न सुरक्षेकरिता सार्वजनिक साठवण व्यवस्था आणि कृषी सबसिडी संबंधित आणखी एक प्रस्ताव दाखल केला. या प्रस्तावानुसार बाली येथील मंत्रिस्तरीय चर्चेत तीन पर्यायांवर चर्चा होणे अपेक्षित होते.

---

*57. फुड-स्टॅम्प किंवा खाद्य तिकीट अमेरिका का एक भोजन-क्रय सहायता कार्यक्रम है जिसके तहत अमेरिका के निम्न या बिना आयवाले लोगोंको खाद्य टिकट बाँटे जाते है जिन्हे देकर वो भोजन प्राप्त कर सकते है।*

*58. http://ictsd.org/i/news/bridgesweekly/146491*

*59. http://www.wto.org/english/news_e/news13_e/pfor_03oct13_e.htm*

*60. http://zeenews.india.com/news/nation/rajya-sabha-national-food-security-bill-by-voice-vote_873721.html*

*61. http://www.southcentre.int/wp-content/uploads/2015/03-Ev_150312_AKwa.pdf*

पर्याय (क) बाहेरील संदर्भ मूल्याची पुन्हा व्याख्या,

पर्याय (ख) कृषिकरारातील अनुच्छेद १८.४ मध्ये वापरलेल्या शब्दांच्या व्याख्या – उदा. अत्याधिक मुद्रास्फीति

पर्याय (ग) शान्ति अनुच्छेद

भारताची मागणी होती की बाहेरचे संदर्भ मूल्य आत्ताच्या किमती नुसार घातले जावे.फारच पूर्वीचे असल्यामुळे हे सध्याच्या किमतीपेक्षा खूपच कमी आहे. अमेरिकेच्या नेतृत्वातील विकसित देशांनी हे मान्य करणे नाकारले. त्यांचे म्हणणे होते की, कृषीकराराच्या कोणत्याही भागावर ते पुन्हा चर्चा करु इच्छित नाहीत. विकसित देशांनी दुस–या पर्यायाचा पण जोरदार विरोध केला.त्यांत बाहेरील संदर्भ मूल्यातील चलनवाढीला(महागाईला) देखील संज्ञामध्ये धरण्याबद्दल म्हटले होते.सन् १९८६–८८ च्या तुलनेत भारताचा चलनवाढीचा दर ६७५ टक्के पेक्षाही जास्त झाला आहे .

कृषीकराराच्या अनुच्छेद १८.४ मध्यें अत्याधिक (वाढत्या) चलनवाढीच्या दरावर विचार करण्याची तरतूद आहे. परंतु चर्चा या मुद्यावर अडली की, अत्याधिक चलनवाढ दर कसा ओळखायचा? तिसरा पर्याय, शांती अनुच्छेद. याचा उद्देश होता की, सार्वजनिक अन्नसाठवण कार्यक्रमाला डबल्यू टी ओ च्या तक्रार निवारण व्यवस्थेच्या बाहेर ठेवले जावे.

**सशर्त शांति अनुच्छेद** (कंडीशनल पीस क्लॉज)

विकसित देशांच्या बाली येथील बैठकीतील जोरदार विरोधामुळे, अखेर भारताला तात्पुरत्या व अंतरीम शांति अनुच्छेदाचा स्वीकार करावा लागला. शांति अनुंच्छेदानुसार सदस्य देश डबल्यू टी ओ मध्ये एकदुसऱ्या विरुध्द तक्रार नोंदविणार नाहीत. याशिवाय डब्ल्यू टी ओ च्या मूळ नियमांमध्ये कोणताही बदल केला जाणार नाही. अनेक त्रुटी असलेल्या आणि एकतर्फा नियमांना बदलण्याऐवजी डब्ल्यू टी ओ सदस्य शांती अनुच्छेदावर सहमत झाले.याच्या अनुसार भारत किंवा कोणत्याही विकसनशील देशाच्या विरोधांत कारवाई केली जाणार नाही. या तात्पुरत्या उपायाच्या बदल्यात अमेरिकेने विकसनशील देशांकडून व्यापार सहजता करार (टी एफ ए) पास करवून घेतला.

शांती अनुच्छेदाची सोय केवळ चार वर्षांकरिता (किंवा ११वी मंत्रिस्तरीय बैठक होईपर्यंतच)आहे. या नंतर ती आपोआप संपेल. यामुळे कोणत्याही कायमच्या उत्तराची अजिबात शाश्वती मिळत नाही. याशिवाय यांत अनेक गुंतागुंतीच्या अटींचा समावेश आहे.

शांती अनुच्छेद फक्त कृषी करारापुरताच लागू होईल सबसिडी आणि काउंटरवेलिंग उपाय, जो अन्य सदस्यांवर वाईट परिणाम करणा–या सबसिडीला प्रतिबंध करतो, त्याला या तहाच्या(समझौत्याच्या)बाहेर ठेवण्यांत आले आहे. भारताचा देखील यात समावेश होतो.

हा तात्पुरता व अंतरीम उपाय फक्त सध्या चालू असलेल्या कार्यक्रमांपुरताच मर्यादित राहील. अशा प्रकारे हा स्वत.च्या कार्यक्रमांचा विस्तार करण्यास अटकाव करतो. अर्थातच शेतक–यांच्या समर्थन मूल्यांत काहीही वाढ होणार नाही, अन्नसुरक्षेसाठी सार्वजनिक साठवणीत

कोणत्याही नवीन धान्याचा समावेश करता येणार नाही. किमान आधारभूत किमत देण्याच्या यादीत सुध्दा नवीन धान्यांची(पिकांची) भर घालता येणार नाही. यातून असाही अर्थ निघतो की, ज्या देशांमध्ये अन्नसुरक्षा कार्यक्रम नाही ते आता त्याची सुरवात करु शकणार नाहीत.

हा केवळ पारंपरिक खाद्यान्न पिकांनाच लागू होईल– अर्थातच डाळी, खाद्यतेल आणि जी पिकें डब्ल्यू टी ओ च्या पारंपरिक मुख्य अन्न,या यादीत नोंदवलेली नाहीत, त्यांचा यांत समावेश होऊ शकणार नाही.

या कराराच्या व्यापार प्रोत्साहनाबद्दलच्या अटी(शर्ती) जसे की,सदस्य देशांनी हे ठरवायचे आहे की अन्नसुरक्षेकरिता केलेल्या साठवणीमुळे व्यापार विकृत झालेला नाही व इतर कोणत्याही सदस्य देशाच्या अन्नसुरक्षेवर वाईट परिणाम झालेला नाही. ही अट फारच व्यापक आहे आणि कोणत्याही मोठ्या स्थानिक कार्यक्रमावर व्यापार विकृत केल्याचा आरोप लावणे शक्य होते.

अधिसूचना आणि पारदर्शकतेची अवघड गरज– सदस्य देशांना याचा लाभ घेण्याकरिता आपल्या स्थानिक समर्थनाची (अनुदानाची) अधिसूचना वार्षिक स्तरावर सादर करावी लागेल. प्रत्येक सार्वजनिक साठवण कार्यक्रमाकरिता निराळी माहिती तयार करावी लागेल. बहुतांश विकसनशील देशांना अशी गुंतागुंतीची आकडेवारी गोळा करतांना बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागते. यासोबतच, असे करण्यामुळे ते त्यांच्या स्थानिक धोरणांना व कार्यक्रमांना अंतर्राष्ट्रीय समीक्षेकरिता खुले करतील. ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे की, अश्या पद्धतीने डब्ल्यू टी ओ आपल्या सदस्य देशांच्या(स्पष्टच म्हणायचे तर विकसनशील देशांच्या) धोरणे ठरविण्याच्या क्षेत्रांत ढवळाढवळ (हस्तक्षेप) करतो. हा राष्ट्रीय स्वायत्ततेशी थेट जोडलेला मुद्दा आहे.अंतर्राष्ट्रीय व्यापाराला वाढविण्यासाठी, डब्ल्यू टी ओ सरकारांचा जनतेला अन्नसुरक्षा देण्याचा अधिकारही हिरावून घेतो आहे. राष्ट्रीय स्वायत्ततेपेक्षा जागतिक व्यापाराला अधिक प्राधान्य दिले जाते आहे.

### बाली येथील मंत्रिस्तरीय बैठकीनंतरचे घटनाक्रम

बाली येथील चर्चेनंतरही डब्ल्यू टी ओ मध्ये अन्नसुरक्षेच्या मुद्यावर काहीच बदल झाला नाही. जुलै २०१४ मध्ये भारताने असा निश्चय केला की, जोपर्यंत अन्न सुरक्षेकरिता सार्वजनिक साठवण ह्या मुद्याला भिडले जात नाही तोपर्यंत भारत व्यापार सहजता कराराच्या अंमलबजावणीत सामील होणार नाही.

या स्थितीतून मार्ग काढण्यांकरिता अमेरिका व भारत यांच्यामध्ये नवीन समझोता झाला आहे, ज्याचा डब्ल्यू टी ओ जनरल कौन्सिलने नोहेंबर २०१४ मध्ये औपचारिक स्वीकार केला आहे. या करारानुसार आता जोपर्यंत काही कायमस्वरुपी उपाय सापडत नाही, तोपर्यंत शांति अनुच्छेद कायम राहील.

अश्याप्रकारे भारत आपल्या किमान आधारभूत किंमत कार्यक्रमाला कोणत्याही अडचणीशिवाय सुरु ठेवू शकतो. हा निर्णय भारतासोबत बांगलादेश, मिस्र, घाना, इंडोनेशिया, जॉर्डन, कीनिया, मोरक्को, नेपाल, पाकिस्तान, तुनिसिया, तुर्की, जाम्बिया आणि जिम्बाब्वे सारख्या देशांकरिता

सुध्दा फार मोठी सुटका(राहत) होती. जनरल कौन्सिलमध्ये असेही ठरविल्या गेले की, ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत कायमस्वरुपी उपाय शोधण्याचे सर्व प्रयत्न करण्यांत येतील. यामुळे या प्रक्रियेत एक तातडीची भावना आली.

सार्वजनिक धान्य साठवणीकरिता कायमस्वरुपी उपाय खालीलपैकी एक होऊ शकले असते...

१. बाहेरील संदर्भ मूल्य तीन वर्षाच्या सरासरीच्या आधारे ठरवण्यांत यावे.
२. बाहेरील संदर्भ मूल्यांमध्ये चलनवाढीच्या मुद्दयाला देखील समायोजित केले जावे आणि
३. सार्वजनिक अन्नसाठवण कार्यक्रमावरील अनुदान (सबसिडी) किंवा किमान आधारभूत किंमत यांना हिरव्या बॉक्स मध्ये टाकले जावे. तिसऱ्या पर्यायावर जी ३३ समूह जास्त जोर देत होते कारण पहिल्या व दुसऱ्या पर्यायांमुळे सर्व विकसनशील देशांच्या समस्यांकरिता मार्ग निघत नव्हता. सन् २०१७ मध्ये जी३३ समुहाने पुन्हा आपल्या या प्रस्तावावर जोर दिला की, सार्वजनिक अन्न साठवण कार्यक्रमाला हिरव्या बॉंक्समध्ये टाकले जावे.

भारत आणि अमेरिकेच्या समझोत्यानंतर जशी व्यापार सहजता करारावर सहमती झाली तसे पुन्हा एकदा अन्न साठविण्याच्या मुद्याला बासनांत बांधून मागे टाकण्यांत आले. या मुद्यावर कायमस्वरुपी उपाय शोधण्याऐवजी, विकसित देशांनी दुसरे नवीन मुद्दे उठवायला सुरवात केली.जणुकाही सर्व(अनुदान कपात, विशेष आणि वेगवेगळे उपाय, विशेष उत्पादने व खाद्य सुरक्षा) जुन्या मुद्यांची प्रासंगिकताच संपुष्टांत आली. हे विकसित देश पुन्हा त्यांच्या २००८च्या जुन्याच तर्कावर परत गेले की, विकसनशील देशांना विशेष व वेगवेगळे पाय(व्यवहार) दिल्या जाऊ नयेत. एवढेच नाहीतर अमेरिकेने भारतावर असा आरोपही केला की, तो अनुच्छेद ६.२ च्यानुसार आवश्यकतेपेक्षा जास्त लागत अनुदान(इनपुट सबसिडी) देतो आहे. भारतावर सार्वजनिक अन्न साठवण बंद करण्याकरिता सतत दबाव टाकणे हा अमेरिकेच्या कूटनीतीचा भागच बनला आहे.

सन २०१७ मध्ये नैरोबी येथे होणाऱ्या मंत्रिस्तरीय बैठकी आधी विकसित देशांनी अन्नसुरक्षेकरता कायमस्वरुपी उपायांच्या प्रस्तावावर बोलणेच बंद केले होते.

अन्न सुरक्षेकरिता सार्वजनिक अन्न साठवण हा केवळ भारताचा मुद्दा नाही. आफ्रिकी देशांसह कितीतरी मोठे विकसनशील देशही या समस्येशी झुंजत आहेत. अन्नाच्या किमती सतत वाढत आहेत, म्हणून गरिबांना भोजन उपलब्ध करुन देण्याकरिता बनविलेल्या या धोरणाला कोणत्याही अंतर्राष्ट्रीय नियमांमुळे थांबवले जाऊ नये.

फक्त भारतच नाही तर अनेक विकसनशील देश आपल्या अन्न साठवण कार्यक्रमामुळे डि मिनिमस (१०टक्के) सीमा उलंघनाच्या काठावर आहेत. जोपर्यंत डब्ल्यू टी ओ मध्ये काही कायमस्वरुपी उपाय निघत नाही तोपर्यंत जगभरातील अन्नसुरक्षा कार्यक्रमांवर धोक्याचे सावट राहील. म्हणून सर्व देशांनी एकत्र येऊन सर्वांकरिता अन्न साठवण कार्यक्रमाला हिरव्या बॉंक्समध्ये टाकल्या जावे अशी मागणी केली पाहिजे.

# नैरोबी मंत्रीस्तरीय बैठकीतून विकसनशील देश रिकाम्या हातांनी परतले

विश्व व्यापार संघटनेची १० वी मंत्रीस्तरीय बैठक नैरोबीमध्ये १९ डिसेंबर २०१५ रोजी पार पडली. ही बैठक १८ डिसेंबरलाच संपणार होती, पण बोलणी पूर्ण न झाल्यामुळे ती १९ ला संपली. ही बैठक सफल झाली हे कोणत्या आधारावर बोलले जात होते हे या बैठकीत सामील झालेल्या आम्हा[61] काहींना समजलेच नव्हते. अनेक मूलभूत प्रश्नांवर सहमती होउ शकली नव्हती. बैठकीत इतकी खडाजंगी झाली होती की ही बैठक निष्फळ होणार असे आम्हा सर्वांना वाटत होते. परंतु अचानक असे काय घडले की बैठक सफल झाली असे भासवले गेले? या चर्चेतून भारत आणि इतर देशांना गप्प का करण्यात आले होते? अन्नसुरक्षेच्या एका अन्यायकारक करारावर जबरदस्तीने सहमती मिळवण्यात आली होती. १९ डिसेंबर रोजी २४ तासांपेक्षा अधिक काळ चाललेल्या चर्चेअंती नैरोबी मंत्रीस्तरीय घोषणापत्र (Nairobi Ministerial declaration) किंवा नैरोबी पॅकेज सादर करण्यात आले.

खरेतर नैरोबी बैठकीचा मुख्य मुद्दा होता 'दोहा विकास फेरीला दुजोरा'. अमेरिका आणि युरोपीय संघ असे विकसित देश हा विषय चर्चेतून काढून टाकण्याचा प्रयत्न करीत होते आणि विकसनशील देश त्याचे समर्थत करीत होते आणि दोहा पॅकेजच्या सर्व तरतुदी मान्य व्हाव्यात यासाठी प्रयत्न करीत होते.

दोहा विकास फेरीतील मुद्यांवर असहमती झाली होती आणि नैरोबी घोषणापत्रातून ती स्पष्टपणे समोर आली होती. या पत्राच्या ३० व्या परिच्छेदात स्पष्ट मांडले होते, ''काही सदस्यांनी दोहा विकास अजेंड्याचे पूर्ण समर्थन केले आहे, तो राबवण्यासाठी ते वचनबद्ध आहेत. परंतु इतर काही सदस्यांचे म्हणणे असे की, बहुराष्ट्रीय करारांच्या अर्थपूर्ण परिणामांसाठी नवीन दृष्टीकोन अंगिकारण्याची जरूरी आहे. करारासंबंधी सदस्यांचे वेगवेगळे विचार आहेत''.

नैरोबी घोषणापत्रात कृषी, कापूस आणि कमी विकसित देशांसंबंधी सहा निर्णयांचा समावेश आहे. निर्यात सब्सिडी संपवण्याचा निर्धार, अन्नसुरक्षेसाठी सार्वजनिक अन्नभंडार, विकसनशील देशांसाठी संरक्षणात्मक उपाय आणि कापसासंबंधींचे उपाय सामील आहेत. विकसनशील देशांतील सेवाक्षेत्रासाठी विशेषाधिकार देण्याचा निर्णयही घेण्यात आला.

विश्व व्यापार संघटनेच्या सदस्यांमध्ये विविध मुद्यांसंबंधी झालेल्या मतभेदांमुळे नागरी समाजातील प्रतिनिधी आणि 'ला विया कम्पेसिना'[62] च्या प्रतिनिधींनी असे अनुमान काढले की सिएटल आणि कॅनकुनप्रमाणे ही बैठक निष्फळ ठरणार. विश्व व्यापार संघटनेच्या २० वर्षांच्या इतिहासावर एक नजर टाकली की निर्णय तिसऱ्या देशांच्या बाजून लागणे दूर, अमेरिकेसारख्या

61. *फोकस ऑन द ग्लोबल साउथ च्या अफसर जाफरी यांनी भाग घेतला होता.*
62. *ला विया कम्पेसिना एक अंतर्राष्ट्रीय आंदोलन आहे जे पूर्ण जगातील करोडो छोटे-मोठे शेतकरी, भूमिहीन लोक, महिला शेतकरी, आदिवासी, कृषी कामगार यांना एकत्र जोडते. जगभरातील जवळ जवळ ७३ देशांत अंदाजे १६४ स्थानीय व राष्ट्रीय एकजूट आहे.*

धनाढ्य देशांचे उखळ कसे पांढरे झाले हे लक्षात येते. नैरोबी घोषणापत्र पाहून आमची शंकाच खरी ठरली. अमेरिकेला जे हवे होते ते सारे मिळाले आणि विकसनशील देशांच्या हाताला काहीच लागले नाही. पाच दिवसांच्या जोरदार चर्चेनंतरही दक्षिणी देशांना हतबल व्हावे लागले. याची उदाहरणे पाहाः विकसनशील देशांमधील अन्नभंडारांसंबंधी निर्णय झाला नाही, या देशांच्या विशेष सुरक्षिततेसंबंधीची चर्चाही अपुरी, निर्यात सब्सिडी हटवण्याची अंतीम तारीख पुढे ढकलली, निर्यात पतपुरवठा परतफेडीची मुदत वाढवली आणि दोहा चर्चाफिरी सुरू ठेवण्यासंबंधी सहमती होउ शकली नाही, पण विसाव्या शतकातील 'नव्या मुद्यांची' (सिंगापूर मुद्दे) भाषा नैरोबी वार्तेतून पुढे आली. याप्रकारे विश्व व्यापार संघटना गरीबांच्या हिताची नसून श्रीमंत देशांची खळगी भरणारी संघटना म्हणून पुन्हा समोर आली. १५ डिसेंबरला नैरोबीत बैठक सुरू झाली तेव्हा कृषी सोडून कोणताही विषय अजेंड्यावर नव्हता. गॅट्स (सेवासंबंधी) NM – नामा (उद्योगासंबंधी) TRIPS- ट्रिप्स बौद्धिक एकाधिकार, हे विषय बाजूला ठेवण्यात आले होते, ज्या योगे विकसनशील देशांच्या कृषीक्षेत्राविषयी निर्णायक चर्चा होऊ शकली असती. पण तसे काही घडलेच नाही. कृषी आयात सब्सिडीला पूर्णविराम देण्याचा करार झाल्यामुळे काही दक्षिणी देशांना आनंद झाला होता. पण हा विजय नव्हताच. खरेतर २००५ च्या हाँगकाँग बैठकीतच ठरले होते की विकसित देश २०१३ पर्यंत आपली सारी निर्यात सब्सिडी थांबवतील. पण नैरोबीत याची मुदत २०२० पर्यंत वाढवण्यात आली. अमेरिका आणि युरापीय संघाने दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या निर्यातीची अधिसूचना फार पूर्वी जारी केली होती. त्यांच्या दूध उत्पादकांना निर्यात सब्सिडीमुळे भरपूर फायदा होणार होता. नजिकच्या भूतकाळात ज्यांनी निर्यात सब्सिडीची अधिसूचना जारी केली होती त्यांना मात्र याचा फायदा होणार नव्हता.

नैरोबीत उपस्थित असलेले 'कोरियन पेझंट लीग'चे (कोरियन शेतकरी संघटना) हॉय योन चुन म्हणतात, 'गरीब शेतकऱ्याकडे आपली पिके विकण्यासाठी काही प्रबंध नाही. स्थानिक उद्योगांनी आपली दारे बंद केली आहेत. कर्मचाऱ्यांनाही कमी केले जात आहे. पूर्ण जगात प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ सुपरमार्केटांत उपलब्ध झाले आहे. त्यांच्या किंमतीही कमी आहेत'. 'कोरियन पेझेंट लीग' आणि 'ला विया कम्पेसिना' चे शेतकरी जगभरातून आलेले होते आणि नैरोबीच्या रस्त्यांवर उतरून विश्व व्यापार संघटनेच्या विरोधात रोज निदर्शने करत होते. 'कृषी तुमचा व्यापार नाही, ते आमचे जीवन आहे', 'आमचे जीवन व्यापारासाठी नाही. शेतीला विश्व व्यापार संघटनेतून लवकरात वगळा'. अशा घोषणा सतत ऐकायला मिळत होत्या.

### नैरोबीत कृषी आणि विकसनशील देशांचे जबर नुकसान

खाद्यभांडार कार्यक्रमासंबंधी कोणतेही ठोस निर्णय झाले नाही. भारत, ट्युनिशिया, झांबिया, झिम्बाब्वे, मोरक्को, इजिप्त आणि केनिया हे आफ्रिकी देश खाद्यभांडारांचा कार्यक्रम अनेक

64. *नव्या मुद्यांना सिंगापूर मुद्दे असेही मटले जाते. याला विकसित देशांकडून प्रोत्साहन मिळत आहे ज्यात मुख्यत्वे सरकारी खरेदितील पारदर्शकता, प्रतिस्पर्धा, वैश्विक व्हॅलयू चेन, अ-कॉमर्स इ. मुद्दे अंतर्भूत आहेत.*

वर्षांपासून चालवत असूनही या मुद्यांवर चर्चा झाली नाही. बैठकांमध्ये याची चर्चा दरवेळी होते पण नेहेमीच पुढील चर्चेच्या आश्वासनांव्यतिरिक्त काहीच हाती लागत नाही. विशेष सुरक्षा उपायांसंबंधी असे म्हंटले गेले होते की हाँगकाँग मंत्रीस्तरीय घोषणापत्रानुसार (परिच्छेद ७) भविष्यात विकसनशील देशांस 'विशेष सुरक्षा उपाय' अधिकार प्राप्त होतील. अर्थात हे पूर्वीप्रमाणेच आयातीवर आणि किंमतींच्या चढउतारावर आधारित असतील.

परंतु या निर्णयातील दुस–या परिच्छेदातून असे लक्षात येते की विशेष सुरक्षा उपायांचा निर्णय अंतीम नव्हताच. घोषणापत्रात असेही नमूद करण्यात आले की विशेष सुरक्षा उपायांसंबंधी पुढील चर्चा 'कमिटी ऑन ग्रिकल्चर इन स्पेशल सेशन'– विश्व व्यापार संघटनेत कृषी समितीतील खास स्तरावर केली जाईल.'

कृषी क्षेत्राचे संरक्षण करण्याच्या विकसनशील देशांच्या प्रयत्नांना विकसित देश विरोध करीत आहेत. प्रत्यक्षात विकसित देश 'विशेष कृषी संरक्षण उपाय' (एसएसपी) सारख्या नीती राबवून आपल्या देशातील कृषी क्षेत्राला भरघोस अनुदान देत आहेत. या उपायांच्या मदतीने विकसित देश आपल्या खाद्य उत्पादकांच्या संरक्षणासाठी आयात मालावर जबर कर लावत आहेत. त्यामुळे त्यांच्या बाजारातील किंमती स्थिर राहतात. या व्यतिरिक्त सीमाशुल्क, जकात दरातील कोटा आणि इतर प्रतिबंध लावून विकसित देश आयात मालापासून संरक्षण मिळवतात. अमेरिका, युरोपीय संघ, कॅनडा, आणि ऑस्ट्रेलिया ही विकसित देशांची फळी विकसनशील देशांतील कृषी संरक्षण कार्यक्रमांना नेहेमीच विरोध करीत आली आहे. आयात मालामुळे विकसनशील देशांच्या बाजारावर विपरीत परिणाम होत असूनही हा अन्याय विश्व व्यापार संघटनेच्या माध्यमातून केला जात आहे.

कापूस –४ (उ–४) देशांना कापसावर कोणतीही सूट मिळत नाहीः नैरोबी, घोषणापत्रात कापूस ४ देशांना थोडा दिलासा मिळाला पण १२ ऑक्टोबर २०१५ च्या प्रस्तावाच्या तुलनेत तो अत्यल्प होता. बेनीन, बुर्किना फासो, चाड, माली, इत्यादी देशांत कापूस उद्योग मोठा असल्यामुळे त्यांत अनेकांना रोजगार मिळतो. तेथील शेतकऱ्यांच्या १० लाख युनियन्समार्फत ७०–८० लाख लोकांना रोजगार मिळतो. या क्षेत्रावर १ ते १.३ करोड लोकांची उपजीविका त्यावर चालते. परंतु अमेरिकेच्या भारी सब्सिडी मिळवणा–या कापूस उत्पादकांशी स्पर्धा करणे या आफ्रिकी देशांतील कापूस शेतकऱ्यांना आता कठीण होत चालले आहे.

विश्वव्यापार संघटनेचे सम्मेलन आफ्रिकेत होऊनही नैरोबी घोषणापत्रात कापसासंबंधीचा कोणताही प्रस्ताव बंधनकारक नाही. केवळ उत्तम प्रयत्नांच्या परिणामांची अपेक्षा व्यक्त करण्यापलिकडे आफ्रिकेतील कापूस उत्पादकांना कोणताही दिलासा मिळाला नाही. या घोषणापत्रात असे नमूद करण्यात आले आहे की कमी विकसित देशांतील कापसास विकसित देशांतील बाजारात १ जानेवारी २०१६ नंतर प्रवेश दिला जाईल, त्यावर कर आकारला जाणार नाही तसेच कोटाही लावला जाणार नाही. यासोबत असाही निर्णय घेण्यात आला की विकसित देश निर्यात सब्सिडीवर प्रतिबंध लावतील, मात्र विकसनशील देशांना सब्सिडी प्रतिबंधासाठी काही कालावधी ठेवण्यात आला आहे.

स्वदेशी समर्थनाचा मुद्दा (सब्सिडी) : दोहा चर्चेनंतर प्रथमच विकसित देशांनी आपाल्या देशातील सब्सिडी कमी करण्याविषयीचा मुद्दा चर्चेला आणला हे एक आश्चर्यच मानावे लागेल. विकसित देश आपल्या कृषीक्षेत्राला जवळ जवळ शतप्रतिशत अनुदान देतात. विकसित देशांतील अनुदानात मात्र कपात करण्यास भाग पाडले गेले त्यामुळे बाजारातील ही स्पर्धा अन्यायकारकच ठरली.

आफ्रिकी देश आणि इतर विकसनशील देशांनी अमेरिका आणि युरोपीय संघाच्या या मनमानी कारभाराचा म्हणावा तसा विरोध केला नाही. काही विकसनशील देशांनी याविषयी आपली अस्वस्थता व्यक्त केली होती. याचे कारण म्हणजे नैरोबीमध्ये दोहा विकास अजेंड्याविषयीची बांधिलकी दिसून आली नव्हती. नैरोबी घोषणापत्रात काही नवे मुद्दे सामील करण्याच्या संभावनेमुळे विकसनशील देश क्षुब्ध झाले होते. आमच्या सर्वांचे असे म्हणणे होते की नैरोबी परिसंवादात दोहा विकास अजेंड्याला दफन करण्यात आले. १३ वर्षांपूर्वी कॅनकुन येथे भरलेल्या संमेलनात याच 'नवीन' मुद्द्यांना रद्द करण्यात आले होते त्याच मुद्यांना नैरोबी बैठकीच्या अजेंडयामध्ये सामील करण्याचा डाव टाकला गेला होता, म्हणूनही ही बैठक लक्षात ठेवली जाईल. नैरोबी मंत्रिस्तरीय बैठकीचे परिणाम पाहता विकसनशील देशांनी एकत्र येऊन विश्व व्यापार संघटनेतून बाहेर पडण्याखेरीज दुसरा तरणोपाय नाही असेच चित्र आहे.

१ मिलियन = १० लाख　　१० मिलियन = १ करोड
१०० मिलियन = १० करोड　　१ बिलियन = १०० करोड

## औसत वार्षिक विनिमय दर

| वर्ष | १ डॉलर = भारतीय रुपये | १ यूरो = भारतीय रुपये |
|---|---|---|
| १९९० | १७.४९ | ०० |
| १९९१ | २२.७१ | ०० |
| १९९२ | २८.१५ | ०० |
| १९९३ | ३१.२९ | ०० |
| १९९४ | ३१.३९ | ०० |
| १९९५ | ३२.४१ | ०० |
| १९९६ | ३५.५० | ०० |
| १९९७ | ३६.३६ | ०० |
| १९९८ | ४१.३५ | ०० |
| १९९९ | ४३.०५ | ४५.८८ |
| २००० | ४४.९३ | ४१.४४ |
| २००१ | ४७.१५ | ४२.२५ |
| २००२ | ४८.६० | ४५.८० |
| २००३ | ४६.५७ | ५२.७५ |
| २००४ | ४५.१२ | ५६.१९ |
| २००५ | ४३.९२ | ५४.६९ |
| २००६ | ४५.२४ | ५६.८५ |
| २००७ | ४१.४८ | ५६.६८ |
| २००८ | ४३.७८ | ६४.१४ |
| २००९ | ४८.३६ | ६७.३६ |
| २०१० | ४५.६५ | ६०.५७ |
| २०११ | ४६.४५ | ६४.६५ |
| २०१२ | ५३.४२ | ६८.५९ |
| २०१३ | ५८.५१ | ७७.८२ |
| २०१४ | ६१.०० | ८१.०५ |
| २०१५ | ६४.१२ | ७१.१४ |

*Source: http://www.usforex.com/forex-tools/historical-rate-tools/yearly-average-rates*

AचAजYHग़ma Aज^‘mZ, _hmamड़्>

**एका बाजूला गोदामात धान्याचे प्रचंड साठे तसेच दुसरीकडे दुष्काळ आणि उपासमार या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयात पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टिज (पीयूसीएल) या संस्थेने दाखल केलेल्या याचिकेवर २००१साली सर्वोच्च न्यायालयाने अन्नसुरक्षेशी संबंधित विविध योजना परिणामकारकारकपणे राबविण्याचे आदेश सरकारला दिले. या आदेशांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्याच्या गरजेतून राष्ट्रीय स्तरावर 'राईट टू फूड कॅंपेन' आकाराला आली. त्यात विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या संघटना व आघाड्यांचा समावेश होता. या प्रक्रियेचा एक भाग म्हणून अनेक राज्यांत याच तऱ्हेने अन्न अधिकाराच्या प्रश्नावर त्या भागातील संघटना-आघाड्या एकत्र येऊन काम सुरु झाले. महाराष्ट्रातही २००१ साली 'अन्न अधिकार अभियान' या मंचावर आरोग्य, आदिवासी अधिकार, जमीन, रेशन, नागरी प्रश्न इ. विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या संघटना व आघाड्या एकत्र आल्या. जनसुनावण्या, मोर्चे, प्रबोधन अशा अनेकविध माध्यमांतून महाराष्ट्रातील हे 'अन्न अधिकार अभियान' कार्यरत आहे.**

ROSA LUXEMBURG STIFTUNG
SOUTH ASIA

amoPm bग़Po_ĬJश pQ>\ग़Qw>ळJ (Ama.Eb.Eg.)

**रोझा लक्झेमबर्ग स्टिफटुंग (आर.एल.एस.) ही जर्मनीस्थित एक संस्था दक्षिण आशियासोबत जगातील अन्य विभागांमध्ये महत्वाचे सामाजिक विश्लेषण आणि नागरिकत्वासंबंधी प्रबोधन करण्याचे कार्य करीत आहे. ही संस्था सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही सामाजिक व्यवस्थेचा पुरस्कार करते. समाज आणि शासनव्यवस्थेचे पर्यायी विकल्प सादर करण्याचा संस्थेचा संकल्प आहे. संशोधन करणाऱ्या संस्था, अन्याय आणि शोषणमुक्तीसाठी संघर्ष करणारे गट तसेच कार्यकर्त्यांना सामाजिक-आर्थिक न्याय मिळवून देण्याचे मॉडेल विकसित करण्यासाठी संस्था सहाय्य्य करते.**

\ग़moHग़gAmत्रZ X`bmoĬb gmCW – **ही धोरणविषयक संशोधन करणारी फोकस ही संघटना भारत,फिलिपीन्स आणि थायलंडस्थित आहे. भारत तसेच जगाच्या दक्षिणी, म्हणजेच विकसनशील देशांतील जागतिकीकरणाच्या राजकारणाचे आर्थिक धोरण आणि या प्रक्रियेत अंतर्भूत असणा-या प्रमुख संस्थांसंबंधीचे संशोधन तसेच विश्लेषण करण्याचे कार्य करते. तसेच सामाजिक आंदोनले आणि संघटनांना याप्रश्नी सहाय्य प्रदानकरण्याचेही काम करते. फोकसचे उद्देश आहेत शोषक आर्थिक आणि राजकीय संरचनांची समाप्ती, नवीन संरचना आणि संस्थांची निर्मिती, निर्लष्करीकरण तसेच शांती प्रस्थापना**

FOCUS ON THE GLOBAL SOUTH

अन्नअधिकार अभियान, महाराष्ट्र